नाट्यक


४१

नाटक

नं. ४१

म. ग्रं. सं. ठाणें

विषय नाटक

संग्रहालय क्रमांक ६६६

लेखक शं. मो. रानडे

सन १९८३

पुस्तकाचें नांव वीरोचांस

६६

॥ श्री

नाट्यक

कैलासवासी
सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
९-१०-२२.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें.

# वीरोत्तंस नाटक.

हें पुस्तक

शंकर मोरो रानडे, बी. ए.

ह्यांनीं

मूळ इंग्लिश ग्रंथाधारें केलें.

कैलासवासी
[illegible]ाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
९-१०-३३.

---

तें

मुंबईंत

"नेटिव ओपिनियन" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

---

( सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें सर्व प्रकारचे हक्क
ग्रंथकर्त्यानें राखिले आहेत.)

---

सन १८८३.

---

शके १८०५.

# पात्रें.

वीरोत्तंस ( धनपाळ ) .... .... .... सिंधु देशाचा राजपुत्र.

कासिम ( अरब ) .... .... .... त्याचें राज्य बळकावून बसलेला.

सिंहवर्मा.... .... .... .... .... धनपाळाचें गुप्तरूपें संरक्षण करणारा.

शूरसेन .... .... .... .... .... त्याचा पुत्र.

शांतिवर्मा, वक्रदंष्ट्र, सुधन्वा .... .... .... .... सिंहवर्म्याचे स्नेही.

चित्रांगद.... .... .... .... .... वीरोत्तंसाचा स्नेही.

कुसीद .... .... .... ... .... कासिमाचा सेनापति.

मणिपाळ.... .... .... .... .... कासिमाचा सेवक, गुप्तरूपें सिंहवर्म्याचें साह्य करणारा.

सुलोचना.... .... .... ... .... सिंहवर्म्याची स्त्री.

रक्षक, दासी, कवि, इ० इ०

कैलासवासी
सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
९-१०-२२.

# पात्रें.

| | |
|---|---|
| वीरोत्तंस ( धनपाल ) .... .... .... | सिंधु देशाचा राजपुत्र. |
| कासिम ( अरब ) .... .... .... | त्याचें राज्य बळकावून बसलेला. |
| सिंहवर्मा.... .... .... .... .... | धनपाळाचें गुप्तरूपें संरक्षण करणारा. |
| शूरसेन .... .... .... .... .... | त्याचा पुत्र. |
| शांतिवर्मा, वक्रदंष्ट्र, सुधन्वा .... .... .... .... | सिंहवर्म्याचे स्नेही. |
| चित्रांगद.... .... .... .... .... | वीरोत्तंसाचा स्नेही. |
| कुसीद .... .... .... .... .... | कासिमाचा सेनापति. |
| माणिपाळ.... .... .... .... .... | कासिमाचा सेवक, गुप्तरूपें सिंहवर्म्याचें साह्य करणारा. |
| सुलोचना.... .... .... .... .... | सिंहवर्म्याची स्त्री. |

रक्षक, दासी, कवि, इ० इ०

कैलासवासी
सखाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
९-१०-२२.

# वीरोत्तंस नाटक.

## अंक १.

### प्र. १.—सिंहवर्म्याचें घर.

(धनपाळ व चित्रांगद समोरासमोर येतात.)

**धन०**—**चित्रांगदा** ! कसें काय ? तूं कोणच्या नाक्यावरून आलास ? तुला कसें काय वाटतें ! आपल्या या सिंधुदेशाचें नष्टचर्य जाण्याचें कांहीं आहे का चिन्ह ? नुकताच जो भीति आणि निराशा यांचा सूचक असा एकदम हलकल्लोळ उसळला त्याचा काय बरें अर्थ ?

**चित्रां०**—( उसासा टाकून ) **धनपाळा** ! अरे, अर्थ कसचा विचारितोस ? झालें ! घात झाला ! सगळें बुडालें ! आजच सकाळीं नगरांतील बहुतेक लोक जयाशाभरित होत्साते या लढाईचा चमत्कार पहाण्याकरितां मोठ्या उत्कंठेनें घराबाहेर पडले, पण तेच आतां पहावें तों अगदीं दीन वदनानें परत येत आहेत ! कोणाकडेही पहा जो तो निराशा आणि निरुत्साह यांहीं अगदीं गांजिलेला असा दिसतो ! नगराबाहेर असतांना या लोकांची स्थिति कशी होती हें मला माहित नाहीं ! पण आतां माणिकवेशीपाशीं मी उभा असतां जे लोक नगरांत शिरले, त्या प्रत्येकाच्या तोंडांतून दीर्घ आणि निश्चल असा उसासा, व 'हरहर !' किंवा 'शिव शिव !' असा दुःखोद्गार—यांशिवाय दुसरें कांहीं ऐकूं आलें असेल तर शपथ !—ही नगरांत शिरलेल्यांची हकीकत झाली ! इतक्यांत त्या दुष्ट कासिमाचे स्वार शिपाई रस्त्यांत फिरूं लागून त्यांनीं नगरांत एकच दौड चालविली, त्याबरोबर जसों कांहीं नागरिक जनांचीं तोंडें शिवूनच टाकिलीं आहेत अशा प्रकारची कांहीं विलक्षण स्तब्धता नगरांत सर्वत्र संचार करूं लागली ! फार तर काय ? लढाईची खबर समजावून घेण्यास उत्सुक होऊन ज्या ह्यातार्‍या कोतार्‍या, व वृद्ध गृहस्थ घराबाहेर पडले होते, तेही मुकाट्यानें आपआपल्या घरांतून शिरूं लागून, त्यांनीं आपल्या मुलांबाळांस एकवार कडकडून मिठ्या मारल्या, आणि आतां हा दुष्ट आपली काय वाट लावतो या काळजींत सर्व जण गढून गेले आहेत !

**धन०**—हाय हाय ! एकूण अखेर त्या दुष्टाचाच जय झाला, आणि स्वातंत्र्य व धर्म यांची परत संस्थापना करण्याच्या हेतूनें आमच्या सिंधुवीरांनीं जी प्रचंड गर्जना केली, ती त्यांच्या मृत्युकाळच्या कण्हण्याप्रमाणेंच झाली अं ?—हरहर ! **चित्रांगदा** ! तूं ह्मणतोस ही स्तब्धता कठिण ! इच्यापेक्षां संग्रामांगणांतल्या त्या प्रत्यक्ष प्रलयगर्जनाही पत्करतील !—बरें तें असो !—**चित्रांगदा** ! या वेळेस माझे

बाबा कोठें आहेत कांहीं तुला ठाऊक आहे ?

चित्रां०—ते माणिकवेशीच्या बाजूच्या थोरल्या बुरुजावर उभे होते, व मी इकडे निघून येण्यापूर्वींच त्यांची आणि माझी गांठ पडली होती. ते त्या ठिकाणीं उभे राहून स्वजनांची ती दुर्दशा पहात होते ! बिचारे करतात काय ? सर्व आभाळच जेथें फाटलें तेथें त्यांचा काय उपाय ? आपल्या सिंधुवीरांचा शेवट मोड झालेला पाहून ते आश्चर्यानें थक्क होऊन गेले, व त्यांच्या तोंडून कांहीं वेळ एक शब्द सुद्धां बाहेर पडेना ! छातीवर असे तिरपे हात धरून ते कांहीं वेळ अगदीं स्तब्ध उभे होते ! अंमळशानें त्यांनीं अतिशय दीर्घ व उष्ण सुस्कारा टाकिला, व सरते शेवटीं ते एवढेंच बोलले:—" नाइलाज आहे ! या अरबाचीच अखेर फत्ते झाली! आतां मुकाट्यानें शांत वृत्ति धारण करावी. व जें काय होईल तें पहात रहावें एवढेंच काय तें नशीबीं उरलें आहे!"

धन०—काय ? त्या दुष्ट विधर्मी मुसंड्यापुढें हात जोडून खुरनिसात करावी ? धिक्कार असो आह्मांला ! काय? आमच्या सिंधुवीरांचें शौर्य इतक्यांतच नामशेष झालें? छत् ! असें कदापि होऊं देतां उपयोगीं नाहीं ! हें बघ चित्रांगदा! त्या दुष्टाचा अद्यापि आमच्या नगरींत प्रवेश झाला नाहीं ! त्याचे स्वार शिपाई नगरांत आहेत, तथापि जोंपर्यंत त्यांजजवळ कोणी नेता नाहीं तोंपर्यंत त्यांची फारशी मला धास्ती वाटत नाहीं ! यासाठीं आपण आपले वीर एकत्र जमवूं आणि नगरीच्या सर्व वेशी आडवून धरूं ! सुदैवानें त्या वेशी लांब व चिंचोळ्या आहेत, याकरितां त्वरा करून इतक्यांतचे जर आपण तजाविजी योजिल्या, तर त्या दुष्टाच्या अंकावर आरूढ होऊं पहाणाऱ्या विजयश्रीचें आपण अद्यापिही हरण करूं शकूं असें मला खचित वाटतें!

चित्रां०—धनपाळा ! तुझे तर्क व्यर्थ आहेत ! तूं ह्मणतोस ही निवळ स्वप्नसृष्टि आहे ! आपण येथें बोलत आहों इतक्या अवकाशांत तो दुष्ट त्या थोरल्या वेशीपाशीं येऊन भिडला देखील असेल, तेव्हां आतां जयाशेचें नांव कशाला पाहिजे ? याकरितां आतां येथें शांतवृत्तिच धारण केली पाहिजे ! ती न करून परिणाम नाहीं !—बाबारे ! वीरश्री दाखविण्याचे ते दिवस आतां गेले !—आतां तिच्या पासून उपयोग तर नाहींच होणार, परंतु कदाचित् तूं व तुझीं मातापितरें यांच्या प्राणांवर मात्र फुकट येऊन गुदरेल !—हाय हाय ! धनपाळा ! तुला काय सांगूं ? यावेळीं तुझ्या त्या सद्गुणी मातेची जर स्थिति मनांत आणिली, तर अतिशय कठिण अशा दगडासही पाझर सुटेल ! मग तुज सारख्याची किंवा मज सारख्याची ती काय कथा ! ती अगोदरच दुःखानें करपून गेली आहे, तथापि तशा स्थितींत देखील तिचे डोळे सर्वस्वीं तुझ्यावर गुंतून राहिले आहेत! आसनीं, भोजनीं, शयनीं, तिला निरंतर काळजी—तुझें कल्याण कसें होईल ? आपल्या या देशभूमिकेची इतकी अघोर स्थिति झाली, व परमबळी अशा त्या

विख्यात दाहिरराजाचा वंशही काळानळानें निःशेष भस्मसात् करून टाकिला, या सर्व दुःखांचें तिला पदोपदीं स्मरण होतेंच आहे, तथापि त्या तितक्यांतूनही तिच्या प्रबळ मातृवात्सल्याचा सारा ओघ तुजकडेच धांव घेऊं लागून क्षणभर ती आपलीं इतर सर्व दुःखेंही विसरून जाते.

**धन०**—**चित्रांगदा** ! तूं ह्मणतोस यांत तिळमात्र संदेह नाहीं. ! माझी प्रियजननी तूं ह्मणतोस तशीच आहे ! काय तिची योग्यता वर्णावी ? त्या माउलीच्या हृदयांत आपबुद्धीचा कसा तो एवढाही वास नाहीं ! वात्सल्याचें व प्रेमाचें केवळ माहेर घरच ! तरी पण तिच्या अंगीं एक उणीव आहे ! ती कोणची ह्मणशील, तर यत्किंचितूही भीतीचें कारण दिसूं लागलें असतां त्याला ती एकदम पर्वताचें महत्व देते ! जरा कोठें इकडची काडी तिकडे पडली, कीं कांहीं झालें, कीं लागलीच तिला कांहीं तरी भावी संकट दिसूं लागतें, व यामुळें एकादेवेळीं ती निराशेच्या सागरांत केवळ बुडूनच जाते ! व तिची ती भीति निघून जाऊन तिचें पुनश्च समाधान होणें मोठें कठिण पडतें ! याकरितां मित्रा ! तुला एक गोष्ट सांगतों ! माझ्या मातेचें मजवर अनिवार प्रेम आहे, त्याचप्रमाणें तुजवरही आहे, यासाठीं तूं एवढेंच कर, ती एकांतीं आपल्या मंदिरांत दुःख करीत बसली असेल तिजकडे जाऊन हरप्रयत्नानें तिच्या दुःखित हृदयाचें समाधान कर, व होईल तितकें करून सिंधुवीरांच्या आजच्या या पराजयाचें क्लेशकारक वर्तमान तिला कळवूं नको ! किंवा तें नच साधेल, तर निदान आपल्या वीरांनीं इतक्यांतच केवळ निराशेच्या आधीन व्हायला नको असें तरी तिला वाटीव !—तोंपर्यंत मी नगरीच्या तटावर हिंडून बाबांना शोधून काढून त्यांची वीरश्री जागृत करितों !— हें पहा **चित्रांगदा** ! या वेळीं ही गोष्ट केलीच पाहिजे ! या आपल्या प्रिय भूमिकेचें स्वातंत्र्य किंवा धारातीर्थीं वीरांप्रमाणें देहावसान या दोहोंतून एकाची निवड करण्याची हीच अखेरची वेळ आहे ! ( आवेशानें निघून जातो. )

**चित्रां०**—अरे, नुसतें तोंडानें मी होय ह्मणण्याच्या पूर्वींच हा वीर पुरुष निघून देखील गेला !—असो; जाऊं द्या ! प्रियाची गांठ पडली ह्मणजे तेच त्याचें समाधान करतील! हाय हायगे देशजननी ! तुझ्या वीरांच्यानेंही तुझा बचाव होऊं नये असा दुर्धर प्रसंग अखेर तुजवर आलाच ना !— आतां त्या बिचाऱ्या माउलीकडे मी कोणत्या तोंडानें जाऊं आणि तिचें समाधान तरी कसें करूं ? ( पाहून ) काय ? ही माउलीच इकडे येते आहे ?—शिवशिव ! हिच्या या मुद्रेवरूनच तिला आपल्या वीरांचा मोड झाल्याचा दुःखकारक वृत्तांत अगोदरच कळला आहे असें दिसतें ! हाय हाय !

( सुलोचना व मणिपाळ येतात. )

**सुलो०**—**मणिपाळा**! तुझें सांगणें व्यर्थ आहे! अशी गोष्ट कधीं व्हायची नाहीं ! काय हा अनर्थ ! परमेश्वरा ! हा सर्व राजवाडा रक्ताच्या नद्यांत बुडून गेला, सिंधुदेशाचें राजकुळ सवंध विलयास जाऊन त्याचे प्रजाजन आज थोडींथोडकीं नाहींत वीस

वर्षें एकसारखे पारतंत्र्यांत आणि हालांत दिवस काढीत आहेत, तथापि तेवढेंही अद्यापि पुरेंसें झालें नाहीं काय? ही हतभाग्य **सुलोचना**—हिच्या ह्या दग्ध हृदयास झाले एवढे क्लेश पुरेसे झाले नाहींत, म्हणून कारे तिच्या जिवाला हे नवे नवे क्लेश उत्पन्न होताहेत?

**मणि०**—आपण असा किती तरी शोक करा ल? या सिंधुभूमीच्या नष्टचर्याची आज कैक वर्षें सीमा झाली आहे! आतां राहि- लें आहे काय? राजे तशा परी गेले, प्रजाजनांचीही अशी वाट लागली,—

**सुलो०**—**मणिपाळा**! शिवशिव! तें कांहीं बोलूं नको! आज इतके दिवस झाले, तरी प्रत्यहीं नवीन नवीन जुलूम दृष्टीस पडतात! प्रत्यहीं नव्या नव्या विधवा, नवीं नवीं पोरकीं झालेलीं मुलें, कोणाचे भाऊ मेलेले, कोणाचे बाप कारागृहांत टाकलेले, असें दररोज एक, का दोन, का हजार!—आणखी या सगळ्यांचे अभि- श्राप त्या मेल्या मुसंड्याच्या डोकीवर प्रत्येक क्षणीं लादले जातात, तथापि अद्यापि त्या दीनवत्सल प्रभूस कांहीं दया येत नाहीं! आणि हा दुष्ट म्लेंच्छ—जसा कांहीं मेल्याला ऊतच आला आहे! आ- णखी दररोज कांहीं तरी नव्या नव्या कल्प- ना काढून आपल्या दीन प्रजेचा अधि- काधिक छळ करीत आहे! **मणिपाळा**! अरे, ही भयंकर स्थिति नेहमी अशीच कारे चालावयाची!

**मणि०**—आईसाहेब! तें कांहीं पुसूं नका! मला खचित वाटतें, आपल्या सर्व लो- कांवर प्रत्यक्ष परमेश्वराचीच अवकृपा झा- ली आहे!

**सुलो०**—**मणिपाळा**! तूं चुकतोस! निरप- राधी आणि सत्याचरणी लोकांचा परमे- श्वर कधीं छळ करीत नाहीं! त्यांचा छळ करणारा हा मेला मुसंडा—याचा सत्या- नास होवो! या मेल्याचा उच्छेद कर- ण्यासाठीं व आणखी एकवार या देशीं धर्म व स्वातंत्र्य यांची संस्थापना व्हावी म्हणून आमच्या वीरांनीं ही अखेरची खटपट केली, तिचीही या मेल्यानें धूळ- धाण केली! त्या **पंचगांग** प्रदेशांतून इ- तकें सैन्य आलें, त्या सगळ्याचा पण या घातक्यानें चुराडा केला? खरेंच **मणि- पाळा**! अखेर अशीच कारे स्थिति झाली? आतां तो मुसंडा नौबती, डंके वा- जवीत शहरांत प्रवेश करणार अं?—कोण **चित्रांगदा**! तूंच कारे बाबा तो? तूं कोठून आलास? सांग तुला कांहीं कम- जास्ती कळलें आहे?

**चित्रां०**—आईसाहेब! कमजास्ती तें काय असणार? झाली जी स्थिति, ती शहरच्या तटावर उभा असतां प्रत्यक्ष या नजरे- नें पाहिली! त्या दुष्टानें आपल्या **पंचगां- ग**सैन्याचा पुरा मोड केला, व आतां थोडक्याच वेळानें आपल्या या नगरच्या थोरल्या वेशीवर त्याचें निशाण पुनरपि फडकूं लागेल!

**सुलो०**—जा बाबा जा!—तूं सांगतोस हकी- कत, एवढीवरून माझें समाधान नाहीं होत! या साठीं जा. आणि या दुर्धर प्रसंगाची खडान् खडा बातमी मला येऊन कळीव! जा! (चित्रांगद जातो.)

मणि०--आईसाहेब! आपण एकसारखा शोक करीत राहिलां, तर त्यापासून उपयोग का कांहीं होणार आहे? याकरितां विचारानेंच आपण शोक आवरावा हें बरें!

सुलो०—मणिपाळा! तूं उपदेश करितोस तो सर्व मला समजतो, पण मी काय करूं? माझा उपाय नाहीं! या नष्टचर्य देशाच्या राजवंशावर व त्याच्या प्रजाजनांवर हा अघोर प्रसंग कायमचा गुदरला याचें दुःख एक तर आहेच! पण याशिवाय प्रत्यक्ष आमच्या या कुळावरच आकाशाची कुऱ्हाड येऊन कोसळून पडण्याचा समय प्राप्त झाला आहे, त्यामुळें माझ्या जिवाला जें कांहीं होतें आहे तें मला सांगतां देखील येत नाहीं!

मणि०—आईसाहेब! सांगायलाच कशाला पाहिजे? तें पदोपदीं दिसतेंच आहे! एक घटकाही पुरी लोटली नाहीं, तोंच कांहीं तरी नवीन दुःख आहेच, आणखी तेंही पहावें तों पहिल्याहून जास्तीच! तात्पर्य, आपलें नशीबच चोहींकडून फिरलें ह्मटलें पाहिजे! तें केव्हां सुधारेल तें सुधारो!

सुलो०--हेंच तें! मणिपाळा! माझ्या जिवाला जी एकसारखी धास्ती वाटते आहे तिचें बीज हेंच! ही गोष्ट मनांत आली ह्मणजे माझी कांहीं ना बाहींच स्थिति होऊन जाते! डोळ्यांपुढें नानाप्रकारचे तरंग संचारूं लागून मी नाहीं नाहीं तें पहातें! देवा! देवा! माझ्या प्रिय बाळकाचा रक्षण करणारा तूंच आहेस!

मणि०---काय? आईसाहेब! आपण आपल्या चिरंजिवांकरितां का इतक्यांत भीत आहां? मी समजत होतों, आपण यापूर्वींच त्याला आपणाकडे बोलावून आणून त्याला चार बोधाच्या गोष्टी सांगून त्याची उत्कट युद्धेच्छा नाहींशी—निदान कमी तरी—केली असेल, आणखी त्यानेंही आपलें मातृप्रेम व स्वतःचा पुत्रधर्म मनांत आणून आपल्या इच्छेस मान दिला असेल!—मग आपण असें कसें ह्मणतां?

सुलो०—मणिपाळा! या वेळीं तो कशा प्रकारच्या धोक्यांत आहे हें तुला काय ठाऊक? परंतु ही गुप्त गोष्ट आहे, ती या जिव्हेबाटे कधीं बाहेर पडतां उपयोगीं नाहीं!

मणि०---कसें ह्मटलें आईसाहेब! माझ्या प्रामाणिकपणाबद्दल आपल्याला संशय तर नाहीं वाटत? आईसाहेब! आपल्याला सर्व प्रकार ठाऊक आहेच, मग असें ह्मणणें कसें शोभेल? सांप्रत मी त्या दुष्टाची सेवा पत्करून आहे हें खरें, तथापि ती फक्त योग्य वेळ येईल केव्हां, आणि या दुष्टाचा समूळ नाश करून आपल्या देशजननीस दुःखांतून मुक्त करतां येईल केव्हां, एवढ्यापुरतीच आहे!

सुलो०—मणिपाळा! तुझी स्वराजभक्ति, तुझा प्रामाणिकपणा, तुझें सद्वर्तन, यांविषयीं कोणाच्याही मनांत यत्किंचित् सुद्धां आजपर्यंत कधीं संशय आला नाहीं! शिवाय त्या घातक्या अरबानें तुझ्या घराण्याची—त्याच्या अन्नाची—कशी धूळधाण---

मणि०—-शिवशिव! आईसाहेब! त्याचा आपण उच्चार करण्याचेंच कांहीं कारण नाहीं. कारण ज्या दिवशीं त्या दुष्टानें ही आमची सर्व प्रकारें धूळधाण व वाताहत

केली, त्या वेळीं या हृदयाला पडलेले घरें आज इतका काळ लोटला तरी अद्यापि जसेच्या तसे ताजे आहेत ! त्यानें स्वत: मला पुष्कळ ममता दाखविली, व मला अधिकारही मोठमोठे दिले आहेत, तथापि या हृदयाचा व्रण ह्मणून बुजावयाचा नाहीं !—काय ? ज्या दुष्टानें प्रत्यक्ष माझ्या पित्याचा घात केला, व माझ्या भगिनीस बळात्कारानें बाटविलें, त्या दुष्टाचीं तीं अघोर कर्मे मी विसरेन ! आः— दुष्टा—अधमा !—हा **मणिपाळ** तुझा घात केव्हां करील हें तुला समजूं सुद्धां देणार नाहीं !—वस्तुत: जर अशी स्थिति आहे, तर आईसाहेब ! आपली गुप्त गोष्ट माझ्या तोंडून बाहेर कधीं तरी पडेल काय ?

**सुलो०**—मी असें मुळींच ह्मणत नाहीं. तरी पण माझ्या अंत:करणास होत असलेलें असह्य दु:ख माझ्यानें इतक्यांतच सांगवत नाहीं ! हायहाय ! **मणिपाळा** ! त्या दुष्टाचा जय होऊन त्यानें आपल्या पक्षाचे जे लोक कैद केले असतील, त्यांपैकीं एकादे वेळीं कोणाच्या तोंडून जर का गोष्ट बाहेर पडली, आणखी त्या महाप्रतापी दाहिरराजाचा शेवटला वंशज अद्यापि जिवंत आहे, असें त्याला कळून आलें, तर तो अत्यंत क्रोधास चढून काय काय अनर्थ करील कांहीं सांगवत नाहीं ! सुदैवानें त्या महाभाग वंशजास अमका मीच तो ह्मणून आपली स्वत:ची यत्किंचितही माहिती नाहीं, यामुळें तो स्वत: पुढें येणार नाहीं; व त्याचे प्राणही कदाचित् वाचतील, परंतु त्या दुष्टानें का एक वेळ अनर्थ मांडिला, ह्मणजे माझ्या निरपराधी बाळाचे मात्र फुकट प्राण जातील ! हायहाय !

**मणि०**—आईसाहेब ! आपण तरी भारीच विचार करीत बसतां! त्यामुळें आपल्या अंत:करणाचीं दु:खें विनाकारण दुणावतात मात्र! बाकी तुह्मांला ज्याबद्दल भय वाटतें आहे, तसला प्रसंगच येण्यासारखा नाहीं ! **सिंहवर्म** महाराज त्या दुष्टाच्या संनिधच राहून ते हर उपायानें आपल्या पक्षाकडील लोकांचा बचाव करतील, याविषयीं आपण अगदीं निर्धास्त असावें! हेंच पहा, तो दुष्ट एवढा अधम व एवढा क्रूर असतांही **सिंहवर्म** महाराजांस नमून असल्याप्रमाणेंच असतो, तेव्हां आपण ह्मणतां तसली धास्ती बाळगण्याचें कांहीं कारण आहे असें मला तर वाटत नाहीं !

**सुलो०**—**मणिपाळा** ! एवढी मात्र गोष्ट अगदीं खरी ! प्राणनाथ या सकल **सिंधु**देशाचे धर्मगुरु, व सर्वजण त्यांना वचकतात, शिवाय त्यांच्या वर्तनांत दोष ठेवण्याला एवढी सुद्धां जागा नाहीं, हें तो दुष्ट पूर्णपणें जाणून आहे, व ह्मणूनच त्यांच्यापुढें तोही वचकतो ! कसेंही असो ! आतां बरीक माझ्या जिवांत थोडासा तरी जीव आला !—अरे, पण हा गलबला कशाचा ऐकूं येतो ? देवा देवा ! माझें तर हृदय धडधड उडूं लागलें आहे! काय अनर्थ होणार आहे कांहीं कळत नाहीं !

**मणि०**—आईसाहेब ! आपण अशा घाबरूं नका ! आपली कल्पनाच आपणाला नसतीं भयें वाटविते, व जिकडे तिकडे आपणाला तो दुष्टच संचार करतो आहेसें

वाटतें ! पण आपण शांत व्हावें ! पहा **सिंहवर्म** महाराजच इकडे येत आहेत !

**सुलो०**—देवा देवा ! आई **अंबाबाई** ! काय ही प्राणनाथांची स्थिति ! ते आपल्याकडून दाबून ठेवण्याविषयीं प्रयत्न करतात, तरी पण त्यांची मुद्रा किती विलक्षण दिसते आहेही ! वारंवार दीर्घ उसासे टाकीत आहेत, व नेत्रही भांबावल्याप्रमाणें झाले आहेत ! **मणिपाळा** ! आमचें नशीब फुटलें हेंच खचित ! याकरितां कांहीं वेळ एकीकडे जा, मला येथें प्राणनाथांजवळ एकटीच असूं दे.

**मणि०**—आज्ञा आईसाहेब ! ( जातो. )

( सिंहवर्मा येतो. )

**सुलो०**—प्राणनाथ !

**सिंह०**—कोण ? प्राणप्रिया ? ( उभयता एकमेकांस मिठ्या मारितात )

**सुलो०**—प्राणनाथ ! आपण तटावरून पाहत होतां, त्यावरून आपणाला काय वाटतें ? या **सिंधुदेशाचें** भाग्य उदयास येण्याची कांहीं तरी आशा आहे काय ?

**सिंह०**—( दीर्घ सुस्कारा टाकून ) हरहर ! प्रिये ! सर्वस्वीं घात झाला ! आतां इतःपर **सिंधुदेश** व **सिंधुवीर** ही अक्षरेंही ऐकायला नकोत !

**सुलो०**—देवारे देवा ! काय हा अनर्थ ! एकूण मूर्तिमंत सत्यही या चांडाळाच्या करणीनें सर्वस्वीं बुडालें अं ?

**सिंह०**—प्राणप्रिये ! काय सांगूं तुला ! पूर्वीचे ते सुखाचे दिवस, ते सद्धर्मी सद्गुणी राजे, त्यांच्या त्या सुखानें काळ घालविणाऱ्या प्रजा, या सर्वांचा या क्षणीं एकसहा लोप होऊन गेला ! आतां पुनरपि ह्मणून या देशानें वर डोकें काढण्याची आशा धरायलाच नको ! हे दयाघना परमेश्वरा ! अरे, या क्षणीं चोहींकडे लक्षशः प्राणघात होत आहेत, त्यांतच या ह्मातान्याचा कां नाहीं घात होऊं दिलास ?

**सुलो०**—प्राणनाथ ! आपण वीर उदार मनाचे असून आपलीच जर अशी गाळण होऊं लागली, तर ग्यां दीन अबलेनें काय करावें ? प्राणनाथ ! इतके अनर्थ होतात, तरी पण परमेश्वराची आपणावर कृपा पूर्ण आहे, ह्मणून तर त्यानें इतक्या अनर्थांतूनही आपले प्राण सुरक्षित ठेविले ! एवढेंच नव्हे, तर यावरून आपले प्राण रक्षण करण्यांत त्या जगन्नियंत्याचे कांहीं तरी गुप्त हेतु खचित आहेत, असें आपणच नाहीं का मला सांगितलें ?

**सिंह०**—प्राणप्रिये ! तूं ह्मणतेस ती गोष्ट खरी ! परमेश्वराचा गुप्त हेतु होता, ह्मणूनच त्या तसल्या भयंकर प्रसंगांतून त्यावेळीं मी निभावलों ! या देशाचा महाप्रतापी **दाहिरराजा**—त्याच्या वंशांतलें शेवटलें बालक—त्याचें संरक्षण करावें हाच त्या दयाघनाचा हेतु होता ! या गोष्टीस पुरीं वीस वर्षें झालीं ! इतक्या अवकाशांत तो कोठें आहे व काय करितो याचा बाकीच्या लोकांस तर काय, पण प्रत्यक्ष त्या राजमूर्तीसही अद्यापि थांग लागूं दिला नाहीं ! व तो दयाघन परमेश्वर आपल्या इष्टहेतुसाधनार्थ माझ्या चित्ताची तशी प्रेरणा करीपर्यंत ही गुह्य गोष्ट अशीच मजकडून गुप्तच राहील ! अहाहा ! हे सच्चिदन परात्पर प्रभो ! **नारायणा** ! ह्या **दाहिरराजाच्या** शेवटल्या वंशाकुरां-

च्या मस्तकावर तुझा कृपाहस्त निरंतर असूं दे ! तुझ्याच केवळ कृपेच्या योगानें त्याच्या शत्रूंना या घटकेपर्यंत यत्किंचितूही थांग लागला नाहीं, तसाच पुढेंही लागूं देऊं नको ! हा तुझा दीन दास सिंहवर्मा, व ही तुझी दीनदासी, या उभयतांचें तुजपाशीं दुसरें कांहीं मागणें नाहीं ! आह्मां दोघांस तूं कशाही विपत्तींत पाडलेस, कशीही दुःखाची स्थिति आह्मांस प्राप्त करून दिलीस, तरी त्याबद्दल आह्मांला लवमात्रही खेद वाटणार नाहीं! मात्र तूं संतत कृपाळु राहून त्या दिव्य बालराजमूर्तीचें संरक्षण कर, व या दुष्ट विधर्मी मुसंड्यास योग्य पारिपत्य करून आमच्या प्रिय राजपुत्रास त्याचें राज्य परत मिळवून दे !—प्रिये ! तूंही पण त्या परात्पर गुरुपाशीं हेंच मागणें माग !

सुलो०—देवा नारायणा ! तुझ्या अगाध ज्ञानापुढें मीं गरीब अबलेनें अधिक तें काय बोलावें ? तथापि अनन्यभावें करून मी तुजपाशीं एवढेंच मागणें मागतें कीं, तूं माझ्या प्राणनाथांची विनंती मान्य करून आह्मां उभयतांच्या तोंडून ही भयंकर गुप्त गोष्ट संभाळून राहील असें कर, व त्या प्रिय राजमूर्तीचें सर्वोपरी कल्याण कर !

सिंह०——अहाहा ! परमेश्वरी मायेचा केवढा अगाध महिमा हा ! जो मी थोड्या वेळापूर्वी निराशासागरांत अगदीं बुडून गेल्यासारखा झालों होतों, त्याच मला आतां आपण उभयतांनीं ही प्रार्थना केल्या बरोबर कसलेंही दुःख आलें तरी सोसावयाचें धैर्य आपोआप वाटूं लागलें आहे !

सुलो०—त्याचा अनुभव हाच पहा—कांरे बाळा धनपाळा ! तूं असा घाबरलास कां ? कांहीं नवीन अनर्थ तर——

(धनपाळ येतो.)

धन०—हर हर ! बाबा ! आई ! काय ही तुमची दुःखावस्था ! तुमच्या या वृद्धापकाळीं आतां तुह्मांला आश्रय तरी कुठें मिळणार ?

सिंह०—धनपाळा ! व्यर्थ घाबरूं नको ! आह्मीं कितीही वृद्ध झालों, अथवा विपन्न स्थितींत पडलों, तरी आह्मांला दुसऱ्या कशाचा आश्रय नको! एक परमेश्वर, कीं, अंतःकरणाची शुद्धता व सत्यता, यांचाच आश्रय आह्मां ह्मातार्‍यांस बस्स आहे !

सुलो०—बाळा ! तूं ह्मणतोस तरी काय ? आह्मांवर आणखी कोणचा नवीन गुदरला ह्मणतोस ?

सिंह०—काय ? धनपाळा ! त्या दुष्ट क्रूर मुसंड्यानें इतका रक्तपात केला, तरी अजून त्याची तृप्ति नाहीं झाली ?

धन०—बाबा ! तृप्तीचें नांव कशाला ? ऐका तर खरें, तो दुष्ट आपली विजयपताका उभारून मोठ्या डामडौलानें आपल्या वाड्यावरून वाजत गाजतच रथांतून चालला आहे! हे पहा रणवाद्यांचे ध्वनि कसे क्षणोक्षणीं वृद्धिंगत होत चालले आहेत ! त्या दुष्टानें दुतर्फा रस्त्यानें आपले सैनिक उभे केले असून, त्याच्या स्वारीपुढें बंदिवानांचे थवेच्या थवे चालले आहेत ! जयप्राप्तीच्या मदानें त्या दुष्टास व त्याच्या सैनिकांस देहभानही न राहून ते मोठ्यानें हंसत व गर्जना करीत असून, मध्यें मध्यें बंदिवानांची निंदा व त्यांना शिव्यागाळी यांची तर

जशी कांहीं वृष्टिच चालली आहे ! बि-चाऱ्या बंदिवानांना हा सारा प्रकार पाहून अतिशय दुःख वाटतें व क्रोधही येतो, परंतु बिचारे करतात काय ? जागच्याजागींच दांत ओंठ खातात, व मुकाट्यानें दुःख सोसतात ! त्यांच्या अंगांतून एकसारख्या रक्तधारा चालल्या आहेत, तथापि त्यांबद्दल एकालाही तिलमात्र दुःख वाटत नाहीं. परंतु या दुष्टानें चालविलेले उपमर्द ऐकून मात्र त्यांच्या जिवाची लाही होऊन जाते !

**सुलो०**—देवा देवा ! किती दुर्धर प्रसंग हा !

**धन०**—या बंदिवानांच्या मध्यभागीं पण पुढें एक तरुण बंदिवान चालविला आहे, त्याची क्रोधयुक्त आवेशाची मुद्रा पाहून प्रेक्षकांस भय तर वाटतेंच, परंतु त्याबरोबर त्याजविषयीं प्रेमही उत्पन्न होतें असा कांहीं चमत्कार—

**सुलो०**—या तरुण बंदिवानाचें काय—काय—ह्मणतोस ?

**सिंह०**—प्रिये ! अशी घाबरूं नकोस ! धनपाळा ! सांग सर्व हकीकत नीट सांग पाहूं ?

**धन०**—बाबा ! आई ! चमत्कार काय सांगूं ? रस्त्यांत एवढा थोरला प्रेक्षकसमाज जमला आहे, पण सगळ्यांचे डोळे त्याच्या एकट्याच्या कडे कसे अगदीं उत्सुकतेनें लागले आहेत ! फार तर काय त्याची ती मूर्ति आपल्या दृष्टीस पडावी ह्मणून जो तो आपआपल्या डोळ्यांची शक्ति संपूर्ण खर्च कर करून जणों कांहीं त्याला पोटभर पाहून घेण्याविषयींच खटपट करीत आहे ! पण या सगळ्या प्रकारापेक्षां नवल ह्मटलें ह्मणजे सर्व शहरभर ज्याच्या त्याच्या तोंडीं एक अभुतपूर्व असाच उद्गार चालला आहे !

**सुलो०**—असा कोणचा उद्गार !

**धन०**—जो तो ह्मणतो, 'या सिंधुदेशचा राजवंश अद्यापि शिल्लक आहे ह्मणून जी लोकांत चोहींकडे वार्ता पसरली आहे ती जर खरी असेल, तर हाच तो राजपुत्र ! वरून वेश मात्र निराळा !' हा उद्गार ज्याच्या त्याच्या तोंडीं असल्यामुळें शत्रुपक्षाकडील लोक त्याजवरच भयंकर सूड उगविला पाहिजे ह्मणूनही बडबडत आहेत !

**सुलो०**—सूड ? पण त्याजवरच काय ह्मणून ? दुसऱ्या कोणावर——

**सिंह०**——( आपणाशीं ) काय सांगावें ! माझ्या मनाला अशीं हीं निष्कारण भयें वाटताहेत, धिक्कार असो यांना.

**धन०**——कारण कांहीं असो, परंतु बाबा ! जर करितां हा शूर तरुण पुरुष खरोखरीच आपला राजपुत्र असेल——

**सिंह०**—धनपाळा ! तूं अद्यापि अज्ञान आहेस ! तुला यांतलें कांहीं कळत नाहीं ! याकरितां हे वृथा तर्क करणें सोडून दे ! आणखी श्रीमुक्तेश्वराच्या देवळांत जाऊन माझी वाट पहात रहा, इतक्यांत मी मागोमाग येतोंच ! ( धनपाळ जातो. ) परमेश्वरा ! किती अघोर हा प्रसंग ! एक क्षणही असा लोटत नाहीं, कीं ज्यामध्यें नवीन नवीन अनर्थ ओढवले नाहींत ! आणखी तेही अनर्थ तरी मागल्यापेक्षां पुढचे अधिक भयंकर असेच !——

**सुलो०**——प्राणनाथ ! हा तरुण कैदी शूरसेन तर नसेल ? आपले नेत्र वर देवा-

कडे लागले आहेत, यामुळें आपल्या मनांत असेंच कांहीं तरी घोटाळत आहे असें वाटतें.

**सिंह०**—प्राणप्रिये **सुलोचने**! क्षणोक्षणीं नवीन नवीन बातम्या येऊं लागल्यामुळें माझ्या मनांत वेडेवांकडे तर्क येऊं लागले आहेत, परंतु त्यांत कांहीं अर्थ नाहीं! तूंच पहा, मी आपल्या प्रियबालकाला **शांतवर्म्या**च्या स्वाधीन करून त्याला थेट **हिमालया**च्या अगदीं एकीकडच्या गुहांत, कीं ज्यामध्यें मनुष्याचा वारा कीं गंधही कसा तो नसावयाचा अशा ठिकाणीं, नेऊन पोंचविलें, तेव्हां त्याचा कधीं कोणास शोध लागूं शकेल ही गोष्ट स्वप्नांत देखील मनांत आणायला नको! तसेंच आणखी जो खरा राजपुत्र त्याला इथें आपल्याजवळ ठेविल्याकारणानें कोणाच्याही मनांत संशय येण्याचें कारणच उरूं दिलें नाहीं, तेव्हां व्यर्थ कल्पना करणें पुरे!

(धनपाळ परत येतो.)

**सिंह०**—कांरे बाबा परतसा आलास?

**धन०**—बाबा! बाहेर कोणी एक अनोळखी वृद्ध जटाधारी गृहस्थ आपल्याला भेटण्याकरितां ह्मणून मोठ्या उत्सुकतेनें आला आहे!

**सिंह०**—त्याला आंत दे पाठवून! (धनपाळ जातो.) प्रिये! तूंही अंमळशी आंत जा, तोंपर्यंत मी या आलेल्या गृहस्थाची गांठ घेऊन तुजकडे येऊन तुझ्या दुःखित हृदयाचें समाधान करितों! व तूंही तोंपर्यंत या **सिंहवर्म्या**च्या धर्मपत्नीस अनुरूप जें धैर्य त्याचें अवलंबन करण्याचा यत्न कर!

**सुलो०**—जशी प्राणनाथांची आज्ञा! प्राणनाथ! आपल्या धर्मपत्नीस अयोग्य असें वर्तन मजकडून कदापि होणार नाहीं! जातें मी, आणखी या तरुण बंदिवानाविषयीं माझ्या व्यग्र मनामध्यें जे संशय येत आहेत, त्यांचा निकाल करून घेतें!—आई **अंबाबाई**! या दीन राष्ट्राची व आमच्या कुलाची पालन करणारी तूंच आहेस; याकरितां हा सर्वप्रिय राजबालक, हे माझे प्राणपति व माझा वत्स यांचें सर्वोपरी पालन कर एवढेंच या दीन दासीचें तुजपाशीं विनविणें आहे! (जाते.)

**सिंह०**—काय प्रकार आहे कांहीं कळत नाहीं, परंतु माझ्या अंतःकरणांतल्या एकूण एक वृत्ति अत्यंत क्षुब्ध होऊन जणों कांहीं माझें शरीर भेदून बाहेर पडूं पाहत आहेत!

(इतक्यांत शांतिवर्मा येतो.)

**शांतिवर्मा**—सख्या **सिंहवर्म्या**!

**सिंह०**—काय? माझा प्रियमित्र **शांतिवर्मा** येथें? (उभयतां एकमेकांस आलिंगन देतात.) मित्रा! तूं आतां वृद्ध झाला आहेस, तरी तुझी मुद्रा व तुझ्या शरीराची ठेवण यांवरून मी तुला ओळखलें!

**शांति०**—मित्रा! तूं मला बरोबर ओळखलेंस! आणखी एकवार तुला कडकडून मिठी मारूं दे! (तसें करितो.)

**सिंह०**—गड्या! सारें खरें, पण तूं इकडे कोणीकडे? माझ्या पुत्राची काय वाट?

**शांति०**—तुझ्या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हें माझें मलाच कळत नाहीं! मित्रा! काय सांगूं? त्याला गांठण्याकरितां ह्मणून तर **हिमालय** पर्वताहून निघून वनें, उपवनें सर्व धुंडीत ऊन्ह तहान न जुमानतां मी येथें आलों, परंतु अखेर सारा श्रम व्यर्थ!

सिंह०--पण तूं त्याला तेथून मूळ निघूंच दिलेस हें कसें काय ?

शांति०-गड्या ! सिंहवर्म्या ! त्याला मी आपण होऊन जाऊं दिलें असें समजूं नको ! तो निघून गेला याचें कारण त्याच्या आंगचें शौर्य ! मित्रा ! काय सांगूं ? पंचगांग प्रदेशांतील सैन्य सिंधुदेशीं युद्धाकरितां निघणार, व त्याप्रीत्यर्थ चोंहीकडे जारीनें तयारी चालू आहे, ही वार्ता तो अरण्यांत मृगया करीत असतां अकस्मात् कित्येक अरण्यचरांच्या मुखानें त्याला कळली, त्याबरोबर त्याचें चित्त त्यालाच आवरेनासें होऊन, व मी त्याची अनेक प्रकारें समजूत घालीत असतांही, ती न जुमानतां तो मजजवळून निसटून गेला !

सिंह०—बरें, तो हल्लीं कोठें आहे याबद्दल कांहीं बातमी तरी ?

शांति०--बातमी काय, तो नुकत्याच संपलेल्या लढाईत मिसळून या क्षणीं त्या दुष्ट कासिमच्या स्वारीबरोबर कैद झाला आहे! हरहर !

सिंह०--एकूण माझा प्रिय बालक अद्यापि जिवंत आहे तर ! परमेश्वरा ! तूं खचित धन्य आहेस ! प्रियसखी सुलोचने ! तूंही धन्य आहेस, व तूं अल्प काळांतच आपल्या प्रिय बालकाला आपल्या कंठाशीं धरशील ! गड्या शांतिवर्म्या! जातों मी, आणखी त्याला कैदेंतून सोडवून परत घरीं आणतों !

शांति०-मित्रा ! तुझी आशा व्यर्थ आहे ! तुला आजपर्यंत झालेलीं दुःखें पुढें होणाऱ्या दुःखापुढें कांहींच नाहींत ! कारण या दुष्टाशीं आपण जें आजपर्यंत कपटवर्तन केलें तें त्याला माहित नसून तो आपण प्रत्यक्ष राजपुत्रासच कैद केलें आहे असेंच समजत आहे !

सिंह०-काय ? कसें ह्मणतोस? कसें ?

शांति०--शत्रूचे लोक रस्त्यांत अगदीं बेफाम झाले असून तुझ्या नांवानें जो तो ओरडत आहे ! ज्याच्या त्याच्या तोंडीं हें सर्व कपट तुझें असून त्याबद्दलचा सूड त्या बिचाऱ्या शूरसेन बाळावर घ्या घ्या ह्मणून ओरडत आहेत !

सिंह०--परमेश्वरा ! माझें काळीज छिन्न भिन्न होऊन जाण्यास एवढा आणखी एकच काय तो आघात पाहिजे होता ! देवा ! तोही आघात मज ह्माताऱ्याला चुकला नाहीं अं! नारायणा! अरे, ती दीन माउली माझी प्रिया सुलोचना--तिची आणि तिच्या बाळकाची इतकीं वर्षें ताडातोड होऊन केवळ एका राजभक्तीकरितां त्या बालकास आजपर्यंत अरण्यवास काढावा लागला, हें दुःख या ह्मातान्याच्या जिवाला पुरेसें नाहीं झालें? हायहाय !—हे अश्रु माझ्या नेत्रांतून असेच कां वहात रहाणार? हे मूर्ख अश्रूंनो ! तुमचें वहाणें व्यर्थ आहे ! तुह्मांला मी कदापि जुमानणार नाहीं! अरेरे ! पण या दग्ध हृदयावर केवढा हा जुलूम करावा लागत आहे !

शांति०—मित्रा! अंमळ शांत हो ! समज त्या दुष्टाला खरा राजपुत्र तो नव्हे असें जाऊन सांगितलेंस, तर नाहीं का चालणार ?

सिंह०—हायहाय ! माझ्या काळजाचीं बंधनें आंतून पहा कशीं तटातट तुटत आ-

हेत! पण उपाय काय! परमेश्वरा! खचित खचित हीं बंधनें तुटत असतां त्यांची उपेक्षा करणें महा कर्म कठिण आहे !

**शांति०**——मित्रा ! प्रत्यक्ष पर्वताप्रमाणें जो अचल धैर्यशाली, अशा तुझी देखील अशी स्थिति व्हावी काय ? गड्या ! असे दीर्घ निःश्वास टाकून तूं इतका शोकाकुल काय ह्मणून होतोस ?

**सिंह०**——काय सांगूं ? माझा बालक—निरपराधी बालक—त्याचे प्राण—हायहाय ! हे शब्द माझ्यानें उच्चारवत देखील नाहींत !

**शांति०**—काय ह्मणतोस ? तूं आपल्या प्रिय पुत्राचे प्राण अर्पण करणार ?

**सिंह०**—हायरे हाय! अरे थेरड्या **सिंहवर्म्या**! असलें अमानुष कृत्य करूं लागण्याच्या पूर्वींच तुझाच अंत कां नाहीं झाला ?

**शांति०**—मित्रा ! तूं वेड्यासारखा काय बडबडतोस हा ? तुझ्या पुत्राचे सद्गुण, त्याची सत्यप्रीति, त्याचें लोकोत्तर धैर्य, हीं जर तुला कळून येतीं,—

**सिंह०**——मित्रा ! कृपा करून मला या वेळीं अधिक बोलावयास लावूं नको ! यावेळीं माझ्या या दग्ध हृदयाची किती भयंकर स्थिति झाली आहे, व त्यास आंतून कशा प्रकारच्या टोंचण्या लागल्या आहेत त्या तुला काय बोलून दाखवूं ? त्या एकं माझ्या मला किंवा त्या सर्वसाक्षी **नारायणा**ला मात्र ठाऊक ! यावेळीं या हृदयावर जे वज्रप्राय आघात पडत आहेत, त्यांची कल्पना तुला कशानें होणार ? त्याला पुत्रवंतच पाहिजेत ! हायहाय !

**शांति०**—एकूण तूं आपलें अंतःकरण सर्व एकीकडे ठेवून——

**सिंह०**—मित्रा ! तुझ्या पायां पडतों ! तूं पुनरपि पुत्रमोहाची गोष्ट काढून या ह्मातार्‍याच्या जिवाला अधिक दुःख देऊं नको ! ही वेळ मज ह्मातार्‍याबद्दल दुःख करण्याची नव्हे ! या प्रसंगीं त्या वीरप्रसव **वीरोत्तंसा**बद्दलच काय विचार करणें तो कर !

**शांति०**—कां **वीरोत्तंस** महाराजांबद्दल काय ह्मणतोस ? ते खुशाल आहेतना ? त्यांची स्थिति——

**सिंह०**—अधिक तर काय सांगूं ? तो अत्यंत प्रिय व अत्यंत सद्गुणी राजबाळक या लोकीं केवळ स्वर्गींचा देवच अवतरला आहे यांत संशय नाहीं! त्याला अद्यापि आपण खरे कोण हें जरी कळलें नाहीं, तथापि काय त्याची बुद्धि ! किती उत्साहपूरित साहस ! त्याच्या हृदयांत सांठलेले पराक्रम अद्यापि बाहेर पडले नाहींत, व अद्यापि त्याचे त्यालाही कळले नाहींत, तथापि ज्यावेळीं ते बाहेर पडतील व तेही अल्प काळानेंच पडतील,—त्यावेळीं फार तर काय, पण सर्व ते जगतीतलाला अत्यद्भुत विस्मयांत जणों काय बुडवूनच टाकतील !

**शांति०**—सख्या **सिंहवर्म्या** ! तुझ्या गूढ भाषणाचा मला कांहींच अर्थ कळत नाहीं !

**सिंह०**——याचा अर्थ विचारशील तर सूड, शत्रुनिःपात, व स्वातंत्र्य ! आज मध्यरात्र झाल्या बरोबर आपल्या पक्षाकडील राजभक्त शूर व धारिष्टवान् असे निवडक लोक तो अधम **कासिम** आपल्या जवळच्या संपूर्ण मंडळीसुद्धां मद्यपान करून बेशुद्ध पडला असतां नागव्या तरवारीनिशीं बाहेर पडून

आज सतत वीस वर्षें अंतःकरणांत धुमसत असलेला क्रोधाग्नि त्या दुष्टावर पाखडतील, व आजच्या एका रात्रींत संपूर्ण सिंधुदेशाच्या नष्टचर्याची परिसमाप्ति करतील !

**शांति०**—काय ह्मणतोस काय? आजच्या एका रात्रीं न् हा सर्व प्रकार उरकणार! वाहवा! वाहवा! तर मग याहून अधिक आनंदाचा तो—–

**सिंह०**—तें असो! मित्रा! मी एवढ्याच करितां ह्मणतों कीं, हा जो एवढा प्रचंड व्यूह आज रात्रीं खातरीनें सिद्धीस जाणार, त्याला माझ्या पुत्राच्या एवढ्याशा क्षुद्र जीवाकरितां मी विघ्न आणूं? भलतेंच! अशी गोष्ट कदापि होणार नाहीं! माझा पुत्र बळी पडतो—खुशाल पडूं दे! असल्या आणीबाणीच्या दिव्य प्रसंगीं माझ्या बाळाचे प्राणही मी खुशाल आनंदानें अर्पण करीन! फार तर माझ्या अंतरात्म्याला अत्यंत असह्य पीडा होईल, खुशाल होवो—तीही या असल्या कृत्याकरितां मी चट एकीकडे ठेवीन!

(बाहेर रणवाद्यांचा आवाज मोठ्यानें ऐकू येतो.)

**सिंह०**—ही पहा त्या दुष्टाची स्वारी माझ्या दारावरून चालली आहे! गड्या! आतां ही बोलत बसायची वेळ नव्हे! याकरितां तूं जा, आणि माझ्या दृढ निश्चयाला विघ्न करूं नको!

**शांति०**—– तरी पण आपल्या पुत्राचा बचाव करण्याची कांहीं तजवीज पहाच—

**सिंह०**—मित्रा शांतिवर्म्या! आतां हा विषयच पुरे! तूं ह्मणतोस ही गोष्ट कदापि घडूं शकणार नाहीं! तो दुष्ट नांवाचा कासिम आहे, त्याच्या सारखा अविचारी व धाडसी दुसरा कोणी मिळायचा नाहीं! याचा क्रोध केवळ वणव्यासारखा असून एकदा पेटला ह्मणजे काय काय अनर्थ करील याचा मुळींच नेम सांगतां येणार नाहीं! अग्नीला कृष्णवर्त्मा ह्मणतात, त्याची आणि या दुष्टाची स्थिति एक! यासाठीं तूंच पहा, जर करितां त्याच्यापुढें खरें खरें बोलून मी आपल्या पुत्राचे जीव वांचवूं लागेन, तर अगोदरच **वीरोत्तंस** महाराज अद्यापि जिवंत असल्याची खबर त्याला कळली असल्यामुळें, तो त्यांना आणून माझ्या स्वाधीन करा ह्मणून ह्मणूं लागेल! त्याप्रमाणें ते मिळणार तर नाहींतच, व तसें झालें असतां त्यानें आजपर्यंत केलेले प्रलय कांहींच नाहीं असे प्रलय तो दुष्ट नव्यानें मांडील! आज त्याचा जय झाल्यामुळें तो आनंदानें उच्छृंखळ झाला आहे एवढेंच काय तें, पण त्याला जर ही हकीकत कळेल, तर तो अत्यंत क्रोधास पेटून एकदम चोहोंकडे कत्तल करवील! तात्पर्य काय, एवढ्याशा एका क्षुद्र जीवाकरितां आज सतत वीस वर्षेंपर्यंत मनांत इच्छित राहिलेलें कार्य सर्व वायां जाईल!

(वाद्यांचा गजर पुनरपि ऐकूं येतो.)

**शांति०**—–आला! हा दुष्ट समीप येऊन ठेपला! तरी पण सख्या **सिंहवर्म्या**! आणखी एकवेळ नीट विचार—–

**सिंह०**—–मित्रा! आतां जा कसा! तुझ्याबरोबर मनुष्य देतो तो तुला **वक्रदंष्ट्रा**चे घरीं नेऊन पोंचवील, व तेथें तुझा कोणाला संशयही येणार नाहीं!—हो, बरें आठवलें!—

तूं अगोदर माझ्या प्रियेकडे जा! मी आतां जो हा घातक विचार मनांत आणिला आहे, तो तिला कळेल तर तिच्या शोकास पारावार नाहींसा होऊन माझ्या हातून तिचें समाधानही होऊं शकणार नाहीं! यासाठीं तूंच जाऊन तिच्या कोमळ मनास हळूहळू बोध करून तिला समाधान वाटे असें कर! हें मींच करायला पाहिजे होतें, परंतु तें करीत असतां माझ्या हृदयाची काय भयंकर स्थिति होईल हें कांहीं सांगतां येत नाहीं!—याकरितां हर प्रयत्नानें माझ्यावर हा प्रसंग येऊं देऊं नको! (दोघे जातात.)

---

## अंक २.

**प्र० १.—स्थळ पूर्वीचेंच. सिंहवर्म्याच्या घरांतील एक दिवाणखाना.**

(सुलोचना व शांतिवर्मा येतात.)

**सुलो०**—शांतिवर्म भावोजी! एकूण माझा बाळ परत आला ह्मणतां? आणखी तो पण अशा स्थितींत? कसें ह्मणतां? तो दुष्ट त्याला या देशचा राजपुत्र समजतो?—पण त्या मेल्याला हा संशय तरी कुठून आला बरें?

**शांति०**—आजच सकाळीं उजाडण्याच्या कांहीं अगोदर एक विश्वासू जासूद अंधारांत कोणाच्या दृष्टीस न पडतां **कासिमा**च्या तळावरून निघाला. तो येतांना **पंचगांग**सैन्यांतही गेला होता, त्याच्याकडून मला सगळी हकीकत कळली. त्याच्या सांगण्यांत **शूरसेन** **पंचगांग**सैन्याच्या तळांत पोंचल्यावर त्यावरील सरदारास भेटून त्यानें आपली सर्व हकीकत त्यास कळविली. त्या शूर सरदारास ती हकीकत कळतांच हा **सिंहवर्म** महाराजांचा छावा ह्मणून त्यानें एकदम जाणिलें, व मोठ्या आनंदानें **शूरसेना**चा सत्कार करून त्यास आपणाजवळ राहून घेतलें! त्यानें त्याला शस्त्रास्त्रें पाहिजे होतीं तीं सर्व यथास्थित देऊन आपल्या सैन्याबरोबर लढाईंत शिरण्यासही त्याच्याच मागणीवरून त्याला परवानगी दिली!

**सुलो०**—शाबास बाळा! शाबास! आतां मात्र तुजमुळें मी वीरमाता झालें खरी! भावोजी! एकूण माझा बाळ पराक्रमी निघाला अं? बरें मग पुढें काय?

**शांति०**—पुढें काय, त्याची ती उत्कट युद्धेच्छा पाहून त्या शूर सरदारास अत्यानंद झाला, मात्र त्यानें हा **सिंहवर्म**जींचा पुत्र ह्मणून आपणास वाटत असल्याचें कोणासही कळूं दिलें नाहीं! तथापि लोक काय विचारतां? त्यांनीं आपआपसांत खडानूखडा बातमी गोळा केली. हा अमुक, याला असें काढून नेलें, व त्याचें त्यालाही न कळूं देतां त्याची एकांत स्थळीं जोगवणूक केली, इत्यादि गोष्टी ज्याच्या त्याच्या तोंडीं झाल्या. पुढें आली लढाईची वेळ, त्या वेळीं तर या बालवीरानें फारच अद्भुत चमत्कार करून दाखविले. त्याची त्या वेळची वीरश्री, त्याचें तें सदाचारसंपन्न वर्तन इत्यादि पाहून त्या सरदाराच्या मनाचा पहिला ग्रह बदलला, व त्याला **शूरसेन** हा प्रत्यक्ष **वीरोत्तंस**बाळच वाटूं लागून त्यानें त्याच्या सत्कारांची परमावधि केली, व प्रेमानें त्यास वरचेवर आलिंगनही दिलें!

**सुलो०**—भावोजी ! माझ्या बाळाचा हा पराक्रम ऐकून त्याला केव्हां आलिंगन देईन असें मला झालें आहे! भावोजी ! त्याला पहाण्याकरितां मी त्या दुष्ट शत्रूंच्या गर्दींत घुसण्यासही मागें पुढें पहाणार नाहीं! तो इथें नव्हता तरी आपलें मला वाटत असे कीं, माझा बाळ केवळ प्राणनाथांच्या सद्गुणांचेंच अनुकरण करील, व तेंच शेवटीं खरें ठरलें! जातीचा वीर तो असा लपून कुठला रहायला? तो केव्हांना केव्हां तरी बाहेर पडायचाच! चिंता नाहीं ! त्याच्या हातापायांत त्या मेल्यानें बिड्या घातल्या असल्या तरी त्या तो मुकाट्यानें सहन करणार नाहीं, व आपल्या वीरश्रीच्या भाषणांनीं त्या मेल्या **मुसंड्या**ला चिडवून त्याला आपले प्राणही घ्यायला लावील! अशा वेळीं भावोजी ! तुह्मांला काय सांगूं ? मीच जवळ असून त्याचें रक्षण करीन ! व त्याला अशी घट्ट मिठी मारून माझ्या बाळाला त्या मेल्या **कृतां**ताचा विटाळही होऊं देणार नाहीं !

**शांति०**—वहिनी ! तुह्मीं ह्मणतां या सर्व गोष्टी खऱ्या ! मातृप्रेमच अजब, त्याविषयीं माझें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु त्या प्रेमाच्या भरांत जर तुह्मीं **शूरसेन** आपला पुत्र ह्मणून सांगूं लागाल, तर मग त्या हतभाग्य राजपुत्राचें संरक्षण कसें व्हावें ? तुह्मीं ह्मणतां ही गोष्ट जर केली, तर आपल्या **वीरोत्तंस** महाराजांची आजच शंभर वर्षें भरलीं ह्मणावें लागेल !

**सुलो०**—कांहीं ह्मणा, पण माझा बाळ जगलाच पाहिजे ! **वीरोत्तंस** महाराजांचे प्राण रक्षण व्हायला माझा बाळ मेलाच पाहिजे असें थोडकेंच आहे ? खरेंचका भावोजी ! तुमचें असें का ह्मणणें आहे ? मला नाहीं वाटत असेलसें ! काय ? मी आपल्या बाळाला मरूं देईन काय ? माझ्या प्राणनाथांना ही गोष्ट कळली, तर ते देखील माझ्या बाळानें मरावें ह्मणून कधीं कधीं ह्मणणार नाहींत ! चला पाहिजे तर तिकडेच चला, ह्मणजे पित्याचें प्रेमपुत्रावर कसें असतें हें लागलेंच तुमच्या दृष्टीस पडेल ! ( जाते. )

**शांति०**—थांबा थांबा वहिनी! छे थांबते कशाची ? गेली ! हरहर ! कोण कठिण हा प्रसंग ! एकीकडे पुत्रप्रेम व दुसरीकडे राजभक्ति ! छे छे ! तसें नव्हे दोन्हीही एकीकडेच! आतां याचा उलगडा मात्र कसा व्हावा कांहीं कळत नाहीं!

( जातो. )

---

### प्र० २.—राजवाडा.

( कासिम व परिवार समारंभानिशीं येतात. )

**कासिम**—( परिवारपैकीं एक जणाकडे पाहून ) कसें काय कविराज ! आज या राजवाड्याला माझे पुनरपि पाय लागले, याचें थोडें या आनंदाच्या प्रसंगास साजे असें वर्णन करा पाहूं ?

**कवि**—आज्ञा. बंदा तयार आहे ! साथीकरितां मृदंगादि वाद्यें मागविलीं, ह्मणजे मजकडून तयारी आहे !

**कासिम**—ठीक ! ( सेवकांस खूण करितो. सेवक जाऊन वाद्यें वाजविणारांस वाद्यांनिशीं घेऊन येतात. )

**कवि**—( गातो. )

पद.*

मन धालें हें अजि बघुनि
विजित रिपुतें.
अनुकरितें शमन ( मन० ध्रु० )
कासिम हा अरब महा रिपुकरहा
परतुनि ये गेहा !
बघुनि अहा!नृपतिमहा, अरिजन‘ हा !’
करित पहा !
‘ मुखिं हा जरि हा-लहला अति असह्या
पिववि, तरि करूं स्वाहा!
तों–डां–तू–नी’ ह्मणति ‘ घडल तें
न लव वमन. (मन०)१
काम भलें अजि सरलें, भय नुरलें,
सुखतति ते आले,
अजि कळलें रिपु दमले चरचरले
दरदरले,
श्रमलें भ्रमलें मन हें स्थिर वहिलें
अनुभवु सुखदलीले !
श्री–स्त्री–रं–गीं सतत गढुच तें
द्विषदर्दमन. (मन०) २

कुसीद्—सरकार ! मलाही या प्रसंगीं थोडे गावें अशी इच्छा झाली आहे. हुकूम होईल तर मीही थोड्या दोन ताना घेईन ह्मणतों.

कासिम—आजचा प्रसंग आपले दुष्ट शत्रु खेरीज करून सर्वांना सारखाच आनंदाचा आहे, याकरितां पाहिजे त्याला मनाप्रमाणें वागण्यास मोकळीक आहे.

कुसीद्—( सन्मानपुरःसर गाऊं लागतो. )

पद.*

सिंधुदेशीय जे भूप हे पूर्वींचे
भित्तिचित्रांतरीं लिखित सांचे,
अंतिमा वंशजाची अशी दुःस्थिति,
पाहूनि अश्रुंनें टाकितातीं.
पराभूति त्याची पुरी केलि आजी,
मदा कासिमाची कीर्ति ताजी !

कासि०—हे संपूर्ण शूर सरदारहो !

साकी.

नटवेश्यादिक पाचारुनि अजि
उत्सव पूर्ण करावा,
रिपुहृदयें हीं वर्जुनि इतरीं
उद्धव पूर्ण भरावा.
सण हा अजि आला,
करुं या सुरापानलीला!

कुसी०—सगळ्या गोष्टी खऱ्या, पण सरकार ! अगोदर आपणाला या कैद केलेल्या राजपुत्राविषयीं विचार करणें जरूर आहे!

कासि०—कुसीदा ! खरें बोललास ! हा दुष्ट जिवंत होता ह्मणूनच आज हा त्रास मला भोगावा लागला ! यासाठीं त्याचा अंत केलाच पाहिजे ! तसेंच तो अधम गोडबोल्या सिंहवर्मा—याची आजपर्यंत मीं उपेक्षाच केली, पण आज ह्याला जिवंत ठेवितां उपयोगीं नाहीं !

कुसीद्—सरकार ! माझें मत जर विचाराल, तर आपण सिंहवर्म्याच्या अपराधां-

---

* रा. अंणा किर्लोस्करकृत ‘रणवीरा०’ ही इंग्रजी ब्यांडाच्या चालीवरची कविता पहा. ( संगीत सौभद्र नाटक ). १. यम. २. शत्रूपासून कर हरण करून घेणारा. ३. राजाचा उत्सव. ४. असह्य. ५. ओकणें. ६. शत्रूंकडून ज्याचें दमन होणार नाहीं असें.

* ‘मला शांत मुनि०’ या पदाच्या चालीवर. १. शेंवटल्या. २. आनंद.

ची गयच करावी ! आपण ह्मणतां त्याप्रमाणें तो गोडबोल्या खरा, व ह्मणूनच त्यानें आपल्या सर्व प्रजांचीं मनें आपणाकडे ओढून घेतलीं आहेत ! त्याचा जर आपण अंत केलात, तर या देशांतील संपूर्ण प्रजेस आपण त्यांच्या धर्माचा नाश करणार असें वाटून, ते एकेकटे निर्बळी असतांही एकवटून महान् अनर्थ करतील ! या अनर्थाची कल्पना पूर्वींही एकवेळ आपल्या अनुभवाला आली आहे, यासाठीं एवढा विचार मात्र आपण अवश्य सोडावा !

कासि०—कुसीदा ! तुझें ह्मणणें खरेंच आहे, व असेंच वागलें पाहिजे ! इत:पर मी ह्या देशांतच कायमचें ठाणें ठेवून पूर्वींप्रमाणें परत जाणार नाहीं ! एवढेंच नव्हे. तर माझ्या बरोबरच्या लोकांनाही या देशांतील लोकांच्या चालीरीतींचें अनुसरण करावयास लावून संपूर्ण राष्ट्राचा एकंकार करून सोडीन !—( पाहून ) हा पहा तो राजपुत्र आला ! कैद झाला आहे, तरी पहा कसा ऐठीनें वीरासारखा येत आहे ! मुद्रा पण पहा कशी हट्टी दिसते आहे ती !

( हाता पायांत बिड्या घातलेला शूरसेन रक्षकांसह येतो. )

कासि०—( त्याला उद्देशून ) कायरे, आजच्या या समरांगणांत माझ्या शूर सैनिकांची निर्दयपणें कत्तल करणारा पुरुष तो तूंच ?

शूर०—होय मीच. मग ह्मणतोस काय ?

कासि०—असा विनाकारण उद्दाम होऊं नकोस! त्या समरांगणांत तूं संचार करीत असतां माझें लक्ष एकसारखें तुजकडे होतें, व आमच्या सैन्याची कडेकोट तयारी असतांही तूं दोन्ही हातांत तरवारी घेतलेला त्यांत घुसून दोहीं बाजूंला कांपाकांप चालविली होतीस ती माझ्या लक्षांत आहे!

शूर०—अरबा ! तूं ह्मणतोस हें खरें असेल, तर तूं हेंही पण पाहिलें असशील, कीं ज्या ठिकाणीं लढाईची अगदीं एक सारखी प्रचंड घनचक्री चालली होती, त्या ठिकाणीं जाण्यालाही हा वीर भ्याला नाहीं ! व या पलीकडल्या समरांगणांत जे सिंधुदेशचे असंख्य वीर मरून पडले आहेत, त्यांत जरी सुदैवानें या देहाचें पतन झालें असतें, तरी तें त्यानें आपल्या पराक्रमानेंच संपादन केलें, असें ह्मणण्यास यत्किंचितही प्रत्यवाय नव्हता !

कासि०—व्यर्थ वल्गना करणें पुरे ! तूं माझ्या राज्याविरुद्ध तरवार काय ह्मणून उपसलीस? आणखी या लढाईंत काय ह्मणून शिरलास?

शूर०—याचें उत्तर फार सोपें आहे ! सत्कृत्य करण्याविषयीं आसक्ति, या हतभाग्य सिंधु देशांतील दीन प्रजेची त्वां अधमानें केलेली विपत्ति, आणि जुलमी राजांविषयीं अंत:करणपूर्वक द्वेष या तिहींमुळें मी या लढाईंत शिरलों !

कासि०—वाचाटा ! तोंड संभाळून बोल ! खचित, तूं बोलतोस हे तुझे स्वत:चे शब्द नसावेत ! ते कोणीं तरी तुला शिकविले आहेत!—कुसीदा! एकदम जा आणि त्या ढोंगी धर्मलंडाला असेल तसा घेऊन ये! (कुसीद जातो.) दुष्टा! आतां तुझीं शंभर वर्षें भरलीं ! लढाई करण्याचा तुझा हेतु मी पूर्णपणें ओळखून आहें ! तूं वीरोत्तंस आहेस !

**शूर०**–( आश्चर्यानें ) काय ? मी **वीरोत्तंस** ?

**कासि०**–होय! तूंच–तूंच–**वीरोत्तंस**! तुलाच तुझ्या बाळपणीं मी ठार मारणार असतां दुष्टांनीं कपटानें पळवून दूर देशीं एकांत स्थळीं नेऊन ठेविलें, व तोच तूं आतां मोठा होऊन हा बंडावा मांडण्यासाठीं त्या दुष्टांच्या साह्यानें परत आला आहेस !

**शूर०**–काय ? सिंधुदेशचा शेवटला वंशांकुर **वीरोत्तंस** तो मी? भलतेंच! असें कसें होईल ! **अरबा** ! तूं आणीक पाहिजे तें बोल, परंतु मजसारख्या क्षुद्राला त्या विख्यात महाप्रतापी राजवंशाच्या नांवानें सजवून त्या वंशाचा वृथा उपहास करूं नको ! हा क्षुद्र कीट त्या राजवंशांत कधींही शोभूं शकणार नाहीं ! **अरबा** ! तूं ह्मणतोस त्याप्रमाणें जर मी खरोखरींच **वीरोत्तंस** असतों, तर माझ्या समक्ष त्या विख्यात राजवंशाचा उपहास करण्याची तुझी छातीच झाली नसती ! फार तर काय ? ज्या राजपुत्राचीं मातापितरें व इतर बांधवजन यांचा त्वां दुष्टानें निर्दयपणें वध केला, व ज्याच्या दिव्य राजपदाला विटाळ करून, अधमा ! ह्याच्या संपूर्ण राज्याची राख रांगोळीच करावयास चुकला नाहीं, तो **वीरोत्तंस**बाळ मी असतों, तर माझ्या तेजानेंच तुझे नेत्र एकदम अंध होऊन गेले असते !

**कासि०**–मी पक्केपणीं ओळखून आहें, तुला ज्या गूढ ठिकाणीं नेऊन ठेविलें होतें, त्या ठिकाणीं तुजबरोबर कोणी तरी एकादा बडबड्या पंडित असून त्यानेंच तुझ्या तोंडांत ह्या वृथा गर्वोक्ति बसवून दिल्या आहेत ! चिंता नाहीं! आतां थोडक्याच वेळानें तूंच नाहींसा झालास ह्मणजे त्या सर्व गर्वोक्ति आपोआपच जेथल्या तेथें जिरून जातील! तूं काय समजला आहेस?

**शूर०**–अरे जारे ! नीचा ! मृत्यूला भिणारा हा गृहस्थ नव्हे ! त्याला भिणारे ह्मटले ह्मणजे तुझ्या सारखे पापी अधमच ! ज्यांचें वर्तन निष्पाप, ते मृत्यूच्या त्या लोहशृंखळा व तप्त कढया, यांस कदापि जुमानीत नाहींत ! एवढेंच नव्हे, तर ते खुशाल शांतीनें राहून उलटें मृत्यूला 'ये आणि मित्रभावानें आमच्या हालांचें निरसन कर' ह्मणून प्रार्थनाही करतात !

**कासिम**–वाचाटा ! बडबड पुरे कर ! तुझा आशय समजलों ! प्रत्यक्ष मृत्यूचा अवतार तो मीच असें समज ! तुझे हाल व तुझे क्लेश यांचें अल्पकालांतच निरसन करितों !

( सिंहवर्मा व कुसीद येतात. )

**कासि०**–( सिंहवर्म्याकडे पाहून ) कायरे धार्मिकपणाचा आव घालणाऱ्या ढोंग्या ! तुला यांतली सगळी माहिती आहे ! बोल ! हा हट्टी पोर कोण आहे ?

**सिंह०**–याची प्रामाणिकपणाची मुद्रा व शरीराची एकंदर ठेवण, यांवरून हा चांगला अंतर्गुणी असावा असें वाटतें ! पण त्याची माझी बिलकूल ओळख नाहीं !

**कासि०**–चोरा ! इतका थेरडा झाला आहेस, आणखी या देशांतल्या सगळ्या लोकांचा आपणाला धर्मगुरु ह्मणवितोस, असें असूनही पाप आचरण्याला तुला लवमात्र लज्जा वाटत नाहीं ?

**सिंह०**–**अरबा** ! या देहाला पापाचा अगर पापवासनेचा डागही अद्यापि कसा तो माहित नाहीं ! तूं पक्के ध्यानांत धर हा

देश आर्यांचा आहे ! अनार्य लोकांप्रमाणें पातकें करण्यास या देशांतील लोक अद्यापि तयार झाले नाहींत !

**कासि**०—नीचा ढोंग्या ! तूं हव्या तितक्या गप्पा ठोकल्यास, तथापि त्या सर्व निरुपयोगी आहेत ! आजच्या या लढाईंत जे बंदिवान झाले आहेत, त्यांनीं ही भयंकर आंतली गोष्ट आपल्या तोंडानें कबूल केली आहे कीं, आपण **वीरोत्तंसाला** गादीवर बसविण्याच्या इराद्यानें लढलों !—ऐकतोस कायरे ए पोरा ! तुला तुझ्या धर्माचीच शपथ आहे ! तूं शपथ घेऊन मी तो राजपुत्र नव्हे असें इमानपुरःसर सांगूं शकतोस ?

**शूर**०—काय विचारतोस ? इमानपुरःसर सांगूं शकतों ह्मणून? अधमा ! तुला शंकाही येते ? हा देह तुझ्याप्रमाणें अजून नीच आचरणानें भ्रष्ट झाला नाहीं! तूं विचारतोसच त्याअर्थीं इमानपुरःसर तुला सांगतों, तुझ्या सैन्यामध्यें आपल्या पराक्रमामुळें भीति उत्पन्न करणारा हा देह—याला **शूरसेन** ह्मणतात !

**सिंह**०—( आपणाशीं ) धन्य ! धन्य ! माझा बालक **शूरसेन** तो हाच ! देवा ! धन्य आहेस !

**कासि**०—तूं रहात होतास कोठें ?

**शूर**०—या येथून **हिमालयपर्वताच्या** अतिशय एकीकडच्या गुहेंत, व त्या ठिकाणीं माझें संगोपन तो परमपूज्य वृद्ध गृहस्थ **शांतिवर्मा** करीत असे !

**सिंह**०—( आपणाशीं )हे अधन्य वत्सा ! आतां मात्र तूं आपला नाश करून घेणार ! हायहाय !

**शूर**०—त्या ठिकाणीं आह्मीं दोघे एकटेच असूं! निरंतर वनफलादिकांचा आहार ! अगर साधल्यास क्वचित् मृगयान्न ! अशा रीतीनें आह्मीं त्या ठिकाणीं रहात असतां **शांतिवर्म्यानें** मला उत्तम प्रकारचें धर्मज्ञान, सदाचरणप्रीति, स्वदेशाभिमान व शस्त्रास्त्रविद्या यांचा लाभ करून दिला !

**सिंह**०—( आपणाशीं ) हरहर ! या माझ्या बाळाचा एकेक शब्द कसा माझ्या हृदयाला जणों भाजीतच आंत उतरत आहे !

**कासि**०—बरें, त्यानें तुझा पिता कोण ह्मणून तुला कांहीं सांगितलें ?

**सिंह**०—मी कोण, कोणाचा, येथें कशाकरितां वास करितों, वगैरे गोष्टी मीं त्याला पुष्कळदा विचारल्या, परंतु त्याच्या मनांत काय विचार असेल तो असो, त्यानें मला त्याबद्दलचा बिलकुल जबाब दिला नाहीं ! मात्र एक दोन वेळ मीं अतिशय आग्रह केला, त्यावेळीं तो एवढेंच बोलला:—"**शूरसेना!** तुझा पिता कोण हें कळलें असतां तुझें तुला धन्य वाटण्याचीही कदाचित् पुढें मागें वेळ येईल !"

**कासि**०—ध्यानांत धर, तूं शपथेवर बोलतो आहेस! तूं **सिंहवर्म्याचें** नांव कधीं ऐकलें नाहींस ?

**शूर**०—कोणाचें ? **सिंहवर्म** महाराजांचें ? वाः त्यांच्या नांवाचा आह्मी नेहमी जपच करितों ह्मटलें असतांही चालेल ! इतकी त्यांची स्तुति **शांतिवर्मजी** वारंवार करीत असतात !

**कासि**०—( सिंहवर्म्यास ) अधमा **सिंहवर्म्या** ! तुझ्या पातकाचा घडा भरत आला !

कारण याच्या सांगण्यावरून प्रत्येक गोष्टीचा संबंध तुझ्याशींच जुळून येत आहे !

शूर०–काय ? सिंहवर्म ते हेच !

कासि०–होय ! अधमाधम पातकी अट्टल ढोंगी ते हेच ! त्यांला पाहिजे तर घे पोटभर पाहून !

शूर०–सिंहवर्म महाराज ! मी असा शृंखलाबद्ध आहें, तथापि तशा स्थितींतच आपणास नम्रपणें हें वंदन करतों याचा कृपा करून स्वीकार करावा !

कासि०–अरे नीचा ! तूं अपराधी असें पूर्णपणें शाबीत झालें आहे ! तूं आजपर्यंत मजशीं केलेलें कपटवर्तन संपूर्ण उघडकीस आलें आहे !–अधमा ! आतां करतोस कीं नाहीं कबूल, हा तुझ्या पुढें बंदिवान उभा आहे, हाच त्या तुझ्या नीच दाहिराचा शेवटला वंशज ह्मणून ? शहाणा असशील तर मुकाट्यानें खरा खरा प्रकार कबूल कर ! नाहीं तर विनाकारण स्वजनांचा जास्ती जास्ती नाश मात्र करून घेशील ! तूं कबूल केलेंस तर बरें, नाहीं तर मी नांवाचा कासिम आहें, या राज्यांतील एकूण एक तरुण पुरुषाची कत्तल करवीन ! कधीं सोडणार नाहीं ! व असें झालें ह्मणजे, तो तुझा राजपुत्र कोठें कोनाकोंपऱ्यांतही असला, तथापि इतरांबरोबर तोही बळी पडल्याखेरीज कदापि रहाणार नाहीं ! ज्या ठिकाणीं कपट दिसूं लागलें, त्या ठिकाणीं असेंच वागलें पाहिजे ! कुसीदा ! मी हुकूम करतों त्याप्रमाणें तावडतोब व्यवस्था ठेव !

( दोघे एकीकडे बोलत राहतात. )

सिंह०–(आपणाशीं) हे हृदया ! तूं क्रूर होतें आहेस, तरी तें सत्कार्याकरितांच आहे, यासाठीं हे शोकाश्रु तुला टाकून दिलेच पाहिजेत ! पितृवात्सल्यामुळें तुला कितीही दुःख वाटलें, तरी तें या वेळीं मुकाट्यानें गिळच ! (मोठ्यानें) अरबा ! ऐकतोस ?––हायहाय ! याचें तारुण्य–याची मुद्रा–याच्या तोंडचे शब्द–यांच्या योगानें माझें धैर्यच नाहींसें होऊन जातें !

कासि०–नीचा ढोंग्या ! तावडतोब सगळा मजकूर बोलतोस की नाहीं ?

सिंह०–हायहाय ! अरबा ! तुला काय सांगूं ? याच्याशीं आजपर्यंत जें माझें वर्तन झालें, तें केवळ खऱ्या खऱ्या राजभक्तीनें प्रेरित असेंच होतें, याच्या पलीकडे नव्हतें, तर यांत माझा काय दोष ?

कासि०–( आनंदानें ) एकूण तूं हाच तो राजपुत्र ह्मणून कबूल करतोस तर ? ओहो ! कासिमा ! या वेळीं तुझी धन्यता किती ह्मणून वर्णावी ? आज तुझा या संपूर्ण सिंधुराष्ट्रावर जय झाला असून या वीरोत्तंसाच्या वधानें तुझीं संपूर्ण भावी भयें विलयास गेलीं ! कुसीदा ! पहातोस काय ? या क्षणीं उचल या पोराला, आणि वधस्थानीं नेऊन चांडालांकरवीं यांचा शिरश्छेद करीव ! ह्मणजे इतःपर भीतीचें ह्मणून कारण उरायला नको ! जा तूं ! मीही आतां मंदिरांत जाऊन यथेच्छ मद्योत्सव अनुभवितों ! ( सेवकांसहवर्तमान जातो. )

सिंह०–अभूनो ! आतां खुशाल वहात रहा, ह्मणजे तरी दुःखशोकानें कल्लोलमय होऊन गेलेल्या माझ्या हृदयाचें कांहीं समाधान होईल ! हाय हाय !

शूर०–सिंहवर्म महाराज ! आपण मजकरितां हा शोक करणें टाकून द्या ! मजसा-

रखा एकठ्या अभाग्याचे प्राण जाऊन त्यायोगें जर संपूर्ण राष्ट्राचें कल्याण होत आहे, तर माझे प्राण मी मोठ्या आनंदानें देतों! हा क्षुद्र देह राजवंशाचा असेल असें माझ्या बुद्धीला वाटत नाहीं, तथापि तो तसा आहे हें जर खरें असेल, तर त्याच्या एवढ्या एका साहसाच्या योगें संपूर्ण राष्ट्राचा बचाव व्हावा हें कृत्य लहान सहान काय? तो फार दिवस जगून तरी काय करणार? निरंतर दुःखांत आणि क्लेशांतच त्याचे दिवस जाणार कीं नाहीं? मग त्यापेक्षां हा आत्तांचा प्राणांत होतो हा काय वाईट?—चलरे मला वधस्थानीं घेऊन चल! (पडदा पडतो.)

---

**प्र० ३.—सिंहवर्म्याचें घर.**

(सिंहवर्मा एकटाच प्रवेश करितो.)

**सिंह०**—काय चमत्कार! शूरसेनाचा आवाज अगदीं थेट माझ्या प्रियेच्या वळणावर, आणि मुद्रा तर तीच, यांयोगें माझें काळीज कसें द्विधा होतें! परंतु उपाय काय? तो या प्रसंगीं मेलाच पाहिजे! हे अधमा अरबा! या हतभाग्य क्षुद्रजन्म्या बाळावर पाहिजे तितका सूड उगवून घे, तेवढ्यानें जर या संपूर्ण सिंधुदेशच्या राज्यासनाची पुनरपि संस्थापना होणार, तर आपला राजा, आपली भूमाता, व प्रत्यक्ष बुद्धिदाता परमेश्वर, या सर्वांच्या ऋणांतून माझा बाळक मुक्त होतो, एवढाच मी लाभ मानितों!

(धनपाळ येतो.)

**धन०**—रस्त्यांतून वधस्थानाकडे नेतांना तो तरुण पुरुष आतांच मीं पाहिला. व वीरोत्तंसबाळ तो हाच, असेंच ज्याच्या त्याच्या तोंडांतून उद्गार निघत असून, तो राजपुत्र हाच ह्मणून आपण आपल्या तोंडानें कळविल्याचें लोक बोलतात, याचा अर्थ काय बाबा?

**सिंह०**—बाळा! आणीक जवळ ये कसा! बाळा! याक्षणीं मज ह्मातार्‍याला दुःखानें कसें चोंहीकडून घेरलें आहे, हें पहातोसना तूं?

**धन०**—होय पहातों; पण आपण हाच तो राजपुत्र ह्मणून कबूल करून विनाकारण त्याला मृत्यूच्या आधीन केलें हें चांगलें का?

**सिंह०**—वत्सा! तुला अजून अनुभव नाहीं! मी तुझा बाप, त्याच्या मस्तकावर कसे वज्रपाय अनर्थ येऊन पडूं पहात आहेत, याचा मनांत विचार करून पहा, ह्मणजे प्रत्यक्ष तुझेही प्राण धोक्यांत आहेत ह्मणून तुझें तुलाही वाटेल!—बाबारे! माझ्यावर का एक वेळ मरणाची पाळी आली, कीं मागून माझ्या पुत्रावरही ती आलीच समज!

**धन०**—असें जर खरें, तर बाबा! मला खुशाल मरूं द्या! त्या सर्वसाक्षी नारायणाची शपथ, जर माझा मृत्यु झाला असतां त्या दुष्ट कासिमाचा कोप शांत होतो आहे, तर मी आपले प्राण खुशाल बळी देतों! यापरतें मला दुसरें कांहीं नको!

**सिंह०**—वत्सा! अरे, बोलून चालून तो मुलगा तिऱ्हाईत, त्याच्याकरितां का तूं आपले प्राण देणार?

**धन०**—काय ह्मणतां? बाबा! आमचा प्रत्यक्ष राजा तो, त्याला आह्मीं तिऱ्हाईत समजावें

कारण याच्या सांगण्यावरून प्रत्येक गोष्टीचा संबंध तुझ्याशींच जुळून येत आहे !

शूर०–काय ? सिंहवर्म ते हेच !

कासि०–होय ! अधमाधम पातकी अट्टल ढोंगी ते हेच ! त्यांला पाहिजे तर घे पोटभर पाहून !

शूर०–सिंहवर्म महाराज ! मी असा शृंखलाबद्ध आहें, तथापि तशा स्थितींतच आपणास नम्रपणें हें वंदन करतों याचा कृपा करून स्वीकार करावा !

कासि०–अरे नीचा ! तूं अपराधी असें पूर्णपणें शाबीत झालें आहे ! तूं आजपर्यंत मजशीं केलेलें कपटवर्तन संपूर्ण उघडकीस आलें आहे !–अधमा ! आतां करतोस कीं नाहीं कबूल, हा तुझ्या पुढें बंदिवान उभा आहे, हाच त्या तुझ्या नीच दाहिराचा शेवटला वंशज ह्मणून ? शहाणा असशील तर मुकाट्यानें खरा खरा प्रकार कबूल कर ! नाहीं तर विनाकारण स्वजनांचा जास्ती जास्ती नाश मात्र करून घेशील! तूं कबूल केलेंस तर बरें,नाहीं तर मी नांवाचा कासिम आहें, या राज्यांतील एकूण एक तरुण पुरुषाची कत्तल करवीन ! कधीं सोडणार नाहीं ! व असें झालें ह्मणजे, तो तुझा राजपुत्र कोठें कोनाकोंपऱ्यांतही असला, तथापि इतरांबरोबर तोही बळी पडल्याखेरीज कदापि रहाणार नाहीं! ज्या ठिकाणीं कपट दिसूं लागलें,त्या ठिकाणीं असेंच वागलें पाहिजे! कुसीदा! मी हुकूम करतों त्याप्रमाणें तावडतोब व्यवस्था ठेव !

( दोघे एकीकडे बोलत राहतात. )

सिंह०–(आपणाशीं) हे हृदया! तूं क्रूर होतें आहेस, तरी तें सत्कार्याकरितांच आहे, यासाठीं हे शोकाश्रु तुला टाकून दिलेच पाहिजेत! पितृवात्सल्यामुळें तुला कितीही दुःख वाटलें, तरी तें या वेळीं मुकाट्यानें गिळच! (मोठ्यानें) अरबा! ऐकतोस ?–-हायहाय! याचें तारुण्य–याची मुद्रा–याच्या तोंडचे शब्द–यांच्या योगानें माझें धैर्यच नाहींसें होऊन जातें !

कासि०–नीचा ढोंग्या ! तावडतोब सगळा मजकूर बोलतोस कीं नाहीं ?

सिंह०–हायहाय ! अरबा ! तुला काय सांगूं? याच्याशीं आजपर्यंत जें माझें वर्तन झालें, तें केवळ खऱ्या खऱ्या राजभक्तीनें प्रेरित असेंच होतें, याच्या पलीकडे नव्हतें, तर यांत माझा काय दोष ?

कासि०–( आनंदानें ) एकूण तूं हाच तो राजपुत्र ह्मणून कबूल करतोस तर ? ओहो ! कासिमा ! या वेळीं तुझी धन्यता किती ह्मणून वर्णावी ? आज तुझा या संपूर्ण सिंधुराष्ट्रावर जय झाला असून या वीरोत्तंसाच्या वधानें तुझीं संपूर्ण भावी भयें विलयास गेलीं ! कुसीदा ! पहातोस काय? या क्षणीं उचल या पोराला, आणि वधस्थानीं नेऊन चांडालांकरवीं यांचा शिरश्छेद करीव! ह्मणजे इतःपर भीतीचें ह्मणून कारण उरायला नको ! जा तूं ! मीही आतां मंदिरांत जाऊन यथेच्छ मद्योत्सव अनुभवितों ! ( सेवकांसहवर्तमान जातो. )

सिंह०–अश्रूंनो ! आतां खुशाल वहात रहा, ह्मणजे तरी दुःखशोकानें कल्लोळमय होऊन गेलेल्या माझ्या हृदयाचें कांहीं समाधान होईल!हाय हाय !

शूर०–सिंहवर्म महाराज! आपण मजकरितां हा शोक करणें टाकून द्या ! मजसा-

रखा एकल्या अभाग्याचे प्राण जाऊन त्यायोगें जर संपूर्ण राष्ट्राचें कल्याण होत आहे, तर माझे प्राण मी मोठ्या आनंदानें देतों! हा क्षुद्र देह राजवंशाचा असेल असें माझ्या बुद्धीला वाटत नाहीं, तथापि तो तसा आहे हें जर खरें असेल, तर त्याच्या एवढ्या एका साहसाच्या योगें संपूर्ण राष्ट्राचा बचाव व्हावा हें कृत्य लहान सहान काय? तो फार दिवस जगून तरी काय करणार? निरंतर दुःखांत आणि क्लेशांतच त्याचे दिवस जाणार कीं नाहीं? मग त्यापेक्षां हा आत्तांचा प्राणांत होतो हा काय वाईट?—चलरे मला वधस्थानीं घेऊन चल! ( पडदा पडतो. )

---

## प्र० ३.—सिंहवर्म्याचें घर.

( सिंहवर्मा एकटाच प्रवेश करितो. )

**सिंह०**—काय चमत्कार! शूरसेनाचा आवाज अगदीं थेट माझ्या प्रियेच्या वळणावर, आणि मुद्रा तर तीच, यांयोगें माझें काळीज कसें द्विधा होतें! परंतु उपाय काय? तो या प्रसंगीं मेलाच पाहिजे! हे अधमा अरबा! या हतभाग्य क्षुद्रजन्म्या बाळावर पाहिजे तितका सूड उगवून घे, तेवढ्यानें जर या संपूर्ण सिंधुदेशच्या राज्यासनाची पुनरपि संस्थापना होणार, तर आपला राजा, आपली भूमाता, व प्रत्यक्ष बुद्धिदाता परमेश्वर, या सर्वांच्या ऋणांतून माझा बाळक मुक्त होतो, एवढाच मी लाभ मानितों!

( धनपाळ येतो. )

**धन०**—रस्त्यांतून वधस्थानाकडे नेतांना तो तरुण पुरुष आतांच मीं पाहिला. व वीरोत्तंसबाळ तो हाच, असेच ज्याच्या त्याच्या तोंडांतून उद्गार निघत असून, तो राजपुत्र हाच ह्मणून आपण आपल्या तोंडानें कळविल्याचें लोक बोलतात, याचा अर्थ काय बाबा?

**सिंह०**—बाळा! आणीक जवळ ये कसा! बाळा! याक्षणीं मज ह्मातार्‍याला दुःखानें कसें चोंहीकडून घेरलें आहे, हें पहातोसना तूं?

**धन०**—होय पहातों; पण आपण हाच तो राजपुत्र ह्मणून कबूल करून विनाकारण त्याला मृत्यूच्या आधीन केलें हें चांगलें का?

**सिंह०**—वत्सा! तुला अजून अनुभव नाहीं! मी तुझा बाप, त्याच्या मस्तकावर कसे वज्रपाय अनर्थ येऊन पडूं पहात आहेत, याचा मनांत विचार करून पहा, ह्मणजे प्रत्यक्ष तुझेही प्राण धोक्यांत आहेत ह्मणून तुझें तुलाही वाटेल!—बाबारे! माझ्यावर का एक वेळ मरणाची पाळी आली, कीं मागून माझ्या पुत्रावरही ती आलीच समज!

**धन०**—असें जर खरें, तर बाबा! मला खुशाल मरूं द्या! त्या सर्वसाक्षी नारायणाची शपथ, जर माझा मृत्यु झाला असतां त्या दुष्ट कासिमाचा कोप शांत होतो आहे, तर मी आपले प्राण खुशाल बळी देतों! यापरतें मला दुसरें कांहीं नको!

**सिंह०**—वत्सा! अरे, बोलून चालून तो मुलगा तिर्‍हाईत, त्याच्याकरितां का तूं आपले प्राण देणार?

**धन०**—काय ह्मणतां? बाबा! आमचा प्रत्यक्ष राजा तो, त्याला आह्मीं तिर्‍हाईत समजावें

काय ?—बाबा ! तुमच्या बोलण्याचा असा आशय खचित नसेल! कदाचित् माझी वीरश्री जागृत करण्याकरितां आपण हें भाषण करीत असाल, तर आपणच मला सांगा, ज्या ठिकाणीं देशाभिमान व सत्यप्रीति यांचीच वास्तविक जरूर होती, अशा ठिकाणीं धाडसानें पुढें जाण्यास हा **धनपाळ** कधीं तरी मागें सरला आहे काय? बाबा! आपला देश व त्याचें स्वातंत्र्य यांकरितां लढण्याची वेळ आली असतां त्यावेळीं यःकश्चित् मृत्यूला भिऊन पाऊल परत घेणें हें कृत्य परम अधम नीचाचें असें नाहीं का आपल्याला वाटत ? बाबा ! मी तरी निदान असेंच समजतों, व याकरितां आपले प्राण आनंदानें अर्पण करितों !

**सिंह०**—किती प्रौढ हें भाषण ! तथापि बाळा ! या भाषणाचा लवमात्रही उपयोग होण्याची अशा राहिली नाहीं ! मी त्या दुष्ट **अरबाला** पुरा ओळखतों ! या वेळीं शांतवृत्ति धारण केल्याशिवाय परिणाम नाहीं, समजलास ?

**धन०**—बाबा ! आपण हें भलतेंच काय प्रतिपादन करतां ? आपण जर नुसती इच्छा प्रदर्शित केली, तर या सिंधुभूमींतील प्रत्येक प्रामाणिक मनुष्य अद्यापि हातीं तरवार घेऊन उठेल; व राजवाड्यांत कडेकोट बंदोबस्त असला, तरी त्याची शिबंदी फोडून वाड्यांत शिरून त्या दुष्टाचा अंत करूं शकेल ! यदा कदाचित् हा यत्न फसला, व आज इतके लक्षशः शूर लोक मेले त्यांच्याच भरतीला आणखीही लोक गेले, तथापि ते वीराच्या मृत्यूनेंच मरतील यांत संशय नाहीं ! देशमातेचा अंत होण्याचा समय आला असतां भागूबाईप्रमाणें जिवंत राहून अब्रू मळविण्यापेक्षां तिच्याबरोबरच आपलेंही देहावसान करून घेणें यांतच काय तें खरें भूषण आहे ! **वीरोत्तंस** महाराजांचा जर करितां नाश होऊं दिला, तर पुनरपि म्हणून या देशानें वर डोकें काढायलाच नको आहे ! तो जिवंत असला, तरच काय ती या देशाला पुढेंमागें तरी स्वातंत्र्य मिळूं शकण्याची आशा! नाहीं तर हा देश कायमचा दास्यांत बुडून जाऊन जिकडे पहावें तिकडे जारण, मारण, जुलूम, व झोटिंग पाच्छाई, यांशिवाय दुसरें कधींच कांहीं असणार नाहीं !

**सिंह०**—बाळा **धनपाळा** ! ही तुझी वीरोक्ति ऐकूनच जिवाचें समाधान होतें ! ये बाळा! मला एकवार कडकडून भेट !—बाळा! इतका वेळ मी तुजपाशीं खरा प्रकार बोललों नाहीं, पण आतां बोलतों,—**वीरोत्तंस** महाराजांचें रक्षण अद्यापि त्यांचा हा दीन सेवक करीत असून ते अगदीं खुशाल आहेत ! त्यांना काडीमात्र भिण्याचें कारण नाहीं !

**धन०**—एकूण तर हा कैद झालेला तरुण पुरुष खरा राजपुत्र नव्हे ?

**सिंह०**—तो कोणीकडे कोना कोंपऱ्यांत जन्मलेला, त्याच्या मरणानें देशाचें थोडकेंच नुकसान होणार आहे ?

**धन०**—तरी पण त्याच्या त्या तरुणवयाकडे पहातां त्याला अकालीं मरण येऊं देणें, म्हणजे मला कसेंसेंच वाटतें! आणखी दुसरी एक गोष्ट माझ्या मनाला भासली आहे— कदाचित् माझी समजूत चुकीचीही असेल—

परंतु त्याच्या तोंडवळा कायसासा माझ्या आईच्या तोंडवळ्यासारखा मला वाटतो !

सिंह०—( आपणाशीं )हरहर ! या बाळाचे हे शब्द तर माझ्या हृदयास असह्य डागच देताहेत ! हायहाय !

धन०—बरें तें एक राहिलें, तरी पण आपले खरे वीरोत्तंस महाराज ते कुठेंसे आहेत ? मला खचित वाटतें, त्यांना जर कळेल कीं आपल्याकरितां हा निरपराधी पुरुष फुकट मारला जात आहे तर ते त्याला खचित मरूं देणार नाहींत !

सिंह०—वीरोत्तंस महाराज कुठें आहेत हें जाणण्याविषयीं इतक्यांतच खटपट करूं नको ! कारण या क्षणीं त्या दुष्ट कासिमाचा सूड उगविण्याबद्दलच्या एका व्यूहाची घटना चालू आहे ती मी तुला सांगतों. ही घटना आज कैक वर्षें मी करतों आहें, पण त्याची आज संधि आली ! फार काय सांगूं ? अगदीं या—या—क्षणीं देखील त्या दुष्ट कासिमाचा निःपात करण्याच्या तजविजी चालू आहेत !

धन०—कसें ह्मणतां बाबा ! त्या दुष्टाचा निःपात ?

सिंह०—थांब, तुला सर्व हकीकत सांगतों. त्या दुष्टानें आज प्रातःकाळीं ज्यावेळीं आपलें सैन्य नगराबाहेर नेलें, व त्याबरोबरच या नगरांतील तरुण लोकांसही बाहेर काढीत चालला, त्या वेळीं संधि साधून कित्येक निवडक असामींस गांठून मीं त्यांचीं मनें वळविलीं, व त्यांचा सर्वांचा यावेळीं असा विचार ठरला आहे कीं आजच्या या लढाईमध्यें जय पावलेला मदोन्मत्त दुष्ट तो कासिम चाकरमाणसांसुद्धां रात्रीं यथेच्छ मद्यपानानें धुंद होऊन जाऊन मेल्याप्रमाणें पडला, ह्मणजे ती संधि साधून राजवाड्यावर एकदम हल्ला करायचा, व ज्याप्रमाणें एकाएकीं मेघगर्जना, पर्जन्य, व प्रचंड विद्युत्पात यांच्या योगानें चोंहींकडे दाणादाण उडून जावी, त्याप्रमाणें राजवाड्यांतलि शत्रूच्या लोकांची दाणादाण करून टाकायची !

धन०—वाहवा ! बाबा ! हें सर्व कृत्य—

सिंह०—बाळा! आतां वेळ घालवित बसूं नको! एकदम देवळांत जाऊन माझे मित्र वक्रदंष्ट्र व सुधन्वा हे देवळाच्या गाभाऱ्यांत अंधारांत लपून बसले असतील त्यांना गांठ, व त्यांना धैर्य व उत्साह हीं न सोडण्याविषयीं सांगून असेंही सांग, कीं हा सिंहवर्मा अगदीं जीर्ण मृत्तिकेप्रमाणें जर्जरदेह झाला, तथापि त्या दुरात्म्याच्यानें या सिंहवर्म्याच्या निश्चयांत ह्मणून कदापि अंतर पाडणें होणार नाहीं !

( पडद्यांत सुलोचनेचा शब्द ऐकूं येतो. )

सुलो०—कोण हें राक्षसी कृत्य ? आणखी प्राणनाथांच्याच हातून हें झालें ह्मणतां ? बोला ! मला नाहीं खरें वाटत ! ही मी त्यांनाच जाऊन विचारतें.

सिंह०—काय ! ही प्रियाच बोलते ? धनपाळा! यावेळीं जा तूं, आणि मी सांगितल्या प्रमाणें वर्तन कर ! ( धनपाळ जातो ) ( पडद्याकडे पाहून ) हरहर ! काय ही इची भयंकर स्थिति झाली आहे ! अत्यंत वेगवान् असा झंझावातही इच्या या आवेगामुळें कंप पावणाऱ्या देहापुढें कांहींच नाहीं! हिला मीं केलेला निश्चय कळला असून

निराश होत्साती ही पुत्राचे प्राण वांचवा ह्मणून ह्मणण्यास येत आहे ! शिवशिव !

(सुलोचना येते.)

सुलो०—प्राणनाथ ! मी ऐकतें हें खरेंच काय ? एकूण आपण दया, माया, हृदयांतून चट सारीं काढून टाकिलीं? प्राणनाथ! जो तो आपण अमानुष कृत्य केलें ह्मणतो, त्याप्रमाणें आपण खरोखर अमानुष बनलां काय ?

सिंह०—प्रिये सुलोचने ! या दग्ध हृदयाला अगोदरच खोल व असह्य जखमा झाल्या आहेत, त्या या तुझ्या भाषणानें जास्ती नको गे करूं ? आधींच माझ्या या जीवात्म्याला लक्षशः वेदना होत आहेत, त्या कृपा करून नको वाढवूं !

सुलो०—शांतिवर्म भावोजींची आणि माझी गांठ पडली होती, त्यांनीं तुमच्या मनांतला एकूण एक घातुक विचार मला सांगितला !

सिंह०—माझ्यानें तुजजवळ बोलवत नाहीं !

सुलो०—प्राणनाथ! आपण आणखी कितीही शोक केलात, तरी तो मला वरकरणीच वाटतो! अशा खोटसाळ शब्दांनीं आपणाला वाटतें, मातृप्रेम दडून राहील ? कधीं रहाणार नाहीं ! तुमचें हें कृत्य ऐकल्यापासून मला अगदीं वेडावल्यासारखें होऊं लागलें आहे ! माझ्या पुत्राचा बचाव न होईल, तर माझ्या आरोळ्या वर आकाशमंडपाला जाऊन भेदीत रहातील ! हे केंस मुळासकट उपटूं लागून मी आपली छाती बडवून घेईन, व स्त्रीपुरुषें हें सर्व नातें विसरून जाऊन तुमचें आणि माझें जीवन उभयतांसही असह्य करून सोडीन! तुमचें माझें कधीं पटायचें नाहीं ! निरंतर भांडणें, शोक, काळजी, पश्चात्ताप हींच तुमच्या व माझ्या हृदयास खिळून रहातील !—

सिंह०—प्रिये ! आजपर्यंत गृहिणीधर्म जिनें लेशमात्र सोडिला नाहीं, त्या तुला आज काय वेड लागलें आहे हें ?—प्रिये ! तुला एकदा सांगितलेंना, माझें दुःख विनाकारण दुणावूं नको ह्मणून? मग असें कसें बरें करतेस ?

सुलो०—मला हें तें कांहीं समजत नाहीं ! माझा प्रियपुत्र मला परत आणून द्या- नाहीं तर तुह्मांला मी त्या कासिमापेक्षां, ही वाईट समजेन ! प्राणनाथ ! या वेळीं माझा अंतरात्माच माझ्या स्वाधीन कसा तो नाहीं ! बोला ! माझा बाळ मला तुह्मीं परत आणून देतां कीं नाहीं ? मला तो या क्षणीं मिळालाच पाहिजे! त्याला केव्हां कडकडून मिठी घालीन असें मला झालें आहे !

सिंह०—माझें प्रेम त्या बाळावर खरोखरी किती आहे हें त्या सर्वसाक्षी परमेश्वराला ठाऊक आहे ! तथापि काय करावें ? प्रजाधर्माला जागणें हें पहिलें कर्तव्य, यापुढें माझा इलाज नाहीं ! या हतभाग्य देशाच्या संरक्षणार्थ कुटुंबांतील अल्पस्वल्प व्यक्तीवरील प्रेमही झुगारून द्यावेंच लागतें ! कारण काय ह्मणशील, मी त्या बाळकाचा पिता होण्याच्या पूर्वींपासूनच या राजवंशाची प्रजा होतों ! तेव्हां प्रजाधर्मच मला अगोदर संभाळला पाहिजे !

सुलो०–महाराज ! आपण या वेळीं केवळ राक्षसच बनलां आहां ! आपल्या अंतःकरणांत दयेचा किंवा प्रेमाचा वास कसा तो राहिला नाहीं ! आपण असें निर्दय व्हावें एवढ्याकरितांच का आपला आणि माझा विवाह झाला ? आपणावर या अबलेनें निष्कपट प्रेम ठेविलें, व आपणही तिला निरंतर प्रेमाचींच आश्वासनें देत गेलां, त्यांचा अखेर हाच का परिणाम ? निर्दया! मजकडे नीट रोखून पहा, आणि माझें हें कृश झालेलें शरीर, निस्तेज झालेले हे नेत्र, तुमच्याच करितां दुःखानळानें कोमेजून गेलेलें हे यौवनकुसुम, यांच्यामुळेंच का तुमचें मजवरील प्रेम उडालें हें मला सांगा !

सिंह०–प्रिये ! हे असे कठोर वाग्बाण सोडून माझें हृदय कां बरें विनाकारण विद्ध करतेस ?

सुलो०–हाय हाय रे बाळा ! या आईनें तुला आपल्या कंठाशीं आंवळून धरिलें, तें तुझ्या अंगांतून होणारा रक्तपात बघण्याकरितांच कारे? बाळा! एवढ्याकरितांच कारे तूं परत स्वदेशीं आलास? हायहाय ! बाळा ! अरे बाळा ! तुला या तुझ्या जननीनें अगदीं बाळपणींच वनवासांत पाठविलें तें एवढ्याचकरितां कायरे? बाळा!–या तुझ्या अल्पवयांत विजयश्री मिळविण्याच्या हौसेनें तूं असल्या बिकट प्रसंगांत येऊन पडावेंस, आणखी तशा प्रसंगीं तुझ्या निर्दय पित्याच्या क्रौर्यामुळेंच तुजवर प्राणांताचा प्रसंग यावा काय ? प्राणनाथ ! केवढें अघोर कृत्य हें! या बाळाला आपणच जनन देऊन आपणच त्याचा अंत करणार काय ? निर्दयपणें त्याजवर शस्त्र उचला ह्मणणार आपणच ? हाय हाय ! देवा नारायणा ! या दीन हतभाग्य जननीवर केवढा दुर्घट हा प्रसंग ! प्राणनाथ ! या वेळीं मी रागानें बोलत नाहीं ! तरी पण प्रत्यक्ष जननीच्या अंकावरून तिच्या बाळकाला कोणीं ओढून नेऊं लागलें असतां तिच्या बिचारीच्या हृदयाला किती वाईट वाटावें, व तिच्या कोमल अंतःकरणाला कसे डाग बसावेत, याचा आपणच विचार करा !

सिंह०–तूं ह्मणतेस या सर्व गोष्टी खऱ्या, तथापि विचारबुद्धि सोडून आपल्या जीवाचें दुःख वेड्यासारखें कां बरें दुणावून घेतेस ? तुझें ह्मणणें व्यर्थ आहे ! आपला बालक या प्रसंगीं बळी पडलाच पाहिजे !

सुलो०–काय? बळी पडलाच पाहिजे ? ही गोष्ट कध्धीं व्हायची नाहीं !–अशी गोष्ट होण्यापेक्षां–पण–पण–प्राणनाथ ! दुःखावेगानें निराश झालेल्या मातृहृदयास अधिक दुःख कां बरें देतां ?–महाराज ! मातेचें हृदय कसें असावें याची परीक्षा अद्याप आपण पाहिली नाहीं ! ती जर पहाल तर आपणालाही खरोखरी भीतिच वाटेल !

सिंह०–या जीवात्म्याला भीति हा शब्दच मुळीं माहित नाहीं ! तथापि तुझ्या आचरणानें आपला वचनभंग होणार याचें मात्र भय वाटतें आहे !–सुलोचने ! एकूण तूं आपण वाहिलेल्या आणा शपथा सर्व मोडणार अं ?–खुशाल मोड ! विश्वास घातीपणाचा डाग लावून घेऊन या देहाच्या रक्तानेंही आपले हात खुशाल घे विटाळून ! आणखी हूं–आपल्या या परमपूज्य

राजवंशाच्या पुनरुद्धरणाचा तो दिव्य व्यूह- —त्यालाही विघ्नकर्ती हो !—

**सुलो**०—उं:—परम पूज्य राजवंश ! प्राणनाथ ! आपण कसल्या भ्रमांत पडलां आहां हे? सर्व मनुष्यमात्र येथून तेथून सारखे ! एकाच मृत्तिकेनें घडलेले ! असें नसतें तर अत्यंत नीच प्रजाजनांबरोबर त्यांच्याही देहाचें अवसान कां व्हावें ? **यमाचे** ते दूत पुढें येऊन उभे राहिले असतां राव आणि रंक यांमध्यें तो कोणता भेद राहिला? सर्वांबरोबर तेही लयास गेलेच कीं नाहींत ?—उं:—परमपूज्य !—प्राणनाथ! पण राजांना परमपूज्य मानिलें कोणीं ? आपण माणसांनींच कीं नाहीं ?—मग प्रत्यक्ष मातृप्रेमावरच धाड येऊन पडण्याची वेळ आली असतां त्या मनुष्यकृतीला मीं काय ह्मणून जुमानावें ? राजेलोक कांहीं ईश्वरापासून सनद घेऊन आलेले नसतात, मग त्यांच्याकरितां आई, बाप आणि अपत्य या परमेश्वरनिर्मित संबंधांची काय ह्मणून उपेक्षा करावी ?

**सिंह**०—**सुलोचने** ! फार चांगलें बोलायला शिकलीस ! आजपर्यंत या देहानें तुजवर प्रेम ठेविलें, व तुझेंही कांहीं वेळपर्यंत त्याच्यावर परत प्रेम होतें, त्या दोहींचाही शेवट हा असा केलास फार चांगलें केलेंस! आजपर्यंत माझेंच मन वेडें, त्याला जो कांहीं सद्गुण ह्मणून वाटत असे, तो त्यानें तुला अनेक प्रकारें शिकविण्याचा यत्न केला, व तूंही तो आनंदानें शिकत होतीस असें माझ्या मनाला वेडेपणामुळें वाटत होतें! परंतु इतःपर त्याची तूं लवमात्र परवा न करितां, खुशाल या वेळेस निघून त्या **कासिमा**कडे जा, आणि त्याला **ही** भयंकर गुप्त गोष्ट कळीव ! ह्मणजे या देशच्या राजवंशाचा अखेरचा विच्छेद झालेला पाहून तुझे डोळे चांगले निवतील ! तुझा पुत्र तुला आलिंगावयास सांपडून त्यालाही निर्लज्जपणें व अब्रूची चहाड गमावून विकत घेतलेल्या आयुष्याचा दासतेंत राहून चांगला व्यय करण्यास मिळेल! एवढेंच नव्हे, तर आजपर्यंत मजकरितां निरंतर दुःखच करीत राहिल्यामुळें जे नेत्र निस्तेज व अंधुक झाले आहेत, ते नेत्र त्या राजकुलक्षयकर्त्या अधम **कासिमा**च्या सुहास्य वदनाकडे पाहून आनंदानें पुनरपि प्रदीप्त होतील ! जा, खुशाल चालती हो कशी !

**सुलो**०—**प्राणनाथ** ! या **सुलोचने**च्या प्रेमाची आपण हीच का परीक्षा केलीत ? माझी परीक्षाच पहावयाची असली, तर **वीरोत्तंस** महाराजांचे प्राण बांचविण्याकरितां मला पाहिजे त्यापुढें नेऊन उभी करा, न् मी त्या ठिकाणीं आपले स्वतःचे प्राण द्यायला यत्किंचित् तरी डगतें कीं काय तें पहा ! परंतु **वीरोत्तंस** महाराजांबरोबर माझ्या **शूरसेन**बाळाचेही प्राण वांचवा ! तेवढ जर वांचवाल, तर दुसरा कोणता कसाही प्रसंग आला तरी आपणाप्रमाणेंच माझ्याही अंगीं धैर्यादि गुण पूर्णपणें वास करीत आहेत असेंच आपणास अढळून येईल !

**सिंह**०—हें जर खरें आहे, तर फार तर एकवेळ आपल्या मनावर जुलूम कर, आणि आजपर्यंत या जगांत ज्या वीरपत्नी ह्मणून गाजल्या त्यांच्याप्रमाणें आपलीही

कीर्ति अजरामर कर पाहूं ? तूं ज्ञातीच आहेस, तेव्हां तुला सांगितलेंच पाहिजे असा कांहीं प्रकार नाहीं! तथापि सांगतों! तुला **श्रियाळ**पत्नी **चांगुणा** माहितच आहे, तिनें सत्वपालनार्थ आपल्या पुत्राचें ही कंडन केलें ! **कृष्ण**ब्राह्मणाच्या वचनास गुंतून **मयूरध्वज** राजा आपला पुत्र जो **ताम्रध्वज** त्याचें शिरही चिरण्यास तयार झाला !–तेव्हां यावरून तूं एवढें पक्कें समज कीं, साक्षात् परमार्थ व परहित साधण्याकरितां पुत्रप्रेमासारखीं व्यक्तिविशेषांवरील प्रेमेंही झुगारून देणें हाच खरा पुरुषार्थ ! व निरंतर लोकस्तवास पात्र होणारे ते जन असेच !

**सुलो०**–प्राणनाथ! आपण ह्मणतां त्या गोष्टी मला ठाऊक आहेत, तथापि पुत्रप्रेमापुढें मला त्या कबूल करतां येत नाहींत ! **वीरोत्तंस** महाराजांचे प्राण रक्षण करण्याची मीं शपथ घेतली आहे, तथापि प्रत्यक्ष मातेनें आपल्या पुत्राला मरूं द्यावें हें मला कसेंसेंच अमानुष वाटतें !–काय ? पुत्राला आणि मरूं द्यावें? धिक्कार असो! ही गोष्ट मनांत येऊन माझ्या मस्तकांत या ठिकाणीं एकदम सण्ण होतें, व मी वेडी बनतें !–हायहाय ! अहो, पहातां काय ? हें बघा ते दुष्ट माझ्या बाळाला पकडून नेत आहेत !–अरे देवा ! त्याला वधस्तंभाशीं बांधिलें देखील ! आणखी त्याच्यावर त्याचे प्रत्यक्ष जनकच घाव–!–हात आटोपा ! प्राणनाथ ! हात आटोपा !–देवा !–कसूचा हात आटोपतात ! माझा बाळ मेला देखील ! हाय हाय !

(मूर्च्छा येऊन पडूं लागते. सिंहवर्मा तीस सांवरून धरितो.)

**सिंह०**–हरहर ! काय हा दुःखावेग ! हिला मूर्छा आली आहे, तथापि सर्वांग पहा कसें थरथर कांपत आहे ! आधींच दुःखानें शक्ति गळलेली, आणखी त्यांत हा प्रसंग !–कोण आहे तिकडे ? दासींनो ! धांवा धांवा! ( कांहीं दासी येतात. ) हिला आंत नेऊन नीट उपचार करा !–थांबा! ही हळूहळू सावध होतेसें वाटतें ! घाई नका करूं ! अशीच आंत नेऊन निजवा आणि वारा घाला !

**दासी**–आज्ञा. ( सुलोचनेस संभाळून घेऊन जातात.)

**सिंह०**–हे सर्वांतर्यामी दयाघन प्रभो ! ह्या हतभाग्य ताताची आपल्या पुत्राकरितां होत असलेली दुःस्थिति तूंच पहातो आहेस ! परमेश्वरा ! तूं विश्वाधार विश्वचालक आहेस, याकरितां या ह्मातान्याच्या जीवाला धैर्य देऊन त्याचें सन्मार्गापासून पाऊल ढळूं देऊं नको ! व सर्व सद्गुणांचें सार जी स्वदेशनिष्ठा, तिचें चिरकाल अवलंबन करून देशाच्या शत्रूंचा एकदम निःपात करण्याचें सामर्थ्य त्यास दे ! (जातो.)

---

## अंक ३.

**प्र० १.–श्रीमुक्तेश्वराचें देवालय, व पुढील सभामंडप.**

(शांतिवर्मा येतो.)

**शांति०**–अहाहा ! हेंच तें देऊळ व त्याचा सभामंडप! व ही त्याच्या सभोंवतींची वाग ! हरहर ! आमचे राजे साहेब जिवंत होते, त्या वेळची ह्यांची शोभा काय वर्णावी ?

सदासर्वकाळ भक्तजनांची गजबज राहून वेदघोष कधींही खळत नसे! या बागेंत संपूर्ण नगरवासी नरनारी विश्रांति घेत असतां जागजागीं भजनांची व पुराणांची गर्दी दृष्टीस पडे! देवळांत निरंतर घंटानाद होत असून तो संपूर्ण जनांस इहपर कर्तव्याचें नेहमी स्मरण देत असे! ती स्थिति व ते सुखाचे आणि शांततेचे दिवस सर्व निघून जाऊन सांप्रत काय ही दुःस्थिति प्राप्त झाली आहे! देवळाला नवीन कांहीं शोभा आणण्याची गोष्ट तर एकीकडेच राहिली, परंतु या दुष्ट कासिमाच्या धांकामुळें पडक्या ठिकाणांचा जीर्णोद्धारही होत नाहीं! नांवाला मात्र देऊळ, परंतु पूर्वीच्या गर्दीचें आतां नांवही नाहीं! बागेंत व देवळांत जिकडे तिकडे सामसूम असून सर्वत्र अनास्थेचेंच राज्य दिसत आहे! हरहर! असो; अशी जागाच पण आमच्या सारख्यांना उपयोगीं! सिंहवर्मा व त्याची मित्रमंडळी या ठिकाणींच जमावयाची आहे! याकरितां आंत दर्शन घेऊन त्यांची वाट पहात बसावें! (कांहीं पुढें जाऊन) काय? आमचे महाराज जिवंत असतां या देशाच्या संपूर्ण राजवंशाच्या तसबिरी येथें लाविलेल्या होत्या, त्या अद्यापि इथें आहेत!—तरी पण काय त्यांची ही अवस्था! त्यांच्यावर आज हा वीस वर्षांचा मळ पडला असून वर लक्षावधि कोळिष्टकें चिकटलीं आहेत! हरहर!—आं? हा दीर्घ उसासा कोठून बरें ऐकूं येतो? काय? गाभाऱ्यांतून? हा कोणाचा असावा बरें? अथवा, विचार कशाचा? आमच्या सारखाच कोणी तरी देशमातेच्या दुःखामुळें डागलेला प्राणी असेल!—अरे वाः हा तर माझा मित्र सिंहवर्मा!

(सिंहवर्मा येतो.)

**सिंह०**—सख्या शांतिवर्म्या! ये मला आलिंगन दे! तुझे मजवर जे अनंत उपकार झाले आहेत त्यांचें मला वर्णनही करतां येत नाहीं! मी या ठिकाणीं तुझ्या अगोदर येऊन तुझीच वाट पहात होतों! त्या दुष्ट कासिमानें आपल्या थोरल्या महाराजांचा याच देवळाच्या गाभाऱ्यांत शिरून वध केला, त्या जागेचें प्रत्यहीं एकवार तरी चुंबन घेण्याचा व ती आपल्या दुःखाश्रूंनीं न्हाणण्याचा माझा नियम आहे, त्याप्रमाणें चुंबन घेतलें, व बाहेर पडलों!—बरें, तुला वक्रदंष्ट्र किंवा कोणी आढळलें?

**शांति०**—तुझ्या सांगण्याप्रमाणें त्यांची माझी गाभाऱ्यांत गांठ पडायची, परंतु तसें न होतां, माझी व वक्रदंष्ट्राची बागेंत गांठ पडली! तोही बिचारा तुमच्या माझ्याप्रमाणेंच एकीकडे दुःख करतांना मला आढळला! एवढेंच नव्हे, तर तो निराशासागरांत बुडालासाही मला वाटला!

**सिंह०**—त्याला वीरोत्तंसाबद्दल कांहीं मजकूर तुझ्या तोंडून कळला आहे वाटतें?

**शांति०**—भलतेंच! मित्रा! तुझ्या आज्ञेशिवाय मीं तो कसा कळवीन?

**सिंह०**—शाबास! मित्रा! तुझ्या विश्वासुकपणाबद्दल माझी पूर्ण खातरी आहे!—पण हे पहा आलेच!

(वक्रदंष्ट्र, सुधन्वा, व इतर येतात.)

**सिंह०**—शूर मित्रहो! तुह्मीं असे म्लानवदनसे दिसतां?

**वक्र०**—सख्या सिंहवर्म्या! काय सांगूं? घात

झाला ! स्वातंत्र्यप्राप्तीविषयीं आमचा यत्न अगदीं मनोराज्याप्रमाणेंच विफल झाला ! फार काय सांगावें? प्रत्यक्ष परमेश्वरही सद्गुण व सद्धर्म यांचा पक्ष सोडून त्या दुर्वृत्त विधर्मी मुसंड्याच्याच पक्षास मिळाला!

**सिंह०**—मित्रहो ! तुह्मीं प्रत्यक्ष मूर्तिमंत शौर्याचेच अवतार, असें असतां असे उदासीनतेच्या आधीन होतां याला काय ह्मणावें ? मोठ्या भयंकर वादळानेंही हृदयाद्रि डळमळायचा नाहीं अशी तुमची योग्यता असतां यःकश्चित् वृक्षाप्रमाणें तुह्मीं कंपित होतां हें काय ?

**वक्र०**—मित्रा ! त्या दुष्टाच्या हातीं सांपडलेला शेवटला राजवंशांकुर जर आह्मांला परत मिळेल, तर आह्मीं प्रत्यक्ष मृत्यूपुढेंही हंसत राहून, मरावयाची पाळी आली तरीही ती मोठ्या आनंदानें कबूल करूं!

**सिंह०**—काय ह्मणतां? तो राजपुत्र तुह्मांमध्यें असला, तर त्याच्यायोगानें तुमच्या चित्तांत अधिक धैर्य व उत्साह हीं निपजतील ?

**वक्र०**—यांत काय संशय ? तो राजपुत्र जर आमच्या जवळ असेल, तर आजच्या या रात्रीपुढें **कासिमाचें** या पृथ्वीतलावर नांव देखील उरूं देणार नाहीं ! मग आणीक तें काय !

**इतर**—आह्मांला दुसरें कांहीं नको ! तो राजपुत्र जवळ असेल, तर त्या **अरबाचीं** या क्षणीं शंभर वर्षेंच भरलीं असेंच समजा !

**सिंह०**—शाबास! शाबास मित्र हो ! तुमचा हा दृढ निश्चय पाहून चित्तास परम आल्हाद होतो ! व हें जर खरें, तर तुह्मीं असेंच निःसंशय समजा कीं, हा जो राजपुत्र ह्मणून पकडला आहे तो कांहीं खरा **वीरोत्तंस** बाळ नव्हे !

**वक्र० व इतर**—काय काय? हा **वीरोत्तंस**बाळ नव्हे ह्मणतां ?

**सिंह०**—निःसंशय नव्हे! त्याला त्याच्या स्वरूपानें हें जगत् अद्यापि ओळखीत नाहीं, एवढेंच नव्हे, तर त्याचें त्यालाही आपण अमुक ह्मणून माहित नाहीं ! व अशा स्थितींतच तो तुह्मांमध्यें खुशाल संचारही करतो !

**वक्र०**—परमेश्वरा ! धन्य आहेस ! धन्य !

**सिंह०**—फार तर काय ? आजच्या रात्रींच्या रात्रींत तो त्या दुष्टाचा नाश करून विजयश्रीनें मंडित होईल! एवढेंच नव्हे, तर तुह्मां आह्मांला व या संपूर्ण देशालाही त्या दुष्टाच्या दास्यत्वांतून आपल्या प्रभावानें मुक्त करीलच करील !

**वक्र०**—काय ? ह्मणतां काय ? या इतक्या गोष्टी आज होणार ह्मणतां ? परमेश्वरा ! तुझी लीला अगाध आहे !

**सिंह०**—इतक्याही गोष्टी आज निःसंशय होणार! व एवढेंचसें काय, ही चालू घटका संपायच्या आंतच संपूर्ण **सिंधुदेशाचा** राजा होणारा तो प्रिय बाळ तुमच्या आमच्या मंडळांतही असेल ! (गाभाऱ्याकडे पाहून ) आंत कोण आहे ? मी **सिंहवर्मा** हांक मारतों आहे !—( परत वळून ) मित्रहो ! तुह्मी अगदीं आश्चर्यानें खिळून गेलांसें दिसतां, पण आपली उत्साहबुद्धि संभाळून धरून, पुढील कर्तव्याला मात्र नीट जागा, तरच जी कधीं न घडून येणारी गोष्ट आज घडून येणार आहे तिचें सार्थक होईल !

( गाभाऱ्यांतून धनपाळ बाहेर येतो. )

**धन०**—काय चमत्कार! मी गाभाऱ्यांत देवापुढें साष्टांग नमस्कार घालीत असतां माझ्या पायांखालची जमीन एकदम दरदरून हलल्याचा मला भास झाला! व आंतल्या ह्या राजवंशाच्या तसबिरींकडे पाहूं लागलों असतां त्यांजवरील मळ खालीं पडून त्यांतील चित्रेंही सप्रेमकरुण मुद्रेनें मजकडे पहात असल्याचा मला भास होतो आहे, इतक्यांत त्यांचीं अंगें थरारूं लागून त्या थरारण्याच्या भरांत त्यांच्या मुद्रेत क्रोधाचाही आविर्भाव मला वाटला! पुढें काय प्रकार होणार असेल तो असो; परंतु माझ्या चित्ताची व मी जिकडे जिकडे ह्मणून पहातों तिकडे तिकडे वस्तुमात्राची स्थिति अवलोकन करून, काहीं तरी अद्भुत प्रसंग गुदरणार असेंच दिसत आहे!

**सिंह०**—वत्सा **धनपाळा** ! तूं ह्मणतोस तसाच अद्भुत प्रसंग घडून येण्याचीच वेळ सांप्रत जवळ येत आहे ! प्रत्यक्ष न्यायदेवताच या वेळीं आपला न्यायाचा तराजू हातीं घेऊन **वीरोत्तंस**बाळ आणि तो दुष्ट **कासिम** यांचा न्याय करण्याकरितां येत आहे, व तिज सभोंवती यक्ष, गंधर्व, किन्नर इत्यादि जमले असून ते आनंदगायन करण्याकरितां तिच्या आज्ञेची वाट पहात आहेत! ( भिंतीस टांगलेलें एक चित्र हळू हळू उलगडतो. ) बाळा **धनपाळा** ! तूं हें चित्र पाहिलें आहेस ?

**धन०**—होय बाबा ! हें चित्र मीं लक्ष लावून पाहिलें आहे, परंतु यांत मला कांहींच कळत नाहीं ! या चित्रांतील मूर्ति अंधारांत असल्याप्रमाणें काढल्या आहेत, त्यांचा मी काय अर्थ समजावा ?

**सिंह०**—बाळा ! सहस्ररश्मि सूर्य ज्याप्रमाणें अंधकाराचा नाश करितो, त्याप्रमाणेंच माझ्या मुखांतून निघणारे उद्गार या चित्रांत दिसणाऱ्या मूर्तींबद्दलचा अंधार नाहींसा करून टाकतील ! पहा ! या ठिकाणीं आपल्या **सिंधुदेशास** त्या दुष्ट **अरबानें** जिंकल्याचा प्रकार दाखविला आहे! हा पहा पुढें त्या प्रबळ **सिंधुराजाचा** शेवटला वंशांकुर दाखविला आहे ! हा पहा आपल्या महाप्रतापी **सोमदत्त** महाराजांचा आज्ञांकित मानकरी त्या बाळाला आपल्या स्वतःच्या पत्नीकडे घेऊन चालला आहे ! कशाकरितां ह्मणशील, तर त्या माउलीनें त्या बाळकाला गुप्तपणें नीचावस्थेंत ठेवून त्याचें संगोपन करावें ह्मणून! तसाच हा पहा त्या मानकऱ्याचा स्वतःचा बाळक घरून काढून बाहेर दूर देशीं एकांत स्थलीं पोंचविला जात आहे ! या पोंचविण्याचा हेतु इतकाच कीं, जर कदाचित् पुढें मागें न जाणों त्या दुष्ट **अरबाला वीरोत्तंस**बाळ जिवंत असल्याविषयीं संशय आला, तर त्या राजबिंड्याचे प्राण बचावले जाऊन त्याचे ऐवजीं या बाळकाचे प्राण खर्ची पडावे, व या युक्तीनें त्या दुष्टाचे घातक हेतु सर्व विफल व्हावेत!

**धन०**—बाबा ! आपल्या तोंडचा हा वृत्तांत ऐकूनच मी विस्मयानें कसा अगदीं थक्क होऊन जात आहें, व त्या विस्मयाच्या भरांत माझ्या एकूणएक देहवृत्तिच स्तंभित होऊं पहात आहेत !

**सिंह०**—हो, असें ह्मण, किंवा याहूनही वास्तविकदृष्टया तुझी कल्पनाशक्तिच तुजमध्यें प्रज्वलित होऊन तीच तुझ्या अंतःकरणां-

तील उत्कंठा वाढवीत आहे असेंही ह्मण!

धन०—आपण अगदीं सत्य सत्य बोललां! ईश्वरसाक्ष सांगतों, या वेळीं कांहीं विलक्षण आणि अननुभूतपूर्व असा विकार माझ्या मनांत उचंबळूं लागून माझ्या नेत्रांपुढें नाहींनाहींत तसले विलक्षण तर्क एकामागून एक उभे राहूं लागत आहेत! अहाहा! बाबा! या वेळची माझ्या मनाची स्थिति तुह्मांला काय सांगूं? त्या दुष्टाचा निःपात केव्हां होतो असें या हृदयाला वाटूं लागलें आहे! बाबा! तुह्मांला खचित सांगतों, आज मध्यरात्र झाली कीं ही तरवार उसपून त्या दुष्टाचे प्राण मी क्षणमात्रही राहूं देणार नाहीं!

सिंह०—काय ह्मणतोस? तूं त्या दुष्टाचे प्राण घेशील?

धन०—बाबा! याविषयीं आपण यत्किंचितूही संशय मनांत आणूं नये! माझे शब्द तो सर्वांतर्यामी प्रभु ऐकतो आहे! त्याचीच शपथ घेऊन सांगतों कीं, माझ्या शब्दांमध्यें काडीमात्र अंतर पडणार नाहीं! तसेंच या दुष्टानें जो राजवंश धुळीस मिळविला, व आजही जे लोक त्याच्या तडाक्यांत सांपडून कैदेंत गेले आहेत, त्यांचीही शपथ घेऊन मी हेंच सांगतों!

सिंह०—चिंता नाहीं! धनपाळा! ही गोष्ट ज्यावेळीं होईल, त्यावेळीं तूं त्या दुष्टाला असेंच बजावून सांग, कीं तुझा घात तो राजपुत्रच स्वतः येऊन करीत आहे!

धन०—बाबा! त्या राजपुत्राला या दुष्टानें अनन्वित हाल सोसावयास लाविले आहे, याकरितां त्याचेंच स्मरण होऊन माझा हा सूड त्या अरबाला दसपटीनें अधिक भोंवेल!

सिंह०—फार उत्तम! आणखी हें पहा—तुझ्या शस्त्राघातानें तो दुष्ट घायाळ होऊन मरूं लागला असतां तुझा घात करणारा प्रत्यक्ष राजपुत्र वीरोत्तंस तोच मी ह्मणूनही त्याला सांगायला कमी करूं नको!

धन०—बाबा! तुह्मीं काय बोलतां हें? आपण विसरलां तर नाहीं?

सिंह०—नाहीं! बाळा! तूंच तो वीरोत्तंस! आमच्या राजवंशाचा शेवटला वंशांकुर तो तूंच! तूं इतका वेळ धनपाळ होतास, पण आतां तें बनावट नांव टाकून देऊन आपल्या खऱ्या स्वरूपानेंच संचार करूं लाग!

वीरो०—आश्चर्य आहे!

वक्र०—धन्य आहे! परमेश्वरा! तुझी लीला अतर्क्य आहे हेंच खरें!

वीरो०—हें सगळें खरेंच एकूण? तरीच! पूर्वीच्या लक्षशः आठवणी माझ्या मस्तकांत एकदम चोहोंकडून संचार करूं लागत आहेत! आपल्या मुखांतून वारंवार निघणारे गूढ सांकेतिक शब्द, माझ्या तरुण वयांतही मला सुबोधच करण्याविषयीं आपल्या अंतःकरणाची निरंतर आसक्ति, इत्यादि प्रकार चोहोंकडून मनांत येऊन माझा अंतरात्मा अधिक अधिकच थक्क होत आहे; व तशांतून मी राजवंशी हें अकल्पित कळून आल्यामुळें तर माझें देहभानही मला सोडून जातें कीं काय अशी माझी स्थिति झाली आहे!

सिंह०—वीरोत्तंस महाराज! इतःपर आप-

णच आमचे राजे, व आह्मीं दास आपले प्रजाजन! मित्रहो! हा सर्व वृत्तांत—ही सर्व हकीकत—शांतिवर्मजीं आपणाला सांगतलिच, परंतु यावेळीं अगोदर आपलें हें राजरत्न आपण पदरीं घ्या कसे?

सर्व—वीरोत्तंस महाराजांचा जयजयकार असो! जयजयकार असो!

(सर्व साष्टांग प्रणिपात करतात.)

सिंह०—महाराज! आपल्या चरणदर्शनानें संपुर्ण सिंधुदेश परिपूत होणार, याकरितां त्याचाही जयजयकार असो!

सर्व—सिंधुदेशकी जय!

वीरो०—अहाहा! हे संपूर्ण विश्वचालक परमात्मन्! एकूण सिंधुदेशानें आजपर्यंत ज्या विपत्ति काढल्या त्यांबद्दचा सूड घेणें, व प्रजाजनांचें आणि त्यांच्या वंशजांचें बरें वाईट पहाणें, यांबद्दलचा अधिकार तुझ्या सत्तेनें या दीन दासाकडे आला काय?

सिंह०—महाराज! एवढेंचसें काय, परंतु हे पहा आपल्या आजपर्यंत नष्टप्राय वाटत असलेल्या राजवंशांतील संपूर्ण कुलदीपक पूर्वज आपल्या हृदयांत मूर्तिमंत आविर्भूत होऊन, या अधम असद्धर्मी अरबाचा निःपात करण्याविषयींच आपणाला जणों बोधच करीत आहेत!

वीरो०—सिंहवर्म महाराज! काय चमत्कार सांगूं? या वेळीं मानुषशक्तीच्यानें आकलनहीं होऊं शकणार नाहीं, अशा प्रकारची कांहीं विलक्षण उत्साहबुद्धि माझें अंतःकरण विदारूनच जणों बाहेर पडूं पहात आहे!

सिंह०—वाहवा वाहवा! महाराज! हीच उत्साहबुद्धि अति अल्प काळांतच आपल्या शत्रूंचें समूळ निर्दाळण करून टाकील!—बरें, पण वीर हो! आपल्या या कृत्यास मदत करणारे आपले संपूर्ण मित्रजन आपआपल्या जागीं तयार आहेत?

वक्र०—यांत काय संशय?

सिंह०—एक झालें, दुसरें—सर्व वेशी ताब्यांत करून घेण्याची तजवीज यथास्थित—?

वक्र०—त्याविषयीं आपल्याला बिलकुल धास्ती बाळगायला नको!

सिंह०—बरें, खाणाखुणा?

वक्र०—ती सर्व तयारी कडेकोट आहे! पण मणिपाळाचें कसें काय? तो आपल्या पक्षास येऊन मिळेलसें तुह्मांला वाटतें?

सिंह०—त्याच्याबद्दलचा जामीन मी! त्या अधम कासिमानें त्याच्या भगिनीवर बलात्कार केला ह्याबद्दल सूड केव्हां उगवावयास सांपडेल असें त्याला झालें आहे! एकवार राजवाड्यावर आपला हल्ला सुरू झाला कीं लागलाच तो आपल्या सैनिकांसुद्धां आपणाला येऊन मिळेल, व त्या प्रळयसमयीं शत्रूंची आश्चर्यानें गाळणच करून सोडील, याविषयीं आपण अगदीं निर्धास्त असावें!

वीरो०—अरेरे अधमा! रुधिरप्रिया! आतां मात्र तुझा अंत खचित समीप येऊन ठेपला! तुझ्या आयुर्मर्यादेचा शेवट आज रात्रीं खचित होणार!

सिंह०—अहाहा! या वेळीं संपूर्ण पूर्व वृत्तांताचें स्मरण होऊन माझी किती विलक्षण स्थिति होत आहे ही! मित्रहो! या वेळीं त्या दुष्टानें हा देश विध्वस्त केला त्याचा सर्व वृत्तांत मनांत आणा! त्या दु-

ष्ट हरामखोर विश्वासघातक्यानें सिंधु देशचें संपूर्ण राजकुल कसें विध्वस्त करून सोडलें याचें स्मरण करा ! हाय हाय ! मित्रहो ! यावेळीं ह्या भयंकर प्रसंगाचें चित्र पहा माझ्या हृदयपट्टावर प्रत्यक्ष काढि-ल्याप्रमाणें कसें स्पष्ट दिसत आहे ! आपल्या सोमदत्त महाराजांचें त्यांच्या दायादाशीं द्वंद्व चालत असतां हा दुष्ट मानभावी युक्तीनें मध्यें घुसून कपटानें त्या दायादाचा नाश करूनच स्वस्थ राहिला नाहीं, तर त्यानें दायादमरणाची हकीकत आमच्या महाराजांस समग्र कळण्यापूर्वीच सोमदत्त महाराजांच्याही नाशाची तज-वीज योजण्यास आरंभ केला ! दायादाचा नाश झाला त्यावेळीं आपले थोरले महा-राज कांहीं आकस्मिक आजारानें व्याकुळ होऊन या दुष्टावर संपूर्णकार्यनिर्वह-णाचा भाग सोंपवून विश्वासानें विश्रांति-मंचकीं शयन करीत असतां, या हराम-खोरानें राज्यांत सर्वत्र शांततेची द्वाही फिरविली, व व्यापाराच्या मिषानें नगराबा-हेर अरबांचे काफले येऊन उतरले अस-तां त्यांचा नगरांत यथेच्छ प्रवेश होऊं देऊन एकदम आंतील सर्व वाटा आडवून धरिल्या ! शांततेच्या खोट्या समजावर आमचें वीरमंडळ आपआपल्या घरीं खुशाल एकेकटें प्रेमसुखाच्या गोष्टी बोलत बसलें असतां या दुष्टानें प्रत्यक्ष राजवाड्यावरच चाल करून सर्वत्र दाणादाण करून सोडिली! अशा प्रसंगीं कोणासच पळून जाण्यासही धड वाट उरली नाहीं अशी स्थिति होऊन गेली असतां कित्येक वि-श्वासु सेवकांनीं चोरवाटेनें महाराजांस व त्यांची धर्मपत्नी—या वीरोत्तंसबाळाची जननी—यांस या देवळाच्या गाभाऱ्यांत आणून पोंचविलें! त्यावेळीं एक संवत्सराहून कमीच वयाचें तें बालक बरोबर असून तेंही पुढें येणारा अघोर प्रसंग मनांत आणूनच काय जणों आपल्या प्रेमळ मातापितरांकडे पाळीपाळीनें पहात राहून आक्रोश करीत होतें! मित्रहो! त्या वेळचा तो कोण भयंकर प्रसंग ? त्या परम पूज्य दंपत्याच्या तोंडांतून एकसारखे 'हा हतभाग्य देश !' व 'हें निराश्रित बाळ !' एवढेच उद्गार निघत असून स्वतःच्या शोचनीय स्थितीबद्दल एका चकारशब्दही तोंडावाटे कसा तो बा-हेर निघाला नाहीं ! महाराज स्वतः आ-जारी, व आईसाहेबांस त्यांच्या प्रकृतीविष-यींची रुखरुख अंतःकरणांतून लागलेली, असें असतां त्यांनीं पोटांतील दुःख पहा मट्ट गिळून टाकिलें ! आतां सां-गितलेले उद्गार उभयतांच्या मुखांतून नि-घत असतां नेत्रांतून अलोट अश्रूंचा संतत प्रवाह चालत होता, अशा स्थितींतच तीं राहून राहून वर आकाशाकडे दीनवाण्या तोंडानें पाहूं लागत, व पुनरपि त्या कोमल बालकाला कंठाशीं दृढ आलिंगून त्याचें सर्वांग नेत्राश्रूंनीं आर्द्र करून टाकीत !

**वीरो०**—चालूं द्या ! चालूं द्या ! ही हकीकत मला साद्यंत कळली पाहिजे ! इच्या योगानें पुढच्या भयंकर प्राणघाताच्या प्रसंगाकरितां माझें मन तयार होईल.

**सिंह०**—ऐकावें महाराज ! ही भयंकर स्थिति कांहींवेळ चालू राहून शेवटीं आपल्या पितृचरणांनीं आपणास माझ्या स्वाधीन केलें, त्या वेळचे शब्द एकूण एक या हृ-

दयाला कसे सतत खिळून राहिले आहेत ! तिकडे शत्रूनीं राजवाड्यांत दाणादाण चालविली असतां, इकडे देवालयांत महाराजांनीं व आईसाहेबांनीं एकवार आपलें शेवटलें चुंबन घेऊन आपणास माझे स्वाधीन केलें, व ह्मणाले:—"सिंहवर्मन् ! आतां हा बाळ तुमचा ! यांचें अद्यापि पाळण्यांतील शयन, व मातृस्तन्यपान सुटलें नाहीं ! असो; आतां तुह्मींच यांचें संगोपन करा ! याला या दुष्ट अरबाच्या हातून वांचवा ! आणि समजूं लागलें ह्मणजे याला सदाचरण आणि सुनीतिवर्तन यांची उत्तम शिक्षा द्या ! कशाकारितां ह्मणाल, तर या शिक्षेच्या योगानें तरी हा आपल्या या हतप्राय देशाचें पुनरुज्जीवन करून या मुसंड्यांचा नाश करूं शकेल, अगर तितकें नच साधलें तरी निदान जिवंत असेपर्यंत याचा सुखानें कालक्षेप होईल !" इतकें बोलले, इतक्यांत बाहेर शत्रु देवळांत घुसत असल्याचा गलबला कानीं पडला ! मग कसचें काय ? जेमतेम आपणाला घेऊन गुप्त वाटेनें मला तेथून निघून जातां येण्याचाच काय तो अवकाश, इतक्यांत नागवी तरवार हातांत घेतलेला तो अधम, विश्वासघाती, निष्ठुर अंतःकरणाचा कासिम हा आपल्या सेवकांनिशीं आंत घुसून त्यानें आपल्या वडिलांच्या केंसांच्या ओढून मूर्तीपुढें आडवें पाडून त्यांचा घात केला, व त्यांच्या शोकानें मूर्छित झालेली आपली जननी त्या मृत देहाला मिठी मारून पडली असतां, त्यांचाही तेथल्या तेथेंच अंत केला !

वीरो०—अरेरे दुष्टा निर्दया !—वीरहो ! पहातां काय ? चला उठा ! हा मी आतां जाऊन त्याच्या नरडीचा घोंट घेतों ! या दुष्टाचा धरणीमातेला असह्य भार झाला आहे तो नाहींसा आत्तांच्या आत्तां करून टाकितों ! अरे दुष्टा ! प्रत्यक्ष काळानळांत सर्वंध अरण्येंही ज्याप्रमाणें खाक होऊन जावींत, त्याप्रमाणें माझ्या क्रोधाग्नींत एक क्षणही न लागतां तूं भस्म झालासच समज ! मित्रहो ! हा मी चाललोंच ! ( आवेशानें जाऊं लागतो. )

सिंह०—वीरोत्तंसराज ! आपण असें उतावीळ होऊं नये ! कारण उतावीळपणा केला असतां न जाणों प्रसंगीं कायमचें अपयशही येण्याचा संभव आहे ! जें कांहीं करणें तें शांततेनें व एक जुटीनें करावें ! मित्रहो ! आजपर्यंत या राजमूर्तीचें यथाशक्ति पालन पोषण केलें, आतां यांना मी आपण सर्वांच्या स्वाधीन करतों ! आतां यांचें सर्व प्रकारें रक्षण करणें आपणाकडे आहे ! ( नेत्रांतून अश्रु येतात. )

वीरो०—सिंहवर्म महाराज ! आपलें औदार्य व स्नेहबुद्धि यांचें किती ह्मणून वर्णन करावें? महाराज ! या देहाकारितां आपण आजपर्यंत जें ह्मणून केलें, व जीं जीं दुःखें सोशिलीं, त्या सर्वांबद्दल उतराई मी कसा होईन हेंच मला मुळीं कळत नाहीं ! माझे बाबा व आई मला टाकून गेलीं, पण त्या उभयतांपेक्षांही मी आपणास व सुलोचना मातुश्रींस जास्ती समजतों ! याकारितां मी आपल्या उपदेशाबाहेर काडीभरही जाणार नाहीं ! तर जातों मी आतां, पण फिरून दर्शन होईलना ? खचित ?

सिंह०—होईल ! त्याची काळजी करूं नये !

वीरो०—हे पित्रधिक महात्मन्! हा प्रणिपात करितों, व आपल्या आशीर्वादानें इष्टकार्य सिद्ध करून येतों! मित्रा वक्रदंष्ट्रा! मित्रहो! चला! चला! आतां या दुष्टाचें हनन करून भूमातेचें परत आश्वासन करणें हें आपणा सर्वांकडे आहे! चला!

(सिंहवर्मा खेरीज करून इतरांसहवर्तमान जातो.)

सिंह०—हे परात्पर परम कारुणिक सर्वेश्वर! इतःपर या राजमूर्तीचें कल्याण करणारा तूंच आहेस! हे चराचरनियामका प्रभो! आतां मध्यरात्र झाली असतां हा राजबाळक शत्रूच्या मंदिरांत संचार करूं लागेल, त्यावेळीं साधूंचें रक्षण व दुष्टांचें दंडन करविणारा तूंच होय! यासाठीं हे सच्चिदानंद प्रभो! तुझ्या चरणीं लीन असलेल्या दासाची तुला एवढीच प्रार्थना आहे कीं, तूं या दुष्टांचें शासन करून तवाज्ञानुवर्ती राजबाळकाला यशःप्राप्ति करून दे! (परत गाभाऱ्यांत जातो.)

(पडदा पडतो.)

---

## प्र० २.—राजवाड्यांतील एक महाल.

(कासिम सेवकांसहवर्तमान येतो.)

कासि०—(आपणाशीं) काय करावें? आज मला विजयप्राप्ति होऊन माझा एकुलता एक वैरी हा राजपुत्र वीरोत्तंस तोही माझ्या हातीं सांपडून त्याच्या नाशाचीही मीं आज्ञा केली, व तो अल्पकालांत हा लोक सोडून जाईल, असें निश्चित असूनही माझ्या जिवाला समाधान ह्मणून कसें तें वाटत नाहीं!—कदाचित् न जाणों वीरोत्तंसाला वधस्थानाकडे नेत असतां तो निसटून जाण्याची तर नसेलना भीति? व त्यामुळेंच माझ्या मनाला ही अस्वस्थता वाटत असेल?. छेः पण अशी गोष्ट कदापि होणार नाहीं! कुसीदावर माझा पूर्ण विश्वास आहे, तो त्याला पूर्ण बंदोबस्तांत ठेवील त्याविषयीं धास्ती बिलकुल नको! मग—मग—असें आहे तर माझ्या मनाला विनाकारण ही रुखरुख कां बरें? आज काल ह्मटला ह्मणजे हा राजपुत्रच काय तो माझा शत्रु, त्याचा नाश केला ह्मणजे माझें काम आटपलें, असें असतां माझ्या मनाची अशी स्थिति होते हा मोठाच चमत्कार!—अरे पण थांबा अं? माझ्या मनांत निराळीच कल्पना येऊं लागत आहे, व ती—तीच मला खरी पण वाटते! मी या राजपुत्राचा वध करवितों खरा, पण यांत मी त्याचा पुरता सूड उगवितों असें होत नाहीं! वधस्थानीं कोणा पाहिजे त्याला नेऊन घात करितां येईल, परंतु त्यांत त्याला व घात करणारालाही प्रौढि नाहीं! याचा पिता सोमदत्त—त्याचा घात मीं देवळांतल्या मूर्तीसमोर केला, त्याप्रमाणें याचा केला तरच मीं धन्य! मी तसें करीन, तरच या देशचे लोक माझा निरंतर वचक बाळगतील, याकरितां या प्रसंगीं असेंच करायला पाहिजे!—कोण आहेरे? आतांच्या आतां जा कुसीदाकडे, न् त्याला सांगा, राजपुत्राचा वधस्थानीं वध न करितां त्याला थोरल्या देवालयांत नेऊन तेथें मूर्तीसमक्ष त्याचा शिरश्छेद करा! चला!

सेवक—आज्ञा!

(सर्व जतात.)

---

**प्र० ३.—श्रीमुक्तेश्वराच्या देवळां-तील गाभारा व त्यापुढील सभामंडप.**

(नगाऱ्याचे आवाज बाहेर ऐकूं येत आहेत.)
(सिंहवर्मा गाभाऱ्यांतून तोंड बाहेर काढतो.)

**सिंह०**—अरे, हा काय चमत्कार? या निर्वांत निर्जन स्थानीं हे नगाऱ्याचे आवाज कोठून बरें ऐकूं येतात? कदाचित् माझ्या बाळाला वधस्थानीं नेण्याचा विचार रहित करून त्याचा या ठिकाणीं आणून वध करण्याचा तर या दुष्टानें नसेलना विचार केला? कसेंही असो; हायहाय! हे थेरड्या सिंहवर्म्या! तूं अद्यापि कशाकरितां जिवंत राहिला आहेस? काय? तूं या ठिकाणीं राहून आपल्या पुत्राचा होत असलेला वध स्वनेत्रांनीं पहाणार ?—अरे, पण मी कोण हा मूर्ख ? राहून राहून हा पुत्रमोह मला काय ह्मणून व्याकुल करतो ? राजभक्तीपुढें या मोहाची ती काय मातब्बरी? हे सच्चिद्धन प्रभो **नारायणा!** या नष्टभाग्य वृद्धाचे कशा प्रकारचे हाल होत आहेत तूंच पहातोस! परमेश्वरा! या अति अघोर प्रसंगीं माझा मार्गदर्शकही तूंच आहेस ! नितांत दुःखें व क्लेश भोगूनही राजभक्तीसच जागण्याचें तूं या दासास धैर्य दे हेंच पुनःपुनः अनन्यभावेंकरून माझें तुला मागणें आहे !—(आवाज मोठ्या मोठ्यानें ऐकूं येऊं लागतात.) असो; आतां येथें राहून परिणाम नाहीं ! मागच्या मागेंच निघून जावें हें बरें ! हे न्यायी दयाळू भगवन्! माझ्या बाळा—(निघून जातो.)

(कांहीं वेळानें पुढें नगारे वाजत असून वध्यचिन्हांकित शूरसेनास घेऊन कुसीद, चांडाळ व इतर येतात.)

**कुसी०**—चांडाळहो ! या राजपुत्राच्या पित्याचा अंत या पुढच्या गाभाऱ्यांत झाला, त्याचप्रमाणें याचाही त्याचठिकाणीं वध करावा अशी राजाज्ञा आहे, याकरितां चला याला आंत घेऊन ! (सर्व आंत जातात.)

**वीरो०**—(मूर्तीसमोर उभा राहून कुसीदास) तो अधम **कासिम** यावेळीं इथें पाहिजे होता, ह्मणजे सद्गुणी मनुष्य प्राणांतप्रसंगींही कसें धैर्य वागवितात हें त्याच्या दृष्टीस पडून त्याला आपणही तशाप्रकारें वागावें असें वाटलें असतें !

**कुसी०**—राजपुत्रा! व्यर्थ बडबड पुरे कर! तुझें बालिशवर्तन **कासिमशहांनीं** पहावें असें तुला वाटतें, तर ती तुझी इच्छा उदईक परिपूर्ण होईल! आतां या वेळीं आज्ञेप्रमाणें तुझा शिरश्छेद करून तुझें शिर व धड हीं दोन्हीं एका उंच काठीला बांधून सर्व नगरभर फिरविण्यांत येतील कांहीं काळजी करूं नको ! आतां तुझा अंतकाळ समीप आला आहे, याकरितां तुला कोणाचें स्मरण करायचें असेल, किंवा कोणाला कांहीं निरवायचें असेल, तर तेवढें कर तुला मोकळीक आहे !

**वीरो०**—ज्या परमेश्वराचें निरंतर स्मरण करावयाचें, तो माझ्या हृदयांत निरंतर जागृत वास करीत आहे. याकरितां माझा वध होण्यास माझी बिलकुल हरकत नाहीं! हा मी तयार आहें ! जे दुष्ट, अधम, अनेक पातकांनीं विटाळलेले, त्यांनाच मात्र मृत्यूची भीति वाटत असते ! मला अशा प्रकारची बिलकुल भीति वाटत नसून, ज्या परमेश्वराच्या अगाध लीलेच्या योगेंकरून माझ्या वधाचा हा अकल्पित चम-

त्कार घडून येतो आहे, त्याची ती लीला सावधान चित्तेंकरून पहाण्यास मी सदा तयार आहें !

**कुसी०**—अरे जारे, वाचाळा! ह्या भलत्याच गप्पा पुरे कर ! ह्या चांडाळांच्या तरवारी पहा अतितृषित होऊन तुझ्या रुधिराचें केव्हां पान करावयास मिळतें ह्मणून उत्सुक झाल्या आहेत !—अरे, पहातां काय? करा याचा एकदम शेवट न् काय ?

(इतक्यांत सुलोचना येते. बरोबर दोन तीन दासी आहेत. )

**सुलो०**—दासींनो ! यावेळीं मीं तुमचें मुळीं ऐकणार नाहीं ! अग खबरदार कुणी मला आडवाल तर ! मी जाणारच !—हे चांडालहो! तुमच्या पायां पडतें ! तुह्मीं आपल्या तरवारीचा घाव या माझ्या मानेवर करा ! तुह्मीं मला ठार मारा, परंतु या बाळाचे प्राण वांचवाच !

**कुसी०**—भलतेंच ! वेडी कुठली ! अरे, कोणरे, हिला वेड लागलें आहे, इला येथून घेऊन जा कसे !

**सुलो०**—काय ! तुह्मीं मला घेऊन जाणार ?—नाहीं ! मी कधीं येथून जाणार नाहीं ! तुह्मीं जबरदस्ती करून नेऊं पहाल, तरी मी येथून हलायची नाहीं ! मी याच ठिकाणीं पाहिजे तर धरणीलाही घट्ट आवळून धरून पडेन, परंतु मला नेण्याचे तुमचे सर्व यत्न विफळ होतील ! हा पुत्र माझा आहे ! याकरितां याचा तुह्मीं घात नका करूं ! मी तुमच्या पायां पडतें !

**कुसी०**—काय ह्मणतेस थेरडे ! हा पुत्र तुझा ?

**सुलो०**—कुसीदा ! ईश्वरसाक्ष सांगतें! हा पुत्र माझा! माझा बाळ शूरसेन तो हाच !बाळा! येरे ! मला तुला एकदांची कडकडून भेटूं दे !

**कुसी०**—हा मोठाच चमत्कार ! चांडाळहो ! तुह्मीं या वध्याला संभाळून येथेंच रहा ! कोणासही येथून फिरकूं देऊं नका ! मी कासिमशहांकडे जाऊन त्यांना हा सर्व प्रकार कळवितों ! ( निघून जातो. )

**सुलो०**—बाळा ! इकडे परत तुझ्यानें कसें रे येववलें ? बाळा! अशी सुंदररूपसद्गुणसंपत्ति आजपर्यंत रक्षण केली, त्याचें हेंच कारे फळ ? त्यांच्या योगानें तुझ्या या जननीस आनंद व्हावा, तसें न होतां तींच या हतभाग्येच्या दुःखास कींरे कारण होत आहेत ? हाय हाय !

**शूर०**—माझीं मातापितरें कोण याविषयीं आजपर्यंत मला मुळींच कशी ती माहिती नाहीं, तथापि हे अनिवार शोकाश्रु व भीतीला लवमात्र न जुमानणारे हे प्रेमाचे उद्दाम कल्लोळ यांच्यावरून ही माउली माझीच जननी असून तिला मजकरितांच इतकें दुःख होतें आहे असें खचित वाटतें !—(धाडकन तिच्या पायां पडतो, ती त्याला कडकडून मिठी मारून उठविते.) एकूण अशा प्रसंगीं तरी आई ! मला तुझें दर्शन झालें अं ?—आई ! मी केवढा धन्य !—एकूण मीच तुझा वत्स ?

**सुलो०**—बाळा! तूंच—तूंच माझा वत्स! आणखी तुझा चेहेराही प्रत्यक्ष प्राणनाथांसारखाच, व सद्गुणही तसेच ! बाळा! बाळा! मला सगळी हकीकत कळूं दे ! त्या सद्गुणी शांतिवर्म्यासहवर्तमान तूं कसा राहत होतास, त्या निर्जन प्रदेशांत तुझें रक्षण, तुझें संगोपन, त्यानें कसें केलें,

तुला निरंतर नीतिमार्गापासून व सदाचरणापासून न ढळण्याविषयीं त्यानें कसकसा सदुपदेश केला, हें तूं मला एकूण एक सांग!बाळा! उशीर लावूं नको! तुझ्या तोंडचा एकेक शब्द ऐकायला ही जननी पहा कशी अत्यंत तृषित झाली आहे!

शूर०—हे विचित्रलील प्रभो! तुह्मी माया खरोखरीं अतर्क्य आहे! आज माझ्या जन्माचें सार्थक झालें! केवढा हा चमत्कार! अगदीं मरणकाल समीप येऊन पोंचेपर्यंत मातेचें दर्शनही नसून शेवटीं मातेचें दर्शन व्हावें, व तीही सकल सद्गुणांची मूर्ति व प्रत्यक्ष दुःखावेगसमयींही अत्यंत धीरप्रकृति असून, अंत व्हावयाचा तो तिनें मिठी मारली असतांनाच व्हावा, याहून जास्ती भाग्य तें कोणतें?

( कासिम, कुसीद व मणिपाळ येतात. )

कासि०—अरे, ती अजागळ स्त्री कुठें आहे, जी आपल्या अनिवार्य उद्दाम शोकानें माझ्या आज्ञेप्रमाणें वर्तन होण्यासही अडथळा आणिते?—अरे कायरे गुलामांनो! असे मठ्ठासारखे पहात काय राहिलां? माझ्या आज्ञेशिवाय तुह्मीं या दोघांना काय ह्मणून भेटूं दिलें? अरे—करा करा—दोघांना निराळीं करा, नू हिला नेऊन कोठें तरी अंधार कोठडींत कोंडून ठेवून खुशाल हवी तितकी रडून डोकेंही फोडून घेऊंद्या!पहातां काय ह्या अविचारी पोराचें आत्तांच्या आत्तां मजसमक्ष गर्दन उडवून टाका पाहूं?

सुलो०—हे अरबा! मी तुझ्या पायां पडूं नये पण पडतें! तुजपुढें पदरही पसरतें, तूं माझें ह्मणणें सगळें ऐकून घे! मी या ठिकाणीं प्रत्यक्ष या परमेश्वरमूर्तीपुढें उभी आहें, व या मूर्तीचीच शपथ घेऊन सांगतें कीं हा माझाच पुत्र आहे! याच्या निष्ठुर जनकांस इकडे बोलावून आणीव! कां कीं तेच तुला भलतीच गोष्ट समजावून देऊन फसवीत आहेत! तुला खचित सांगतें, अगदीं तिऱ्हाइताचे प्राण वांचविण्याकरितां ते आपल्या स्वतःच्या बाळकास ही वधस्थानीं पाठविण्यास कबूल होऊन या हतभाग्य मातेस पुत्रमरणाचें असह्य दुःख देण्यासही मागें पुढें पहात नाहींत! पाहिजे तर त्यांनाच आणीव इकडे बोलावून!

( इतक्यांत मागून सिंहवर्मा येतो. )

सिंह०—माझ्या हृदयांत चोंहीकडे भीतीचा संचार होत असून आतां माझी प्रिया सुलोचनाच बोलत असल्याचा मला भास झाला खचित!

कासि०—( त्याला पाहून ) कायरे विश्वासघातक्या! आलास बरें झालें! दुष्टा अधमा! तुला आणखी एक वेळ विचारितों! बोल, हा हट्टी पोरगा कुणाचा कोण आहे?

सिंह०—हरहर! कासिमा! माझें हृदय आगोदरच चोंहींकडून शोकांनीं वेढून टाकिलें आहे, त्यांत आणखी भर कां बरें घालूं पाहतोस?

सुलो०—पुरे पुरे! प्राणनाथ! आतां हा बळेंच ओढून आणलेला हृदयाचा निष्ठुरपणा टाकून द्या! हा प्रत्यक्ष आपलाच बाळ असून तो आपल्या दृष्टीदेखत मरूं द्यावा हें तुह्मांला गोड तरी कसें वाटतें?

सिंह०—कासिमा! तूं इचे हे वेडगळ प्रलाप

ऐकत बसूं नको ! तुला आपला क्रोधाग्नि विजवायचा आहे, तो याच्याच रक्तांत विजीव कसा !

सुलो०—हायरे हाय ! नारायणा ! आतां मात्र माझ्या पुत्राच्या जीवनाविषयीं मी हताश झालें ! ( मूर्छित होऊन पडते. )

शूर०—हे दीनदयाळ प्रभो ! या माउलीच्या जीर्ण कुडीचें तूंच संरक्षण कर !—हे जुलुमी अधमा ! आतां बरीक तुजपुढें पदर पसरून मी मागणें मागतों कीं, तूं कृपा करून माझे प्राण घेऊं नको ! तुझ्या जुलुमी राज्यांत जिवंत राहून तुज अधमाचें जुलुमी वर्तन पहात रहाणें यांत बिलकुल भूषण नाहीं हें मी पूर्णपणें जाणतों, तथापि या माझ्या प्रियजननीच्या दुःखित हृदयाचें समाधान करण्यास सांपडावें एवढ्याचकरितां मी ही तुजपाशीं प्राणभिक्षा मागत आहें !

कासि०—हे चोर सगळे येथून तेथवर लबाड आहेत! त्यांनीं मला फसविण्याकरितां आजपर्यंत लबाड्या केल्या, तथापि आज हा खरा प्रकार बाहेर पडत आहे! या स्त्रीचें या वेळचें वर्तन खचित कपटाचें नसून तिचा हा प्रचंड दुःखावेगच हा पोर तिचाच पुत्र असें माझ्या अंतःकरणाला निश्चित वाटवितो!

सुलो०—( सावध होऊन) अहो! माझा बाळ कुठें आहे? निर्दयांनो! तुह्मीं त्याची आणि माझी ताडातोड नका करूं! मला त्याला मिठी तरी मारूं द्या!—बाळा! बाळा शूरसेना! माझ्या बाहूंनीं तुला घट्ट वेष्टिलें असतां प्रत्यक्ष तुझ्या क्रूरबुद्धि जनकांच्यानेंही तुझी आणि माझी ताडातोड करवणार नाहीं!

कासि०—हे स्त्रिये ! तुला खूळ लागलें आहे, व तूं व्यर्थ बडबड व शोक करते आहेस ! अंमळ शांत होऊन शोकाश्रूंचें परिमार्जन कर! कारण, माझें ऐकशील, तर अजूनही कदाचित् तूं आपल्या पुत्राचे प्राण वांचवूं शकशील !

सुलो०—बोल बोल लौकर ! कोणच्या उपायानें मी आपल्या बाळाचे प्राण वांचवूं शकेन?

कासि०—तुह्मीं सर्वांनीं मिळून जो या देशचा तोतया राजपुत्र दडवून ठेवला आहे, तेवढा माझ्या हवालीं करशील, तर तुझा पुत्र वांचतो !

शूर०—हे पूज्य माते ! या दुष्टाचें हें निंद्य व नीच भाषण तूं कधीं कधीं मान्य करूं नको ! तूं याच्या भाषणास मान द्यावास, यापेक्षां माझ्या शरीरावरील प्रत्येक नखमैंतून एकेक जीव निघून जाऊं लागेल, तरी तेंही पत्करेल ! माते ! इतकीं संकटें, इतके हाल, इतक्या आपत्ति भोगून जी तुझी आणि माझी गांठ पडली, तिचें खरें सार्थक होण्याला या सत्कार्यापायीं मी मेलोंच पाहिजे ! समजलीसना आई ?

कासि०—अरे आग लावा या पोराच्या मानीपणाला ! (एकीकडे कुसीदाशीं बोलत रहातो.)

सिंह०—परमेश्वरा ! तूं खचित खचित धन्य आहेस ! तुझ्या कृपेनें या वत्सासारखीं वीररत्नें या देशीं निपजतील, तर या देशाचें नष्टचर्य खचित अल्प कालांत संपून जाईल ! बाळा ! ये ! या तुझ्या वीरश्रीभरित देहाला या पित्याला कडकडून भेटूं दे ! ( शूरसेनास आलिंगन देतो. )

कासि०—अरे घातक्या ! चोरा ! इतका वेळ खरा प्रकार लपवून ठेवून शेवटीं झालास का एकदांचा कबूल ?

सिंह०—हे नीचा अरबा ! तूं मला दुःशब्दांनीं ताडन करितोस, तथापि माझें वर्तन मला दूषणीय न वाटतां उलटें त्यांत मी भूषणच मानितों ! हें भूषण मी नुसतें तुझ्यापुढेंच मानीत नसून प्रत्यक्ष सूर्यचंद्रादि देवता, ही परमेश्वरमूर्ति, धर्म, दशदिशा इत्यादि सर्वांपुढेंही मानितों !

शूर०—परमेश्वरा ! तुझी धन्यता किती ह्मणून वर्णावी ? शांतिवर्मजींनीं मला सांगितलें होतें कीं 'शूरसेना ! तुझा पिता कोण हें कळलें असतां तुझें तुला धन्य वाटण्याचीही कदाचित् पुढें मागें वेळ येईल !' ती वेळ हीच !

सिंह०—हे शूर वत्सा ! तुझा एकेक गुण पाहून माझ्या जिवाला जें समाधान व जो आनंद वाटत आहे, त्याचें मला वर्णनही करतां येत नाहीं. असे गुण तुझ्या अंगीं पाहून तुला कांहीं तरी योग्य बक्षीस देणें माझ्या हातीं पाहिजे होतें ! असो; परम न्यायी परमेश्वर, व तुझा अंतरात्मा हे तुला त्यांबद्दल उत्तम फळ देतील यांत संशय नाहीं!—प्रिये सुलोचने ! आतां या वत्साला मी आपला ह्मणून कबूलही केलें, इतःपर तुजवर माझा कांहीं राग राहिला नाहीं ! परंतु तुला एक गोष्ट सांगायची आहे, ती मजकडे पतिधर्म असल्यामुळें सांगतों !—

कासि०—काय ह्मणतोस ? थेरड्या गुलामा ! पतिधर्माची गोष्ट काढतोस ? ज्यानें प्रत्यक्ष राज्यकर्त्या राजाशीं विरोध केला, त्याला धर्म हीं अक्षरें उच्चारण्याचाही अधिकार राहिला नाहीं ! मग त्याजकडे पतिधर्म तो कुठून येणार ? अशा मनुष्याला जनता आपणाहून बाह्यच समजते ! हे मूर्ख स्त्रिये ! माझें बोलणें लक्षपूर्वक ऐक ! हा नीच सिंहवर्मा ह्याचें आजपर्यंत तुजशीं पतीचें नातें होतें, तें सर्व एकीकडे टाकून देऊन जर तूं मला हा संपूर्ण गूढ प्रकार काय आहे हें कळविशील, तरच तुझा पुत्र वांचेल ! बाकी हा राजभक्तिपराङ्मुख थेरडा—हा न्यायासनापुढें मेलाच समज !

सुलो०—मेल्या दुष्टा ! कसें ह्मणतोस ? मी आपला गृहिणीधर्म विसरून प्राणनाथांशीं बेइमान होऊं ? मेल्या ! तूं मला कोण ह्मणून समजला आहेस ? मी कोणी अरबाची बायको, कीं जिला सौभाग्याची परवा नाहीं, अशी असेनशी तुला भलतीच भ्रांति झाली आहे ? निर्लज्जा ! या सुलोचनेशीं असल्या अधम शब्दांचा उच्चार करण्यासही तुला कशी लाज नाहीं वाटली ? काळतोंड्या ! तूं ह्मणतोसही गोष्ट मी कदापि कबूल करणार नाहीं ! माझ्या प्राणनाथांची जी वाट तीच माझी! सत्कृत्याच्या पायीं आह्मां उभयतांचा नाशही झाला तरी पत्करला ! अनन्वित पातकाचरणें करून राज्यारूढ होण्यापेक्षां सदाचरणी राहून नाशही झालेला भूषणास्पदच आहे, समजलास ?

सिंह०—हे अमानुष अरबा! आतां मात्र तुझ्या ऐश्वर्याची व सामर्थ्याची मी मुळींच भीति बाळगीत नाहीं! घे ! प्रत्यक्ष हा तात, ही आई, व हा पुत्र, तिघेही तुज

समोर उभीं आहों! आह्मांला तुझ्यानें जेवढ्या ह्मणून वेदना देववतील तेवढ्या दे ! आह्मीं त्या एकूण एक मोठ्या आनंदानें सोसून सत्कीर्तिमार्गाचेंच अवलंबन करूं, मग त्यांत प्राण जावो कीं राहो !

कासि०—असें काय अधमांनो ! तर तुमचीं आतांच शंभर वर्षे भरलीं ! अरे पहातां काय ? पकडा या अधमांना, आणि तुरुंगांतील अंधारकोठड्यांत निरनिराळीं बंदोबस्तानें ठेवा ! तसाच धनपाळ कुठें असेल त्यालाही ताबडतोब पकडून आणा, ह्मणजे त्याच्या पित्याबरोबर त्यालाही यमसदनास पाठवितों !

मणि०—महासमर्थ खाविंद ! या दासाला आज्ञा होईल, तर या दुष्टांचे हाल हाल करण्याचें मजकडे सोंपवा ! मजपाशीं—अनेक वेदनायंत्रें आहेत, त्यांचा प्रयोग करून या दुरात्म्यांची दशा उडवून टाकतों !

कासि०—ठीक आहे, मणिपाळा ! या दुष्टांच्या तोंडून त्यांचे गुप्त हेतु एकूण एक काढून घेतले पाहिजेत ! ते न निघतील, तर मात्र माझा क्रोधाग्नि पेटून प्रत्यक्ष प्रलयकालच्या अग्नीसही मागें हटवील ! तुह्मी नीट यत्न करा, तो न साधेल तर माझ्या संपूर्ण सैन्यानिशीं त्या पंचगांग प्रांतावर चाल करून त्याला धुळीस मिळवून त्या ठिकाणीं राजबीज ह्मणून राहूं देणार नाहीं, तेव्हांच हा कासिम परत येईल !

( रागानें निघून जातो. )

कुसी०—मणिपाळा ! तूं या अधमांना घेऊन जा ! सिंहवर्म्या ! तुझी स्वारी माझ्या ताब्यांत ! चल !

सिंह०—खुशाल ! मी मोठ्या आनंदानें येतों ! वत्सा ! या आपत्प्रसंगीं तूं डगणार नाहींस अशी माझी पूर्ण खातरी आहे !—प्रिये! तूं मात्र या प्रसंगीं धैर्य सोडूं नको ! न्यायी परमेश्वर फक्त आपणा सर्वांचें सत्व पहातो आहे, तो अखेर आपला जयच करील !(कुसीदासहवर्तमान जातो. )

सुलो०—काय ? बाळा ! तूं मला मिळालास न मिळालास, इतक्यांत तूं मजपासून चाललास ना ! ( रक्षक त्यांस नेऊं पहात असतां त्यांच्याशीं झटपटत रहाते. )

शूर०—हायहाय ! आई ! तुझी सुटका करण्यास एकूण मी असमर्थ झालों अं !—हे अमानुष दुष्टांनो ! तुह्मीं इची आणि माझी ताडातोड करणार काय ?

( रक्षक त्यास ओढून नेतात. )

सुलो०—हाय हायरे वत्सा ! तूं मला अंतरलास, आतां बरीक या अधम नीचांनीं माझें सर्वस्व हिरावून घेतलें खचित! आतां मी कशाकरितां ह्मणून म्यावें ? या वत्साचें माझ्या पोटीं जनन झालें, संकटसमयीं त्याची सुटका करण्याकरितां मी धांवूनही आलें, यापेक्षां मज अबलेच्या हातून जास्ती तें काय होणार होतें ?—असो; आतां त्याचा नाश होणार हें तर ठरलेंच, याकरितां मीही त्याच्या सद्गुणांचेंच अनुकरण करीन ! त्या आणीबाणीच्या प्रसंगीं परमेश्वराचें नांव घेऊन जी शपथ वाहिली, तिचा अद्यापि भंग झाला नाहीं ! तसेंच त्या राजमूर्तीशींही विश्वासघाताचें आचरण अद्यापि घडलें नाहीं ! तेव्हां इतःपरही या माझ्या सद्गुणी बाळाचेंच अनुकरण करून राजभक्तीस्तव आपल्या

प्राणांची आहुतिही द्यावयाची हाच निश्चय ! ( सर्व जातात. )

---

## अंक ४.

### प्र० १–तुरुंग.

( शूरसेन निगडबद्ध होत्साता भुईवर आडवा पडला आहे, इतक्यांत अरबवेष घेतलेला वीरोत्तंस मणिपाळासह वर्तमान येतो. )

**मणि०**–महाराज ! तो पहा आपणावर आलेल्या संकटांची यत्किंचितूही पर्वा न करितां कसा धरणीवर पडला आहे ! आपण याच्याशीं बोलणें सवरणें तें थोडक्यांत आटपतें घ्यावें !

**वीरो०**–चिंता नाहीं !

**मणि०**–राजन् ! आपण हें करतां आहां, तरी पण काय असेल तें असो; माझ्या अंत:करणाला याबद्दल धास्ती वाटूं लागत आहे !

**वीरो०**–मणिपाळा! जास्ती बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं ! तुला एकच गोष्ट सांगतों, आतांची ही भेट होत असतां प्रत्यक्ष मृत्युही येणार असला तरीही चिंता नाहीं ! मी भेट घेणारच !

**मणि०**–आज्ञा. ( जातो. )

( वीरोत्तंस शूरसेनाजवळ जातो. )

**शूर०**–अरबा ! तुला काय पाहिजे? तूं कशाकरितां येथें आलास ?

**वीरो०**–हे उदार तरुण पुरुषा ! ऊठ! असा निजूं नको! मी ज्या कामाकरितां आलों आहें, तें काम असें तसें नाहीं! तें अत्यंत महत्वाचें आहे!

**शूर०**–( खडबडून उठतो. ) बोल. तुझें काय काम आहे ?

**वीरो०**–हे वीर व उदार पुरुषा! तूं कदाचित् असें समजत असशील कीं, तुरुंगासारख्या या भयाण जाग्यांत अरबवेषी जे म्हणून येतील, ते सर्व दुष्ट व हरामखोर घातकीच असतील, पण ही समजूत व्यर्थ आहे! या ठिकाणीं आजपर्यंत असंख्य घातुक कृत्यें झालीं आहेत, तथापि या ठिकाणीं मी जो आलों आहें, तो निर्मळ मनानें आलों आहें! हा मी बाह्यात्कारीं अरब दिसतों आहें, तथापि आंतून तुजप्रमाणेंच सिंधुजननीचाच पुत्र आहें!

(कृतीनें लावलेली दाढी त्यास काढून दाखवितो.)

**शूर०**–तूं दाखवितोस प्रत्यंतर, यावरून तूं सिंधुपुत्र असावास अशी माझी खातरी होते, व तुझ्या नेत्रांकडे पहातां त्यांमध्येंही विश्वासघातीपणाचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं, याकरितां काय बोलणें असेल तें खुशाल बोल !

**वीरो०**–तुझीं वीरश्रीचीं अलौकिक कृत्यें ऐकल्यापासून माझ्या मनांत तुजविषयीं बहुमान उत्पन्न झाला आहे; व एवढ्याचकरितां जो वीर उदार पुरुष आपल्या राजाकरितां आपले प्राणही देण्यास सिद्ध झाला, त्याची आपली प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी या हेतूनेंच मी येथें आलों आहें!

**शूर०**–एकूण मीं केलेलें कृत्य तुला मानवलें तर ?

**वीरो०**–मानवलें कीं नाहीं याविषयीं प्रत्यक्ष परमेश्वरच माझा साक्षी आहे ! हे वीरपुरुषा! तुला आणीक तर काय सांगूं? तुझें अद्भुत अलौकिक वर्तन,व तुझी वीरश्रीभरित

कृत्यें मनांत आणितां तुला बंदांतून मुक्त करून तुझ्या ठिकाणीं स्वतःच बंदिवान होऊन रहाण्याविषयींही मी उतावीळ झालों आहें !

शूर०—हे उदार पुरुषा ! तूं मजविषयीं जी स्नेहबुद्धि दर्शवीत आहेस, तिचें मी अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों! व इतःपर तुला मी माझा अत्यंत जिवलग स्नेहीच समजत जाईन !—बरें, पण मित्रा ! मला एक मोठा चमत्कार असा वाटतो कीं, परशत्रु या देशीं येऊन त्यानें या देशाच्या संपूर्ण वैभवाची तर काय, पण संपूर्ण सद्गुणांचीही राखरांगोळी करून टाकिली, व आतां जिकडे पहावें तिकडे हांजीहांजी करणारे व स्वकार्यसाधु मात्र लोक दृष्टीस पडतात, असें असतां त्यांमध्यें तूंच आपल्या देशाचें पूर्व वैभव व त्यांतील सद्धर्म आणि नीति यांची ओळख अद्यापि कसा विसरला नाहींस ? घटकाभर तेंही एकीकडे ठेविलें, तथापि या तुरुंगासारख्या भयाण जागीं, त्यांतूनही अंधार कोठडींत, मजसारख्या यःकश्चित् आसन्नमृत्यु भिकारड्याची मुद्दाम भेट घेण्याकरितां आलास हें कसें काय ?

वीरो०—भलतेंच ! तुला आसन्नमृत्यु ह्मणून कोण ह्मणतो ? तुला खचित सांगतों, तूं या दुष्टाच्या हातून मरणार नाहींस ! वीरोत्तंस महाराजांचें माझ्या तोंडून तुला असें सांगणें आहे कीं,—

शूर०—काय? वीरोत्तंस महाराजांचें सांगणें आहे ह्मणतोस?—अहाहा परात्परा जगदीशा ! नारायणा ! धन्य आहेस !—हे वीरपुरुषा ! काय ह्मणतोस? वीरोत्तंस महाराज कोठें आहेत ?

वीरो०—त्यांच्याबद्दल तुला चिंता करणें नलगे! ते जवळपास सुरक्षित असून, एखादा आकर्ण धनुष्य ओढून सोडिलेला बाण जसा अदृश्यरूपानें संचार करितो, त्याप्रमाणें याक्षणीं ते अदृश्य संचार करीत आहेत ! एवढेंच नव्हे, तर माझ्या तोंडून ते असेंही तुला कळवीत आहेत कीं, तुझे संपूर्ण सद्गुण आपण पूर्णपणें ओळखीत असून, त्यांजबद्दल आपल्या अंतःकरणांत पूर्ण प्रीति व पूज्यबुद्धि वास करीत आहे ! एवढेंच नव्हे, तर ते प्रत्यक्ष परमेश्वराची शपथ घेऊन असेंही ह्मणत आहेत कीं, तुजसारख्या निःसीम राजभक्ताला मरूं देण्यापेक्षां प्रत्यक्ष आपण होऊन प्रकट होऊन तुझे ऐवजीं स्वतःच अवदानही पडणार !

शूर०—काय! वीरोत्तंस महाराज मजकरितां मरणार? यःकश्चित् क्षुल्लक अधमाधम मी, त्या मजकरितां ते स्वतःच्या जीवावर उदार होणार? मित्रा! तूं कोणीही अस, तुझें नांवही अद्यापि मला कळलें नाहीं, तथापि तुझ्या पायां पडतों, माझी एवढी विनंती कृपा करून त्या राजमूर्तीस कळीवच! माझ्या प्रस्तुतच्या स्थितीबद्दल मला यत्किंचितही खेद अगर विषाद वाटत नाहीं! मी मेलों तर फार तर एक क्षुद्र कीटक मेला एवढेंच काय तें होईल; परंतु या राजमूर्तीची जर तशी स्थिति झाली, तर त्यायोगें सिंधुदेशचें राजकुळ व त्याचें संपूर्ण वैभव यांचा अखेरचा विलयच झालासें होणार आहे! याकरितां माझा त्यांना एवढाच निरोप कळीव कीं, मला खुशाल मरूं द्यावें, परंतु लक्षावधि प्रजाजनांचें हिताहित पहाण्याचा ज्यांकडे अधिकार, अशा आपल्या

प्राणांची आहुतिही द्यावयाची हाच निश्चय ! ( सर्व जातात. )

---

## अंक ४.

### प्र० १–तुरुंग.

( शूरसेन निगडबद्ध होत्साता भुईवर आडवा पडला आहे, इतक्यांत अरबवेष घेतलेला वीरोत्तंस मणिपाळासह वर्तमान येतो. )

मणि०–महाराज ! तो पहा आपणावर आलेल्या संकटांची यत्किंचित्‌ही पर्वा न करितां कसा धरणीवर पडला आहे ! आपण याच्याशीं बोलणें सवरणें तें थोडक्यांच आटपतें घ्यावें !

वीरो०–चिंता नाहीं !

मणि०–राजन्‌ ! आपण हें करतां आहां, तरी पण काय असेल तें असो; माझ्या अंत:करणाला याबद्दल धास्ती वाटूं लागत आहे !

वीरो०–मणिपाळा! जास्ती बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं ! तुला एकच गोष्ट सांगतों, आतांची ही भेट होत असतां प्रत्यक्ष मृत्युही येणार असला तरीही चिंता नाहीं ! मी भेट घेणारच !

मणि०–आज्ञा. ( जातो. )

( वीरोत्तंस शूरसेनाजवळ जातो. )

शूर०–अरबा ! तुला काय पाहिजे? तूं कशाकरितां येथें आलास ?

वीरो०–हे उदार तरुण पुरुषा ! ऊठ! असा निजूं नको! मी ज्या कामाकरितां आलों आहें, तें काम असें तसें नाहीं! तें अत्यंत महत्वाचें आहे!

शूर०–( खडबडून उठतो. ) बोल. तुझें काय काम आहे ?

वीरो०–हे वीर व उदार पुरुषा! तूं कदाचित्‌ असें समजत असशील कीं, तुरुंगासारख्या या भयाण जाग्यांत अरबवेषी जे ह्मणून येतील, ते सर्व दुष्ट व हरामखोर घातकीच असतील, पण ही समजूत व्यर्थ आहे! या ठिकाणीं आजपर्यंत असंख्य घातुक कृत्यें झालीं आहेत, तथापि या ठिकाणीं मी जो आलों आहें, तो निर्मळ मनानें आलों आहें! हा मी बाह्यात्कारीं अरब दिसतों आहें, तथापि आंतून तुजप्रमाणेंच सिंधुजननीचाच पुत्र आहें!

(कृतीनें लावलेली दाढी त्यास काढून दाखवितो.)

शूर०–तूं दाखवितोस प्रत्यंतर, यावरून तूं सिंधुपुत्र असावास अशी माझी खातरी होते, व तुझ्या नेत्रांकडे पहातां त्यांमध्येंही विश्वासघातीपणाचें कांहीं चिन्ह दिसत नाहीं, याकरितां काय बोलणें असेल तें खुशाल बोल !

वीरो०–तुझीं वीरश्रीचीं अलौकिक कृत्यें ऐकल्यापासून माझ्या मनांत तुजविषयीं बहुमान उत्पन्न झाला आहे; व एवढ्याचकरितां जो वीर उदार पुरुष आपल्या राजाकरितां आपले प्राणही देण्यास सिद्ध झाला, त्याची आपली प्रत्यक्ष ओळख करून घ्यावी या हेतूनेंच मी येथें आलों आहें!

शूर०–एकूण मीं केलेलें कृत्य तुला मानवलें तर ?

वीरो०–मानवलें कीं नाहीं याविषयीं प्रत्यक्ष परमेश्वरच माझा साक्षी आहे ! हे वीरपुरुषा! तुला आणीक तर काय सांगूं? तुझें अद्भुत अलौकिक वर्तन, व तुझी वीरश्रीभरित

कृत्यें मनांत आणितां तुला बंदांतून मुक्त करून तुझ्या ठिकाणीं स्वतःच बंदिवान होऊन रहाण्याविषयींही मी उतावीळ झालों आहें !

शूर०—हे उदार पुरुषा ! तूं मजविषयीं जी स्नेहबुद्धि दर्शवीत आहेस, तिचें मी अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों! व इतःपर तुला मी माझा अत्यंत जिवलग स्नेहीच समजत जाईन !—बरें, पण मित्रा ! मला एक मोठा चमत्कार असा वाटतो कीं, परशत्रु या देशीं येऊन त्यानें या देशाच्या संपूर्ण वैभवाची तर काय, पण संपूर्ण सद्गुणांचीही राखरांगोळी करून टाकिली, व आतां जिकडे पहावें तिकडे हांजीहांजी करणारे व स्वकार्यसाधु मात्र लोक दृष्टीस पडतात, असें असतां त्यांमध्यें तूंच आपल्या देशाचें पूर्व वैभव व त्यांतील सद्धर्म आणि नीति यांची ओळख अद्यापि कसा विसरला नाहींस ? घटकाभर तेंही एकीकडे ठेविलें, तथापि या तुरुंगासारख्या भयाण जागीं, त्यांतूनही अंधार कोठडींत, मजसारख्या यःकश्चित् आसन्नमृत्यु भिकाऱ्याची मुद्दाम भेट घेण्याकरितां आलास हें कसें काय ?

वीरो०—भलतेंच ! तुला आसन्नमृत्यु ह्मणून कोण ह्मणतो ? तुला खचित सांगतों, तूं या दुष्टाच्या हातून मरणार नाहींस ! वीरोत्तंस महाराजांचें माझ्या तोंडून तुला असें सांगणें आहे कीं,—

शूर०—काय? वीरोत्तंस महाराजांचें सांगणें आहे ह्मणतोस ?—अहाहा परात्परा जगदीशा ! नारायणा ! धन्य आहेस !—हे वीरपुरुषा ! काय ह्मणतोस? वीरोत्तंस महाराज कोठें आहेत ?

वीरो०—त्यांच्याबद्दल तुला चिंता करणें नलगे! ते जवळपास सुरक्षित असून, एखादा आकर्ण धनुष्य ओढून सोडिलेला बाण जसा अदृश्यरूपानें संचार करितो, त्याप्रमाणें यांक्षणीं ते अदृश्य संचार करीत आहेत ! एवढेंच नव्हे, तर माझ्या तोंडून ते असेंही तुला कळवीत आहेत कीं, तुझे संपूर्ण सद्गुण आपण पूर्णपणें ओळखीत असून, त्यांजबद्दल आपल्या अंतःकरणांत पूर्ण प्रीति व पूज्यबुद्धि वास करीत आहे ! एवढेंच नव्हे, तर ते प्रत्यक्ष परमेश्वराची शपथ घेऊन असेंही ह्मणत आहेत कीं, तुजसारख्या निःसीम राजभक्ताला मरूं देण्यापेक्षां प्रत्यक्ष आपण होऊन प्रकट होऊन तुझे ऐवजीं स्वतःच अवदानही पडणार !

शूर०—काय! वीरोत्तंस महाराज मजकरितां मरणार? यःकश्चित् क्षुल्लक अधमाधम मी, त्या मजकरितां ते स्वतःच्या जीवावर उदार होणार? मित्रा! तूं कोणीही अस, तुझें नांवही अद्यापि मला कळलें नाहीं, तथापि तुझ्या पायां पडतों, माझी एवढी विनंती कृपा करून त्या राजमूर्तीस कळीवच! माझ्या प्रस्तुतच्या स्थितीबद्दल मला यत्किंचितूही खेद अगर विषाद वाटत नाहीं! मी मेलों तर फार तर एक क्षुद्र कीटक मेला एवढेंच काय तें होईल; परंतु या राजमूर्तीची जर तशी स्थिति झाली, तर त्यायोगें सिंधुदेशचें राजकुळ व त्याचें संपूर्ण वैभव यांचा अखेरचा विलयच झालासें होणार आहे! याकरितां माझा त्यांना एवढाच निरोप कळीव कीं, मला खुशाल मरूं द्यावें, परंतु लक्षावधि प्रजाजनांचें हिताहित पहाण्याचा ज्यांकडे अधिकार, अशा आपल्या

अमूल्य प्राणावर त्यांनीं कदापि उदार होऊं नये !

वीरो०—( आपणाशीं ) हे न्यायी दयाघन परमेश्वरा ! या वीर पुरुषाच्या तोंडचे हे शब्द ऐकून मी मुकाट्यानें निर्विकार कसें तरी रहावें? हरहर! अंतःकरणांतील प्रेम व कृतज्ञताबुद्धि यांचे उमाळे अश्रुद्वारा बाहेर पडूं पहाताहेत, त्यांचा अवरोध तरी कसा करूं ? ( डोळ्यांतून अश्रु येतात. )

शूर०—अरे, हा काय चमत्कार ? हे पुरुषा! तुझ्या नेत्रांतून हा अश्रुप्रवाह काय ह्मणून येतो ! आणि तूं आपले उसासेही छपवूं पहातोस, याचें काय बरें कारण ? ( आपणाशीं ) या अंधाऱ्या जागेंत जरी चांगलें स्वच्छ दिसत नाहीं, तरी याला होत असलेल्या दुःखावरून हा कोणी साधारण मनुष्य नसावा असा तर्क होतो ! ( उघडपणें ) हे उदार पुरुषा ! बोल, तूं कोण आहेस ?

वीरो०—कसें ह्मणतोस ? मी कोण आहें ?— हायहाय ! हे वीरपुरुषा ! तुला काय सांगूं ? माझ्या सारखा प्राणी हतभाग्य या धरित्रीतलावर एकही नसेल ! इतरांना दुःखें आहेत, व त्यांचा केव्हांना केव्हां तरी अंत होण्याचा संभव असेल; परंतु या हतभाग्याच्या दुःखांचा अंत ह्मणून होणेंच नाहीं ! हा प्राणी स्वतः अत्यंत हतभाग्य आहे एवढेंच नाहीं, तर तसाच अत्यंत पातकीही आहे ! आपल्या एका जीवाकरितां दुसऱ्यांनाही दुःखांत पाडणारा याजसारखा दुसरा कोण अधम आहे ? हरहर ! हे वीर पुरुषा ! असा अत्यंत हतभाग्य व अत्यंत पातकी अधम प्राणी वीरोत्तंस, तोच हा यावेळीं तुजपुढें उभा आहे !

शूर०—काय ? **वीरोत्तंस** महाराज आपणच !

वीरो०—ज्या हतभाग्याला सर्वजण राजाची पदवी देताहेत, तो हतभाग्य हाच रे हाच! हायहाय ! ज्यावेळीं मी नुकता **सिंहवर्म** महाराजांचा पुत्र ह्मणूनच आपणास समजत असें, त्यावेळीं मी किती सुखी होतों ! त्यावेळीं नुसत्या संसारकृत्यांकडेच काय तें लक्ष पुरवून, ज्या पूज्यपुरुषाला मी आपला पिता ह्मणून समजत असें, त्याच्या वर्तनानुसार आपणही वर्तन करावें, एवढेंच कार्यतें मजकडे असे ! परंतु आतां—

शूर०—( आपणाशीं ) हा पुरुष आपणाला **वीरोत्तंस** महाराज ह्मणून ह्मणवितो, व तें माझ्या अंतःकरणाला खरेंही वाटतें ! ( उघडपणें ) महाराज ! आपण जर **वीरोत्तंस** महाराज खरे असाल,—व या वेळीं माझ्या चित्तालाही आपणच ते असें वाटूं लागतें आहे,—तर महाराज! या संपूर्ण राष्ट्राचें कल्याण अगर अकल्याण करण्याचा अधिकार आपणाकडेच आहे !

वीरो०—काय ह्मणतोस? राष्ट्राचें कल्याण कोण मी करणार ? हर हर ! मला जें इतकें अपरिमित दुःख वाटत आहे तें एवढ्याकरितांच ! कारण काय पहा, ही सर्व लढाई उत्पन्न झाली मूळ माझ्याकरितां ! या सर्व देशांतील लक्षशः शूर लोक मेले कोणाकरितां, तर मज एकट्याकरितांच ! **सिंहवर्म** महाराज व **सुलोचना** मातुश्री यांना कारागृहांत घालविण्यास कारण कोण, तर मीच ! ज्यांनीं लहानपणापासून माझें संगोपन केलें, त्यांना तुरुंगांत अंधार

कोठडींत पोंचविणारा अधमाधम हा मी ! हायहाय ! हा वीरोत्तंस राज्याधिकारावर येऊन आपल्या प्रजाजनांस कोणतें हेंच सुख देणार ? स्वतः भीरुजनांप्रमाणें गुप्त राहून, आपमतलबासाठीं तुला व तुझ्या माता पितरांना खुशाल कारागृहांत पडलेलें पहावें; फार तर काय, त्यांचा अल्प काळांतच घात होणार असतां त्यांचीही मुकाट्यानें उपेक्षा करून लपून असावें, व इतकें करून शेवटीं आपणास राजा ह्मणवून घ्यावें, यापेक्षां दुसरा अधमपणा तो कोणता? व अशा अधमापासून प्रजेनें सुख तरी कसें चिंतावें ?

शूर०—महाराज ! आपण खचित कांहीं तरी भ्रमांत पडलां आहां ! नाहीं तर आपण ज्यांकरितां शोकाकुल होत आहां, त्या गोष्टींचा क्षणमात्रही विचार मनांत आणायलाच नको आहे !

वीरो०—असें कसें ह्मणतोस बरें ? मला तर खातरीनें असें वाटतें कीं, ब्रह्मदेवानें या वीरोत्तंसाच्या कपाळीं इतःपर दुःखांशिवाय दुसरें कांहीं देखील लिहिलें नाहीं ! कारण तसें जर नसतें, तर तूंच नीट विचार करून सांग, कीं ज्यांनीं ज्यांनीं मजविषयीं अप्रतिम स्नेह, दया, भक्ति, सौजन्य हींच निरंतर प्रकट केलीं, त्यांच्यावरच खुद्द प्रसंग येऊन गुदरला असतां त्यांचें रक्षण करण्याचें यत्किंचितूही साधन या हतभाग्यापाशीं नसावें ?

शूर०—महाराज ! आपण असे विनाकारण शोकाकुल काय ह्मणून होतां ? अजून काय झालें आहे ? हें सामर्थ्य आपल्या अंगीं आज नसलें, तरी तें पुढें केव्हां ना केव्हां तरी आल्याशिवाय रहाणार नाहीं !

वीरो०—हें बोलणें व्यर्थ आहे ! मला सामर्थ्य येणार, तें केव्हां? तुझा, आणि तुझीं पूज्य मातापितरें, जीं थोड्या काळापूर्वीं माझींही मातापितरें ह्मणून मी समजत होतों, त्यांचा, अंत झाल्यावर ! धिक्कार असो ! धिक्कार असो ! असें होण्यापेक्षां प्रत्यक्ष या देहांतच—अगर त्या दुष्टाच्या तरी कंठनालांत—तरवार भोंसकतां आली असती, तर किती बरें चांगलें होतें ?

शूर०—महाराज! आतां मात्र आपण योग्य बोललांत! आपण सदा सर्वकाळ त्या दुष्ट अरबाचा सूड उगविण्याच्या विचारांत असावें हेंच योग्य! व याकरितांच मी ह्मणतों, आपण इतर विचार मनांत आणूंच नयेत! महाराज!—हरहर! हा सर्व विचार आपण एकीकडे ठेवून या भयंकर ठिकाणीं काय ह्मणून येणें केलेंत ? महाराज ! हें ठिकाण मोठें वाईट आहे, व या ठिकाणीं कोणत्या वेळीं काय दगा होईल याचा कांहीं नेम नाहीं !

वीरो०—तूं ह्मणतोस हा प्रकार कसाही असला, तरी प्रत्यक्ष सिंहवर्म महाराजांचें घरचें घर सबंध बसण्याचीच वेळ आली असतां, त्याबद्दलची यत्किंचितूही परवा मनांत न धरितां मी अधमपणानें आपल्यापुरताच विचार करीत राहून कोठें तरी तोंड काळें करण्या जोगा नीच मी असेन असें तुला वाटतें काय ? हे उदार पुरुषा ! खचित खचित, तुझे इतक्या हलक्या प्रतीचे विचार असतील असें मला तर नाहीं वाटत !

शूर०—महाराज ! आपण या भयाच्या स्थळीं

इत:पर राहूं नये ! आपल्या स्वत:च्या प्राणांची आपण किंमत ओळखीत नाहीं, तथापि खचित सांगतों, आपण त्याविषयीं अधिक विचारच केला पाहिजे ! तसेंच, आपले महात्मे, पुण्यकर्मे, महान् पराक्रमी पूर्वज, यांच्याही योग्यतेचा विचार आपण मनांत आणिला पाहिजे !

वीरो०—तूं ह्मणतोस, त्याप्रमाणें सर्व विचार मनांत आणिला ! माझ्या पूर्वजांच्या अंगीं जो महात्मतेचा सद्गुण होता, तो जर मजमध्यें नाहीं, तर त्यांच्या वंशीं माझें जनन झालें असूनही व्यर्थ हेंच खचित! असो; आतां तुला एकच सांगतों, तूं मला भीतीच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्यास, तरी मी त्यांची परवा न करितां, येथेंच राहून ही रात्र संपण्याचे पूर्वींच, अपराधांनीं विटाळलेल्या या भिंती फोडून व तुझ्या या दुष्ट बेड्या तोडून तुला बंधमुक्त करीन ! यांत काडीमात्र अंतर होणार नाहीं !

( इतक्यांत मणिपाळ येतो. )

मणि०—आतां अधिक बोलत बसण्यास सवड नाहीं ! महाराज ! आपण येथें क्षणभरही अधिक रहाल, तर काय संकट कसें येईल याचा नेमही सांगतां येणार नाहीं !

वीरो०—मणिपाळा ! त्याविषयीं काळजी करणें नलगे ! मी असा बेमालूम वेष बदलला आहे कीं, माझा कोणासही यत्किंचित् देखील संशय येऊं शकणार नाहीं !

( इतक्यांत बाहेर वाद्यें वाजल्याचा आवाज ऐकूं येतो. )

शूर०—हा एकदम कशाचा आवाज ऐकूं येतो बरें ?

मणि०—वरती वाड्यांत गाणें बजावणें वगैरे चाललें असून त्याचाच हा मोठ्यानें आवाज ऐकूं येत आहे !

वीरो०—असें काय ? एकूण ह्या दुष्टास जयप्राप्ति झाली, त्याच्या आनंदांत स्वारी गढून गेली आहे ! कांहीं चिंता नाहीं ! थोडक्याच वेळांत या आनंदाची परिसमाप्ति होऊन हा अधम नष्टप्राण होऊन पडेल ! मणिपाळा ! माझा बेत सर्व जमून येण्याचा रंग दिसतो आहे ! जागोजाग वीरांचीं गुप्त ठाणीं तयार आहेत !—हे वीरा ! हा प्रभाव सर्व तुझ्या त्या पूज्य पितृचरणांचा ! त्यांनींच आजचा हा व्यूह मूळ मनांत आणून त्याला रेघारूपास आणिलें! वर यावेळीं गाण्या बजावण्याची चैन चालली आहे, पण हे लोक अंमलशानें कैफानें गुंग होऊन गेले ह्मणजे मग सगळी चैन जागचे जागींच राहील !

मणि०—महाराज ! संपूर्ण तयारी कडेकोट झाली आहे ! आपल्या पक्षाचे सर्व वीर पूर्वीं ठरलेल्या ठिकाणीं जमले असून, सूचना होण्याचाच कायतो अवकाश, ती केव्हां होते याचीच मुकाट्यानें वाट पहात आहेत !

शूर०—असें काय ? तर हे दुष्टा कासिमा ! तूं असाच चैनींत दंग होऊन रहा, ह्मणजे तिचें सुख तुला चांगलें निरंतर उपभोगायला मिळेल !

वीरो०—तो आजच्या रात्रींतून जिवंत राहील तेव्हांची पुढची गोष्ट ! कुसुंबा, भांग, गांजा इत्यादिकांच्या सेवनांत त्या दुष्टाचे सरदार व इतर अनुयायी अगदीं मग्न होऊन गेले आहेत!—अरेरे दुष्टा! तूं काय समजला आहेस? अल्प काळांतच तुझें चंदन

करून तुला कोल्ह्या कुत्र्यांच्याच भक्षस्थानीं पाडतों !

**मणि०**—( पाहून ) हां, आतां मात्र हें बोलणें पुरें झालें पाहिजे ! कारण तो **कुसीद** या इकडेच येत आहे ! याकरितां महाराज ! आपण हुशारीनें सावध रहावें ! ( वीरोत्तंस दडून रहातो. ) ( इतक्यांत कुसीद येतो, त्यास ) हा आपला कैदी संभाळा !

**कुसी०**—तिकडे **सुलोचनेनें** रडण्याचा आकांत करून सोडला आहे, याकरितां **कासिमशहांनीं** याला तिजकडे घेऊन जाण्याविषयीं आज्ञा केली आहे !

**शूर०**—धन्य आहे ! अरे, चल, मला घेऊन चल ! मातेचें समाधान केव्हां करीन असें मला झालें आहे !

**वीरो०**—( लपल्या जागीं आपणाशीं ) याचा काय बरें अर्थ ? त्या दुष्टाचा इरादा कांहीं भलताच असावा असें धोरण दिसतें ! ( कुसीदाची आपणाकडे पाठ असतां परस्पर निघून जातो. )

**कुसी०**—आतां या **शूरसेना**ला त्याच्या आईकडे नेऊन पोंचविलें असतां तो तिच्या गळ्याला कडकडून मिठी मारील, व तिच्याशीं प्रेमानें बोलूं लागेल ! अशा स्थितींत दोघांना निरनिराळें केलें ह्मणजे **सुलोचना** निरुपाय होऊन शोक करूं लागेल, व अशा युक्तीनें सगळें भांडवल तिच्या तोंडून आपोआप बाहेर पडेल ! (बाहेर पडूं लागतो, इतक्यांत कासिम आंत येतो, ( त्यास पाहून) काय सरकार ?—सरकार! या वेळीं ह्मटलें ह्मणजे आपली स्वारी सुखानुभवांत दंग व्हावयाची, असें असतां आपण या भयाण जागेकडे येणें केलें हें कसें?

**कासि०**—काय सांगूं **कुसीदा**! या वेळीं मला स्वस्थता बिलकुल कशी ती वाटत नसून माझा अंतरात्मा संपूर्ण अंधकारमय झाला आहे ! आज मीं एवढा जय मिळविला, परंतु जोंपर्यंत तो भिकरा कारटा लपून छपून आहे तोंपर्यंत तो जय मिळून आणि न मिळून व्यर्थच ! हा दुष्ट पोर चोरट्या सर्पाप्रमाणें कोठें दडून बसला आहे, यामुळें माझ्या सर्व आनंदाचा पहा कसा विरस होऊन गेला आहे !

**कुसी०**—सरकार ! इतकी पंचाईत करीत बसण्यापेक्षां मला वाटतें, **सिंहवर्मा**, **सुलोचना** व त्यांच्या पक्षाची जी ह्मणून मंडळी आपल्याला वाटते, त्या सर्वांचा एकदम शिरच्छेद करून टाकावा ह्मणजे कटकट मिटली ! आपल्या शत्रूंचा सर्व जोर काय तो **सिंहवर्म्या**वर, याकरितां त्याचीच कत्तल झाली ह्मणजे सर्व आटोपलें !

**कासि०**—**कुसीदा** !असें नव्हे ! **सिंहवर्म्याचा** घात केला असतां त्यापासून आपलीं भयाचीं कारणें कमी न होतां उलटीं वृद्धिंगतच होणार ! कारण काय ह्मणशील, तर त्यानें जी कांहीं मसलत योजिली आहे, ती त्याचा अंत झाला असतां त्याची त्याजवळच राहून जाईल !—बरें ते असो; तूं गेला होतास **सिंहवर्म्याकडे** ? तर मग त्याच्या बद्दलचें कसें काय ? आहे कांहीं वळण्यासारखें वाटतें ?

**कुसी०**—वळण्याचें नांव नाहीं ! एवढेंच नव्हे, तर जणों काय ढगांनीं आच्छादिलेला सूर्यच ढगांतून बाहेर निघून प्रकाशमान व्हावा, अशा प्रकारें त्याचा चेहेरा राहून राहून प्रफुल्लित दिसूं लागतो ! मीं

आपल्याकडून हवा तितका यत्न केला, तथापि, त्याच्या तोंडून धिक्काराशिवाय एक शब्दही कसा तो निघाला नाहीं !

कासि०—अरेरेरेरेरेरेरेरे ! हा अधम लौकर मरतां उपयोगीं नाहीं ! याला असाच कुजत कुजत मरत ठेवला पाहिजे !

कुसी०—सरकार ! एक गोष्ट सुचवावीशी वाटते, पण ती माझी मलाही गौणच वाटते! तथापि आज्ञा असेल तर सुचवितों!

कासि०—खुशाल सुचीव !

कुसी०—आज्ञा. सरकार ! या अधमाची बायको सुलोचना निरंतर दुःख करून इतकी खप्पड झाली आहे, तथापि तिचें वय पस्तीस छत्तीशीजवळ आहे ! निदान तिची चाळिशी तरी उलटून गेली नाहीं ! याकरितां मला वाटतें, तिला पट्टराणी करण्याची भुलवणी लावून तिजशीं जर सरकारांनीं गोड गोड व्यवहार करण्याची हलकेच लालूच दाखविली, तर अल्प प्रयत्नांतीं ती कबूल होईल, व आपणाला सर्व प्रकार सांगेल !

धीरो०—भलतेंच ! ही गोष्ट मला कदापि मानवायची नाहीं ! स्त्रियांच्या नादीं लागून आजपर्यंत अनेक पुरुष फसले आहेत, व गजांत लक्ष्मीही हरवून बसले आहेत ! इतकें करूनही त्यांना स्त्रियांचें मनोगत नाहीं कळलें तें नाहींच ! तेव्हां त्यांत कांहीं अर्थ नाहीं ! आणखी तशांतूनही विषयवासनेच्या संबंधानें माझेंदेखील उतार वयच झालें आहे ह्मणण्यास चिंता नाहीं! यासाठीं हा व्यर्थ नाद नकोच! आरंभापासून माझा शिपाई बाणा ! नाहीं ह्मणायला, स्वस्त्रीशिवाय आजपर्यंत एकीवर बलात्कार केला ! आतां तीही मरून गेली ! मरते समयी तिनें मला शाप दिले, ते मात्र माझ्या काळजाला सदा सर्वकाळ टोंचीतच आहेत, याकरितां पुनरपि ती वाट नको !

कुसी०—शाप देणें, शिव्या देणें हा बायकांचा स्वभावच आहे, यासाठीं सरकारांनीं अशांचें बोलणें अगदीं काळजालाच लावून घ्यावें हे माझ्या अल्पबुद्धीनें अंमळ——

कासि०—तें जाऊंदे ! त्यांत कांहीं जीव नाहीं! कुसीदा! माझ्या मनांत या अधमांचे हाल हाल करून कांहीं होईल निष्पन्न तर पहायचें आहे ! त्याप्रमाणें कार्यभाग न होईल, तर पंचगांग प्रदेशावर मी स्वारी करणार ! असो; तूं आतां जा, आणखी त्या थेरड्या चोराला इकडे घेऊन ये !

कुसी०—आज्ञा ! (जातो.)

कासि०—मी या दुष्टांचा इतका द्वेषच करीत आहें, तथापि काय यांचें हें लोकोत्तर धैर्य ! खचित खचित, या धैर्यांतच त्यांच्या जीवाला अनुपम समाधान होत असेल ! असें समाधान या पातक्याच्या जीवाला कशानें होणार ?

(इतक्यांत कुसीद सिंहवर्म्याला घेऊन येतो.)

कुसी०—हुकुमाप्रमाणें कैदी हजर आहे सरकार !

कासि०—हे अधमाधम थेरड्या ! तुझें तोंडही या नेत्रांनीं पाहूं नये इतका माझ्या मनांत तुजविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला आहे! तथापि कृतकर्मांचा तुला पश्चाताप झाला आहे कीं नाहीं हें पहावें. एवढ्याचकरितां मी तुला पुनरपि आपणापुढें आणविलें

आहे ! यासाठीं अद्यापि नीट विचार कर! तुला आतां थोडका वेळ जगावयाचें आहे, याकरितां तेवढ्यांत आपल्या जीवाला काय पश्चाताप वाटवून घ्यावयाचा असेल, तेवढा वाटवून घे !

**सिंह०**—मूर्खा अरबा ! तुझ्या अन्यायी आज्ञा ऐकणें व तदनुसार वर्तन करणें हेंच अत्यंत अघोर पातक होय! तूं अन्यायानें मला जी गोष्ट करावयास सांगत आहेस, ती करणें यासारखें अत्यंत अघोर नीच पातकच जगांत दुसरें नाहीं ! फार तर काय, तूं जी गोष्ट मला करावयास सांगत आहेस, ती करूं नको ह्मणून तुझ्या आवाजापेक्षांही अनंत पटींनीं प्रचंड आवाज माझ्या कानीं पडत आहे! तो आवाज कोणाचा ह्मणशील, तर या सिंधुदेशच्या राजवंशांतील जे पुरुष त्वां दुष्टानें गतप्राण करून टाकिले त्यांचा ! अधमा ! तूं समजत असशील कीं या लोकीं ते गतप्राण झाले ह्मणून ते वध्यानें ते संपूर्ण विश्वालाही मुकले, तर ती चूक आहे ! त्यांचे अंतरात्मे अद्यापि कायम असून त्यांच्या मर्त्य कुडीस झालेल्या क्षतांची संवेदना अद्यापि जागरूकच आहे, व तशा स्थितींतच ते सकलचराचरनियामक जो प्रभु त्याच्या न्यायासनापुढें उभे राहून तुज दुष्टाचा 'सूड ! सूड !' ह्मणून एकसारखे ओरडत असलेले माझ्या कानीं पडत आहेत !

**कासि०**—काय ह्मणतोस थेरड्या अधमा ! माझा सूड ?—दुष्टा ! मीं जें वर्तन केलें तें अन्यायाचें होतें कायरे ?—मूर्खा ! विचार कर ! विचार कर ! मी या तुमच्या देशीं आलों त्यावेळीं या ठिकाणीं आपआपसांत द्वंद्व चालत असून त्यावेळांच सर्व लोक कसे जेरीस आले होते ! कृतघ्ना ! अशा स्थितींत मध्यें पडून मीं बेबंद पाच्छाई मोडून टाकून सर्वत्र एकछत्रीं राज्य केलें, त्याकरितां माझा सूड घ्यायचा कायरे ?

**सिंह०**—कसें ह्मणतोस दुष्टा ! तूं या देशची बेबंद पाच्छाई मोडून या ठिकाणीं एकछत्री राज्य केलेंस ? असें होतें तर अधमा ! आमच्या महाराजांच्या दायादामागून प्रत्यक्ष त्यांचें हनन करण्याचें तुला काय बरें प्रयोजन होतें ? तसेंच दुष्टा ! तूं आलास त्या वेळीं तुला बेबंद पाच्छाई कोणची आढळली होती ? महाराज व त्यांचे दायाद यांचें एक द्वंद्व चाललें होतें, तथापि प्रजाजनांचें नुकसान त्यांच्या हातून कोणतें होत होतें ? यद्यपि त्या उभयतांचा कलह चालला होता, तथापि प्रजाजन आपआपल्या नित्य व्यवहारांत आनंदानें काळक्रमणा नव्हतेरे करीत ? महाराजांनीं प्रजांचे धर्म, त्यांचे आचार, त्यांचे उद्दीम धंदे, यांपैकीं कशाला तरी यत्किंचितही त्रास दिला होता काय? अधमा! नीचा ! तूं एवढी बढाई सांगून फुशारकी मिळवूं पहातोस, तर सांग, तूं येथें आल्यापासून प्रजाजनांस सुख तें कोणतें दिलेंस ? प्रजेच्या द्रव्याचा अपहार तर केलास ! त्यांच्यावर अनन्वित कर बसवून त्यांना जेर तर केलेंस ! विद्याकलांचा तर बहुतेक संपूर्ण ऱ्हासच करून टाकिलास ! असंख्य प्रजाजन, जे कधीं कोणाच्या अध्यांत ना मध्यांत, त्यांस विनाकारण यमसदनास तर पोंचाविलेंस! संपूर्ण देशांत जिकडे तिकडे हाहाकार, प्रत्यहीं नव्या नव्या

विधवा, नवीं नवीं पोरकीं मुलें, हींच दृष्टीस पडत आहेत! अधमा!—

कासि०—दुष्टा! थेरड्या! बडबड पुरे कर! मी जे संशय विचारितों, तेवढ्यांचेंच निराकरण कर! तुझ्या अप्रासंगिक व निरर्थक बडबडीची मला जरूर नाहीं!

सिंह०—दुष्टा! अखेरे माझीच बडबड व्यर्थ, आणि तुझी नाहीं? आमच्या धर्माचाही उच्छेद करण्याचा तुज अधमाचा यत्न होता हें सगळेंच थोतांड एकूण? चिंता नाहीं! आज एकसहा वीस वर्षें झालीं, या सिंधुसर्वंसहेला[1] तुज दुष्टाचा भार असह्य झाला आहे! तूं या धर्मशील राजमूर्तींचा वध केलास, त्याबद्दल तुला अघोर प्रायश्चित भोगावें लागेलच लागेल! तुझा अंत ब्रह्मादिकांच्या हातूनही टळावयाचा नाहीं! दुष्टा! नीचा! अधमा! माझें बोलणें लक्षपूर्वक ऐकून थर थर कांपूं लाग! तूं जीं अधमाधमपणाचीं कृत्यें केलीं आहेस, तीं या न्यायी धर्ममूर्तिला पसंत नसून तुझा अल्पकाळांतच अंत होणार म्हणूनही या चित्रगुप्तानें अगोदरच लाल भडक रक्ताच्या शाईनें लेख लिहून ठेविला आहे! फार तर काय, या राजवाड्यांतील रत्नखचित भिंतींवर सुद्धां तीं अक्षरें स्पष्टपणें उमटलेलीं अल्पकाळांतच तुझ्या दृष्टीस पडतील!—पहा, त्या तिकडे आकाशवितानाकडे पहा, त्यानंतर तुज पाप्याच्या काळजाप्रमाणेंच सर्वत्र काळोख पसरत चालला असून, त्यांतून त्या यमधर्माची स्वारी महिषारूढ होऊन तुजकडे येऊंही लागली आहे!

कासि०—चाचाटा! थेरड्या! तुझा तो यमधर्म, चित्रगुप्त इत्यादि चट सारे मी गुंडाळून ठेवितों! तुझ्या भागूबाईसारख्या पोकळ गप्फांनीं भिणारा मी मनुष्य नाहीं! गप्प बस आतां!—तिकडे कोण आहे? कुसीद?

( कुसीद येतो. )

कुसी०—सरकार! काय आज्ञा आहे?

कासि०—पुत्रशोकानें एकसारखी बरळत असलेली ती थेरडी—तिला आतांच्या आतां इकडे घेऊन ये!—( सिंहवर्म्यास ) अधमा! तूं काय समजला आहेस? आतांच्या आतां तुझ्या संपूर्ण कुटुंबाचा विलय करून टाकितों! तुझ्या पुत्राचें—नव्हे—तुझ्या दोन्हीही पुत्रांचें तुजसमोरच हनन करून टाकितों!—कुसीदा! जा धनपाळालाही पुढें घालून घेऊन ये!

सिंह०—( हांसून ) स्वारी! त्या गफ्फा विसरा! धनपाळ या वेळीं कोणीकडच्या कोणीकडे गुप्तपणें निघूनही गेला आहे!

कासि०—अधमा! तुझी जिव्हा शतखंड होवो!

सिंह०—खुशाल! परंतु धनपाळाची काळजी त्या न्यायी परमेश्वरास आहे, तो त्याचें रक्षण करीलच करील! तुझ्या हातीं त्याला कदापि लागूं देणार नाहीं! (कुसीद जातो.)

कासि०—कसें ह्मणतोस दुष्टा! माझ्या न्यायासनापुढें तूं त्याला येऊं देत नाहींस काय?—समजलों! समजलों! तूं त्याला त्या पंचगांग प्रदेशाकडे रवाना केलें आहेस, व पुनरपि बंडावा करविण्याचा तुझा विचार आहे!

१ 'सर्वंसहा'—पृथ्वी. अक्षरशः सर्व सहन करणारी, सर्व सोसणारी.

(कुसीद, रक्षक वगैरे सुलोचना व शूरसेन यांस घेऊन येतात.)

कासि०—अगे ए वेड लागलेले मूर्ख स्त्रिये! अजून तरी हें वेड टाकून नीट शुद्धीवर ये! तसें न करशील तर तुला अघोर यातना देऊन तुजकडून कबूल करवून घेईन! पापिणी! बोल! बोल, कसें काय?

सुलो०—घातक्या! वरचेवर तीच तीच बडबड करून काय फळ! तुला एकच सांगतें, प्रत्यक्ष परमेश्वरासमक्ष जी एकवार शपथ वाहिली, ती मी कदापि मोडणार नाहीं!

कासि०—पहा! नीट विचार कर! तुझा पुत्र जगविणें अगर मरूं देणें हें या वेळीं —या क्षणीं—तुझ्या हातांत आहे! या वेळीं नीट बोलशील, तर तो वांचतो, नाहीं तर मरतोच!

सुलो०—हे कालस्वरूप परमेश्वरा! या वेळीं तुझें तें उग्ररूप प्रकट करून या चांडाळाचा सत्यानास कर! हा दुष्ट घातकी प्रत्यक्ष माझ्या प्राणनाथांच्याही जिवावर उदार होण्यास मला सांगत आहे, यासाठीं याचें या क्षणींच निर्दाळण करण्यास कदापि राहूं नको!

कासि०—असें काय? दुष्टे! तुझा हट्ट अजून सुटत नाहीं? ठीक आहे! अरे, पहातां काय? पकडा या पोराला, आणखी वेदनायंत्रांत घालून चांगला पिळून काढा!

सुलो०—थांब थांब! अरबा! तुला परमेश्वराचीच शपथ आहे! तूं आपणाला मानव म्हणून समजतोस, तर तूं मला अगोदर पकड! त्याला वेदनायंत्रांत घालण्यापेक्षां या त्याच्या मातेलाच त्या ठिकाणीं घाल, आणि तिच्या हतभाग्य जीविताचा अंत करून टाक कसा!

(इतक्यांत रक्षक वीरोत्तंसास पकडून घेऊन येतात.)

वीरो०—(त्यांच्या हातून निसटून) थांबा थांबा! चांडाळहो! हात आटोपा! खबरदार गुलामांनो! कांहीं दंगा कराल तर!

सिंह०—(त्यास पाहून आपणाशीं) काय वीरोत्तंस महाराज! हरहर! आतां मात्र सिंधुराजकुळाचा निःसंशय विलय झाला!

कासि०—धनपाळा! मला सांपडलास! मज कासिमाच्या हातून प्राण वांचवून पळून जात होतास, नाहीं?

वीरो०—मूर्खा अरबा! प्रत्यक्ष तुझ्या राजपदाचा व प्राणांचाही ज्यांत संबंध, अशा कांहीं कामाकरितां मी आलों आहे!

सिंह०—अरबा! या पोराला वेड लागलें आहे! तूं याचें काय ऐकतोस?

कासि०—चूप!—धनपाळा! बोल, इथें कशाकरितां आलास?

वीरो०—कासिमा! अरे, तूं आहेस कसल्या भ्रमांत? तुझा घात करण्याविषयीं अगदीं या—या—क्षणीं देखील कारस्थान चालू आहे!

कासि०—कुणाचें कारस्थान?

वीरो०—प्रत्यक्ष वीरोत्तंसाचेंच!

सिंह०—बाळा धनपाळा! अरे, तूं हें बोलतो आहेस तरी काय?

कासि०—फार उत्तम! त्या वीरोत्तंसालाच माझ्या हवालीं कर म्हणजे तुझे प्राण वांचवितों!

वीरो०—अरबा! हे क्षुद्र प्राण वांचविण्याकरितां तूं समजतोस मी या ठिकाणीं आलों? नाहीं! मी आलों तो तुला एवढीच विनंती करण्याकरितां

विधवा, नवीं नवीं पोरकीं मुलें, हींच दृष्टीस पडत आहेत! अधमा!——

**कासि**०—दुष्टा! थेरड्या! बडबड पुरे कर! मी जे संशय विचारितों, तेवढ्यांचेच निराकरण कर! तुझ्या अप्रासंगिक व निरर्थक बडबडीची मला जरूर नाहीं!

**सिंह**०—दुष्टा! अखेर माझीच बडबड व्यर्थ, आणि तुझी नाहीं? आमच्या धर्माचाही उच्छेद करण्याचा तुज अधमाचा यत्न होता हें सगळेंच थोतांड एकूण? चिंता नाहीं! आज एकसहा वीस वर्षें झालीं, या सिंधुसर्वंसहेला[1] तुज दुष्टाचा भार असह्य झाला आहे! तूं त्या धर्मशील राजमूर्तींचा वध केलास, त्याबद्दल तुला अघोर प्रायश्चित भोगावें लागेलच लागेल! तुझा अंत ब्रह्मादिकांच्या हातूनही टळावयाचा नाहीं! दुष्टा! नीचा! अधमा! माझें बोलणें लक्षपूर्वक ऐकून थर थर कांपूं लाग! तूं जीं अधमाधमपणाचीं कृत्यें केलीं आहेस, तीं त्या न्यायी धर्ममूर्तिला पसंत नसून तुझा अल्पकाळांतच अंत होणार म्हणूनही त्या चित्रगुप्तानें अगोदरच लाल भडक रक्ताच्या शाईनें लेख लिहून ठेविला आहे! फार तर काय, या राजवाड्यांतील रत्नखचित भिंतींवर सुद्धां तीं अक्षरें स्पष्टपणें उमटलेलीं अल्पकाळांतच तुझ्या दृष्टीस पडतील!—पहा, त्या तिकडे आकाशवितानाकडे पहा, त्यानंतर तुज पाप्याच्या काळजाप्रमाणेंच सर्वत्र काळोख पसरत चालला असून, त्यांतून त्या यमधर्माची स्वारी महिषारूढ होऊन तुजकडे येऊंही लागली आहे!

**कासि**०—वाचाटा! थेरड्या! तुझा तो यमधर्म, चित्रगुप्त इत्यादि चट सारे मी गुंडाळून ठेवितों! तुझ्या भागूबाईसारख्या पोकळ गप्पांनीं भिणारा मी मनुष्य नाहीं! गप्प बस आतां!—तिकडे कोण आहे? कुसीद?

(कुसीद येतो.)

**कुसी**०—सरकार! काय आज्ञा आहे?

**कासि**०—पुत्रशोकानें एकसारखी वरळत असलेली ती थेरडी—तिला आतांच्या आतां इकडे घेऊन ये!—(सिंहवर्म्यास) अधमा! तूं काय समजला आहेस? आतांच्या आतां तुझ्या संपूर्ण कुटुंबाचा विलय करून टाकितों! तुझ्या पुत्राचें—नव्हे—तुझ्या दोन्हीही पुत्रांचें तुजसमोरच हनन करून टाकितों!—कुसीदा! जा धनपालालाही पुढें घालून घेऊन ये!

**सिंह**०—(हांसून) स्वारी! त्या गप्पा विसरा! धनपाळ या वेळीं कोणीकडच्या कोणीकडे गुप्तपणें निघूनही गेला आहे!

**कासि**०—अधमा! तुझी जिव्हा शतखंड होवो!

**सिंह**०—खुशाल! परंतु धनपाळाची काळजी त्या न्यायी परमेश्वरास आहे, तो त्याचें रक्षण करीलच करील! तुझ्या हातीं त्याला कदापि लागूं देणार नाहीं! (कुसीद जातो.)

**कासि**०—कसें म्हणतोस दुष्टा! माझ्या न्यायासनापुढें तूं त्याला येऊं देत नाहींस काय?—समजलों! समजलों! तूं त्याला त्या पंचगांग प्रदेशाकडे रवाना केलें आहेस, व पुनरपि बंडावा करविण्याचा तुझा विचार आहे!

---

१ 'सर्वंसहा'—पृथ्वी. अक्षरश: सर्व सहन करणारी, सर्व सोसणारी.

( कुसीद, रक्षक वगैरे सुलोचना व शूरसेन यांस घेऊन येतात. )

कासि०—अगे ए वेड लागलेले मूर्ख स्त्रिये ! अजून तरी हें वेड टाकून नीट शुद्धीवर ये ! तसें न करशील तर तुला अघोर यातना देऊन तुजकडून कबूल करवून घेईन! पापिणी! बोल! बोल, कसें काय ?

सुलो०—घातक्या ! वरचेवर तीच तीच बडबड करून काय फळ! तुला एकच सांगतें, प्रत्यक्ष परमेश्वरासमक्ष जी एकवार शपथ वाहिली, ती मी कदापि मोडणार नाहीं !

कासि०—पहा ! नीट विचार कर ! तुझा पुत्र जगविणें अगर मरूं देणें हें या वेळीं —या क्षणीं—तुझ्या हातांत आहे! या वेळीं नीट बोलशील, तर तो वांचतो, नाहीं तर मरतोच !

सुलो०—हे कालस्वरूप परमेश्वरा ! या वेळीं तुझें तें उग्ररूप प्रकट करून या चांडाळाचा सत्यानास कर ! हा दुष्ट घातकी प्रत्यक्ष माझ्या प्राणनाथांच्याही जिवावर उदार होण्यास मला सांगत आहे, यासाठीं याचें या क्षणींच निर्दाळण करण्यास कदापि राहूं नको !

कासि०—असें काय ? दुष्टे ! तुझा हट्ट अजून सुटत नाहीं ? ठीक आहे ! अरे, पहातां काय? पकडा या पोराला, आणखी वेदनायंत्रांत घालून चांगला पिळून काढा !

सुलो०—थांब थांब! अरबा ! तुला परमेश्वराचीच शपथ आहे ! तूं आपणाला मानव म्हणून समजतोस, तर तूं मला अगोदर पकड ! त्याला वेदनायंत्रांत घालण्यापेक्षां या त्याच्या मातेलाच त्या ठिकाणीं घाल, आणि तिच्या हतभाग्य जीविताचा अंत करून टाक कसा!

( इतक्यांत रक्षक वीरोत्तंसास पकडून घेऊन येतात. )

वीरो०—( त्यांच्या हातून निसटून ) थांबा थांबा ! चांडाळहो! हात आटोपा ! खबरदार गुलामांनो! कांहीं दंगा कराल तर!

सिंह०—( त्यास पाहून आपणाशीं ) काय वीरोत्तंस महाराज ! हरहर ! आतां मात्र सिंधुराजकुळाचा निःसंशय विलय झाला !

कासि०—धनपाळा! मला सांपडलास ! मज कासिमाच्या हातून प्राण वांचवून पळून जात होतास, नाहीं ?

वीरो०—मूर्खा अरबा ! प्रत्यक्ष तुझ्या राज्पदाचा व प्राणांचाही ज्यांत संबंध, अशा कांहीं कामाकरितां मी आलों आहे!

सिंह०—अरबा ! या पोराला वेड लागलें आहे ! तूं याचें काय ऐकतोस ?

कासि०—चूप !—धनपाळा ! बोल, इथें कशाकरितां आलास ?

वीरो०—कासिमा ! अरे, तूं आहेस कसल्या भ्रमांत ? तुझा घात करण्याविषयीं अगदीं या—या—क्षणीं देखील कारस्थान चालू आहे !

कासि०—कुणाचें कारस्थान ?

वीरो०—प्रत्यक्ष वीरोत्तंसाचेंच !

सिंह०—वाळा धनपाळा ! अरे, तूं हें बोलतो आहेस तरी काय ?

कासि०—फार उत्तम ! त्या वीरोत्तंसालाच माझ्या हवालीं कर म्हणजे तुझे प्राण वांचवितो !

वीरो०—अरबा! हे क्षुद्र प्राण वांचविण्याकरितां तूं समजतोस मी या ठिकाणीं आलों? नाहीं! मी आलों तो तुला एवढीच विनंती करण्याकरितां

कीं, कृपा करून या कोमल स्त्रीदेहाला आणि या तरुण पुरुषाला त्रास देऊं नको ! ( कासिमाच्या पायां पडतो. ) कासिमा! अरे, हा तरुण पुरुष प्रत्यक्ष स्वर्गांतील देवच खालीं उतरलासा वाटतो, याची तुला तुला खचित खचित कींव येऊं दे !

सिंह०—कायरे ! ऊठ अगोदर ! तुला लज्जा नाहीं वाटत ? या अधमापुढें साष्टांग नमस्कार घालून तूं मला, आपणाला व प्रत्यक्ष आपल्या कुळालाही कलंक लावणार काय ? ऊठ पाहूं अगोदर ?

कासि०—माझा क्रोधानल शांत व्हावा असें तुला वाटतें, तर मला वीरोत्तंसाचें शिर दे आणून पाहूं ?

वीरो०—बस्स! एवढें पुरेल? का आणखी कांहीं पाहिजे?

कासि०—मला दुसऱ्या कशाची जरूर नाहीं! तेवढा त्याचा रक्तपात झाला, ह्मणजे माझा विजलाच क्रोधाग्नि!

वीरो०—( उठून )घेच तर अधमा! —हा पहा तुझा कृतांतकाळ होऊन राहिलेला वीरोत्तंस तुजपुढें उभा आहे !

सिंह०—हरहर ! झाला!सर्वस्वीं घात झाला!— हे कृपासागरा नारायणा ! आतां या प्राणसंकटांतून या बाळाचें रक्षण कर्ता तूंच आहेस !

सुलो०—(आपणाशीं)देवा! देवा! झाला, सिंधुसौभाग्याचा शेवटला दिवस मावळला !

वीरो०—अधमा ! अरबा ! असा भांबावलास कशानें ? बोलतों हें लक्षपूर्वक ऐक ! पहा सत्याचा महिमा कसा असतो तो ! हा पहा वीरोत्तंस तुला शरण येऊन स्वतांचे प्राण घेण्याविषयींही तुजजवळ विनंती करीत आहे !

कासि०—अरे दुष्टा कारट्या ! इतक्या अल्पवयांतच तूं इतका कपटांत निपुण झालास ? तुझा दुष्ट कपटी पिता, त्यानें मला फसविण्याकरितां इतक्यांतच तुला कपटप्रवीण केलें ? आणखी अधमा ! तूं आतां मला फसवूं पहातोस ?

शूर०—अरबा ! सत्य बोललास ! हा पुरुष तुला खचित फसवीत आहे ! हाचसा काय, जो तो तुला फसवूंच पहात आहे ! या सर्वांचा विचार माझें राजपद काढून घेण्याचा आहे ! तुला खचित सांगतों, ही वृद्ध पिता, व ही वृद्ध माता, दोघांचाही इरादा हरयुक्तीनें या आपल्या पुत्रासच राजपद मिळवून देण्याचा आहे !

वीरो०—अरे वाः रे वाः साहसी!कायरे?—खबरदार आपल्या राजाचा मानभंग करशील तर ! हें राजपद व तदंगभूत दुःखें या सर्वांचा मालक मी ! दैवाच्या मनांत जे जे ह्मणून वांकडे तिकडे खेळ करावयाचे असतील ते सर्व माझे आहेत! ते जर कोणी बळेंच माझ्या हातून हिसकावून घेऊं ह्मणेल, तर मी तें कधीं चालूं द्यायचा नाहीं!

शूर०—भलतेंच ! अशी गोष्ट कदापि होतां उपयोगी नाहीं ! अरबा ! हा पुरुष सांगतो ही गोष्ट सर्वथैव मिथ्या आहे ! पंचगांग देशांतून तुझ्या या राज्यावर सैन्य चालून आलें तें सर्व माझ्याकरितां! त्यांचा नेता मी होतों! माझें अति दूर देशाहून आगमन झालें, व मजबरोबर तूं जे लोक कैद केले आहेस, त्या सर्वांनीही आपण मजकरितांच लढलों व मलाच सिंधुदेश-

च्या राज्यासनावर बसविण्याचा आपला विचार होता, ह्मणूनही सांगितलें आहे !

**वीरो०**—परमेश्वरसाक्ष सांगतों, याच्याकडे कांहीं नाहीं! सर्व अपराध माझा आहे! अरे वेड्या मुला! असा उगीच कां बड़बड़तोस ? खबरदार, आपलेंच राजपद ह्मणून इतःपर मजशीं खोटीच तक्रार करशील तर! या राजपदाचा संपूर्ण हक्क व मानमरातब माझीं आहेत! हीं माझीं मी परत घेणारच, व माझा मीच मरणार !

**कासि०**—चमत्कार आहे ! यांचा हा वादविवादच माझ्या मनांत भ्रम उत्पन्न करतो! एवढेंच नव्हे, तर एकेक शब्द ऐकावा तों अधिकाधिकच शंका, संशय, व्यामोह व भीति हींही माझ्या हृदयांत उत्पन्न होताहेत! काय गे ए भ्रमिष्ट स्त्रिये! बोल, या दोघांतून तुझा राजा तो कोणता ?

**सुली०**—कासिमा !तूं दोघांचे सद्गुण पहा, आणि दोघांनाही सारखाच मान दे !

**कासि०**—अरेरेरेरेरेरेरेरे ! आग लागो या थेरडीच्या तोंडाला !—थेरड्या **सिंहवर्म्या**! मी बोलतों इकडे नीट लक्ष दे ! आतां या क्षणीं माझ्या सर्व संशयांची निवृति कर, नाहीं तर पहा कठोरतम वेदनायंत्रांत घालून तुझी एक नाडी, कीं एक शीरही, बाकी राहूं देणार नाहीं ! तुझे हाल हाल करून प्राण घेईन !

**सिंह०**—**अरबा** ! तुझ्या दहशतींना मी भिईन असें तूं समजतोस, होय ? तूंच विचार करून पहा, माझा पुत्र मी केव्हांच तुझ्या हवालीं देखील केला, व त्याचे वाटेल त्या तऱ्हेनें प्राण घेण्याचीही तुला मोकळीक दिली ! येऊन जाऊन माझ्या जिवाला काय अडचण वाटायची ते एवढ्यापुरतीच ! तेवढीही जर मी चालूं दिली आहे, तर तुझ्या रोषास या **सिंहवर्म्यानें** भ्यावें असें सांग पाहूं काय उरलें आहे तें ?

**कासि०**—एकूण तूं मला भीत नाहींस काय ? तर तुला आतां भ्यायलाच शिकवितों ! थेरड्या ! तूं पक्कें ओळखून अस, हा राजवाडा माझा आहे, या संपूर्ण देशाचा अधिपति मीच आहे, व या ठिकाणीं तुज सारख्या गुलामड्यांचीं डोकीं तुडवायचीं अगर चरचर चिरून टाकण्याचा सर्व अधिकार माझा आहे ! या सर्व देशांत मी करीन तोच कायदा, व तोच न्याय, समजलास !

**सिंह०**—काय ह्मणतोस ? या देशांत तूं करशील तोच कायदा आणि तोच न्याय ? वेड्या **अरबा** ! कसल्या भलत्या भ्रमांत पडला आहेस तूं ?—मूर्खा ! इतका वेळ कदाचित् तुला नीट समजून आलें नसेल, तर नीट समजावून सांगतों ऐक! तुझ्यासारख्या मानवपशूंचें राज्य कोणत्याही देशांत झालें असतां, तें प्रारंभीं मात्र कांहीं दिवस मणगटाच्या जोरावर चालूं शकतें, व तुझ्यासारख्यांना त्यांतच पशुतुल्य आनंदही मानून घेता येतो ! तथापि एक गोष्ट तूं चांगली ध्यानांत धरून ठेव कीं, कोणत्याही देशांतलें मूळचें ह्मणून जें, त्याचा लोप कदापि होत नाहीं; व कांहीं काळपर्यंत त्यांतील प्रचलित धर्मादिकांस बाध आला, तथापि त्यांची स्थिति झोंपीं गेलेल्या सिंहराजाप्रमाणें, अगर भस्माच्छादित अग्नीप्रमाणेंच, असते !

**कासि०**—झालें ! तुझ्याशीं बोलण्याची परमावधि झाली, व तुझा काळ समीप येऊन

ठेपला !– अरे, पहातां काय ? पकडा या चोराला, नू माझ्या डोळ्यांपुढून याला अगोदर काढून न्या ! ( रक्षक सिंहवर्म्याला धरतात. )

सुलो०–दुरात्म्यांनो ! मलाही माझ्या प्राणनाथांबरोबर न्या ! त्यांच्या समागमें मी मेलें तरी मला प्रियच आहे !–कसेंही असो; दुष्टा कासिमा ! आह्मीं उभयतांही एकत्र असतां खुशाल आनंदानें मरूं ! परंतु एक गोष्ट तूं पक्की ध्यानांत ठेव कीं, अति महत्वाचें तें एक गुह्य उभयतांच्याही हृदयांत ह्या इथें सांठवून राहिलें आहे ! तें तूं पाहिजे तेवढे प्रयत्न केलेस, तरी तुझ्या ह्मणून हातीं लागावयाचें नाहीं ! अधमा ! तूं खुशाल जिवंत राहून यावज्जीवमान भीति व संशय यांच्या अत्यंत अघोर कचाटींतच कुजत पड ! आमच्या अंताबरोबर त्या गुह्याचाही अंत होईल, व हाच आमचा विजय व हीच आमची धन्यता ! नीचा ! आह्मीं जिवंत असेंपर्यंत असाच भीत रहा ! व आमचा अंत झाला असतां त्यांतच तुझ्या जीवाचा थरकांप होऊं दे !

( सिंहवर्मा वँ रक्षक यांसहवर्तमान जाते. )

शूर०–अरेरे दुष्टांनो ! तुह्मीं या उभयतांना सोडा, आणि या माझ्या हृदयांत भोसका आपली तरवार ! अरे ! तुह्मीं माझा अंत करा, परंतु या परमधन्य दंपत्याचा तेवढा प्राण वांचवाच! ( रक्षक त्यास ओढून नेतात. )

वीरो०–( कासिमाचे पाय धरतो. ) कासिमा ! कृपा कर, तुझा खरा वध्य मी एकटाच आहे ! तुला परमेश्वराची शपथ आहे ! तूं या तिघांनाही सोडून मज एकट्याचाच घात कर! खरा वीरोत्तंस तो मीच आहे !

कासि०–नीचा ! तूं धनपाळ त्या थेरड्याचा व थेरडीचा पुत्र आहेस, मला पक्कें ठाऊक आहे! चल, जा त्यांच्या मागून, आणखी त्यांचा अंत होईल तोच नेत्रांनीं अवलोकन कर ! चोरा ! तुझ्याच समक्ष त्या उभतांनाही कशा वेदना देतात त्या पाहून घे; आणखी थोडक्यांच वेळानें, तूं आणि तुजसारखेच जे अधम पातकी माझा घात करूं पहात असतील, त्या सर्वांचीही मी तीच अवस्था करून टाकितों ! ( चालता होतो. )

वीरो०–( भुईवर पडल्या पडल्याच. ) तें सर्व खरें, परंतु कासिमा! तूं क्षणभर माझें बोलणें ऐकून घे!–अधमांनो! तुह्मांला कांहींच कींव येत नाहीं काय ? अरे, तुह्मीं माझा घात करा ह्मणून मी ह्मणत असतांही तो कां बरें करीत नाहीं ? हे धरणीमाते! तूं तरी आपलें वदन पसरून मला एकदम गिळून जा कशी!–हाय हाय! आज जगांत न्याय ह्मणून कांहींच राहिला नाहीं काय ?– ( हळू हळू उठून चोहींकडे पहातो. ) काय ? मी येथें एकटाच आहे ? अरेरे!– हे न्यायी परमेश्वरा! तुझ्या न्यायासनासंनिध असणारे दंडधर त्वरेनें या स्थळीं पाठवून देऊन, येथून जवळच जें वीरमंडळ गुप्तरूपें राहिलें आहे, त्याला पूर्ण उत्साह व सामर्थ्य देवीव ! अहाहा ! केवढा चमत्कार हा ! मीं परमेश्वराचें स्तवन केलें, तेवढ्यानेंच माझ्या हृदयांत किती तरी उत्साह पुनरपि उत्पन्न झाला आहे हा !–हे शूर मित्रहो ! असाच उत्साह तुमच्याही हृदयांत सतत जागून तुह्मीं स्वामिकार्य सा-

धा, आणि यद्यपि मी मेलों, तथापि तुह्मीं या दुष्टाचा सूड उगविल्याशिवाय नकाच राहूं !

# अंक ५.

## प्र, १—राजवाडा.

( सिंहवर्मा व सुलोचना यांस पुढें घालून कुसीद येतो. )

सिंह०—कुसीदा ! या राजवाड्यांत आह्मांस परत कशाकरितां बरें आणिलेंस ? हा राजवाडा इत:पर आह्मांला दर्शनासही नको ! आतां येथें आह्मांस आणून त्या अधम कासिमानें आह्मांवर संतापावें, व तें आह्मीं नेत्रांनीं पहावें, यांत काय बरें अर्थ ? तुला ठाऊकच आहे कीं, एक वेळ आमचा निश्चय झाला तो झालाच ! त्यांत ह्मणून फरक होणें नाहीं !

कुसी०—इतका वेळ महाराजांनीं एक बोलावें, तूं त्याजवर भलतेंच उत्तर द्यावेंस, अशा प्रकारें जें वाग्युद्ध चाललें होतें, तें पुनरपि आह्मांला चालवायचेंच नाहीं, कारण तें पूर्ववतच निरर्थक होणार हें आह्मीं पूर्णपणें जाणूनच आहों ! तुह्मां दोघांना या ठिकाणीं घेऊन येण्याचा उद्देश एवढाच आहे कीं, या ठिकाणीं अत्यंत अघोर वेदना देणारीं यंत्रें आणून ठेविलीं आहेत, त्यांत तुह्मांला बसवावें, व तुह्मांला वेदना होऊन तुह्मीं विवळूं लागला असतां तुमच्या मुद्रादिकांचें जे निरनिराळे विकार होतील, अगर तुमच्याकडून जे वेदनोद्गार निघतील, ते आमच्या महाराजांनीं प्रत्यक्ष पहावे व ऐकावे, व तेणेंकरून तुह्मां विश्वासघातकी दुष्टांचा यथा योग्य सूड उगविल्याचें परम सुख महाराजांस प्राप्त व्हावें ! (पडद्याकडे पाहून आंतील रक्षकांस)कोण आहे? अरे, तुह्मीं सर्व जण ती तिकडची वाट अडवून धरा! व या दुष्टांस पळून जाण्यास वाट न मिळावी एतदर्थ हुशारीनें असा ! तोंपर्यंत मी कासिमशहांकडे जाऊन त्यांची अखेरची मर्जी काय आहे तें विचारून येतों ! ( निघून जातो. )

सिंह०—( सुलोचनेस आलिंगन देऊन ) प्राणप्रिये ! धन्य आहेस ! तुझ्या नि:सीम राजभक्तीचें व इमानाचें किती ह्मणून वर्णन करावें ?

सुलो०—( त्यास परत आलिंगून ) प्राणनाथ ! माझी कशाची राजभक्ति ? व कशाचें इनाम ? ज्या अधमेनेंच तर पुत्रमोहास गुंतून आपणा सर्वांची ही अशी स्थिति करून सोडिली ! मला आपण इतकी योग्यता देतां हें कसें ?

सिंह०—प्राणप्रिये ! तूं असें नको ह्मणूं ! तुझी खरोखरीच योग्यता फार मोठी आहे ! तूं माझी पत्नी हें तर खरेंच, तथापि तुझ्या अंगीं जे सद्गुण मी पहातों, हे तुजमध्यें नसते, तर सांप्रतचा हा कारागृहवास मला कदापि सहन करवताना ! प्राणप्रिये ! फार काय सांगूं ? आपणा उभयतांवर या वेळीं प्रत्यक्ष प्राणनाशाचा प्रसंग येऊन गुदरला आहे, तथापि त्यांत देखील तुझें लोकोत्तर वर्तन पाहून तुझी योग्यता मला अधिकाधिकच वाटूं लागते, व त्यायोगें तुजवर माझें अधिकाधिकच प्रेमही ओढवतें! प्राणप्रिये ! या प्रेमाच्या भरांत तुझे मजवर अनंत उपकारच झाले आहेत व होत आहेत असेंही मला वाटल्या-

वांचून रहात नाहीं! मात्र अशा दिव्य सद्गुणैकशालिनी माझ्या प्रियेचा प्रत्यक्ष रक्तपात मला पहावा लागणार, एवढी गोष्ट मनांत येऊन मला अत्यंत खेद होतो! हरहर !

सुलो०—प्राणनाथ ! आपण असें ह्मणतां, परंतु माझ्या मनाला तर मला मृत्यु यावा हेंच अधिक इष्ट वाटतें! आज पुरीं वीस वर्षेंपर्यंत या हतभाग्येच्या दग्ध हृदयावर दुःखाचे एकावर एक असे वज्राघातच पडत आले आहेत! या माझ्या दुःखाश्रूंनीं मंदावलेल्या नेत्रांनीं या संपूर्ण देशाचा नुसता नाश पाहिला एवढेंच नाहीं, तर प्रत्यक्ष प्राणनाथ आपण, तो प्रिय पुत्र, व ती प्रिय राजमूर्ति या सर्वांचा कारागृहनिवासही ते पहातच आहेत, तेव्हां यापेक्षां प्रत्यक्ष मृत्यूचेंही दर्शन अधिक भयंकर असें ते काय ह्मणून बरें मानितील? इतके भयंकर प्रकार पहाण्याचेंच ज्या अर्थीं या सुलोचनेच्या कपाळीं आलें आहे, त्या अर्थीं तिनें इतःपर एका मृत्यूशिवाय दुसऱ्या कशाची बरें अपेक्षा करावी ?

सिंह०—हायहाय ! प्राणप्रिये ! एकूण या दुष्टांच्या त्या वेदनायंत्रांच्या या अत्यंत अघोर यमयातना भोगण्यासही हा तुझा कोमल देह भीत नाहीं अं ? हरहर ! प्रिये ! संपूर्ण सद्गुणैश्वर्यानें मंडित अशा या कोमल देहलतिकेवर हा पिळून पेंग्याचा प्रसंग अखेर येणार काय ? प्रिये ! ते दुष्ट तुझी लवमात्र कींव मनांत न आणितां तुला निर्दयपणें आवळून बांधितील, व तो दुष्ट त्या तुझ्या वेदना आनंदानें डोळे भरून पहात राहील ! प्रिये !—

सुलो०—प्राणनाथ ! आपण वर्णन करितां अशा प्रकारचे अघोर क्लेश माझ्या या अगोदरच जर्जर झालेल्या देहास सोसणार नाहींत ! तथापि पण प्राणनाथ ! ही—ही—एक वस्तु मात्र मी सोशीनच सोशीन ! (लपवून ठेवलेली एक सुरी दाखविते.)

सिंह०—काय ? सुरी ?

सुलो०—होय होय प्राणनाथ ! प्राणनाथ ! कृपा करून माझ्या या इमानी देहांत या शस्त्रास अधिष्ठान देऊं लागा, ह्मणजे मी आपणांस कशी आनंदानें कडकडून मिठी मारण्यास येतें पहा !

सिंह०—हाय हायरे पराङ्मुखा विधात्या ! अखेर या मंदभाग्यावर स्त्रीघात करण्याचाच प्रसंग यावा काय ?

सुलो०—प्राणनाथ ! आजपर्यंत आपणच या दीन दासीला प्रत्येक सद्गुणाबद्दलचें शिक्षण देत गेलां, याकरितां या अखेरच्या प्रसंगीं कृपा करून मला मृत्यु सहन करण्याचेंही तेवढें शिक्षण द्याच !

सिंह०—प्राणप्रिये ! अशी गोष्ट कदापि होणार नाहीं ! आण, हें शस्त्र तुझ्या हातीं असतां कामाचें नाहीं ! (सुरी घेतो.) आत्महत्या ही सर्व शास्त्रांनीं निषिद्ध मानिली आहे ! शिवाय ती भित्रेपणाचेंही लक्षण आहे, कारण तिजमुळें दुःख व क्लेश सोसण्याचें आपले अंगीं पूर्ण सामर्थ्य नाहीं असें उघडपणें सिद्ध होतें!

सुलो०—कसें ह्मणतां प्राणनाथ ! एकूण हा दुष्ट अधम आपल्या ज्या अनेकविध विटंबना करील, त्या मुकाट्यानें सहन कराव्या असें आपलें ह्मणणें ? प्राणनाथ ! मला

तर वाटतें, या विटंबना व अपमान सो-शीत रहाण्यापेक्षां आपला आपण मृत्यु आणिलेलाही कांहीं वाईट नाहीं ! दैहिक वेदना एक वेळ सोसवतील, परंतु अपमान-दुःख सोसणें हें दुर्घट आहे असें नाहीं आपल्याला वाटत ? याकरितां आत्महत्ये-चा शास्त्रदृष्ट्या कितीही दोष मानिला असला, तरी नीच शत्रूच्या हातून अगर चांडाळांच्या हातून मरण येऊं देण्यापेक्षां आपला आपण अंत करून घेणें हें खचित वाईट नाहीं असेंच मला वाटतें ! प्राण-नाथ ! आपणाला नाहीं का असें वाटत?

सिंह०—हे परात्पर प्रभो ! विश्वंभरा ! किती विचित्र तरी संकट हें ! एकीकडून धर्माज्ञा मोडण्याचें पातक व दुसरीकडून अपमान-दुःख सोसण्याचें भय ! या दोहोंपैकीं कशाचाच अंगीकार करतां नये !— हाय-हाय ! प्रिये ! ही मोठी कचाटीच माझ्या मनाला वाटते, मात्र इच्यांतून पार कसें पडावें याचा मला कांहींच उमज पडत नाहीं ! तथापि एकंदरीत शास्त्राज्ञाभंगांत अधिक सत्वहरण होईल असें मनाला वाटतें !

सुलो०—ह्मणजे काय ह्मणतां प्राणनाथ ! नीचांनीं केलेले अपमान सोशीत रहाणें हें आपणाला विशेष श्रेयस्कर वाटतें एकूण ?

सिंह०—प्रिये! तूं ह्मणतेस असाच केवळ ज-रीं प्रकार नाहीं, तरी पण या बाबतींत माझें मन द्विधा झालें आहे एवढें ख-चित ! शास्त्रांत अगर ग्रंथांतरीं कोठें आत्महत्या अमुक एक प्रसंगीं दूषणीय नाहीं असें मानिल्याचें उदाहरण आढ-ळेल ह्मणून विचार करून पहातों, परंतु तसें उदाहरण स्त्रियांनीं सती जाणें या-शिवाय निराळें एकही आढळत नाहीं ! उलटें अघटित संकटप्रसंगीं प्रत्यक्ष आप्त जनांनींच आप्तजन मारिल्यास त्यांत दोष नाहीं असें मानिल्याचें मात्र कोठें कोठें आढळतें !

सुलो०—हेंच जर खरें, तर प्राणनाथ! ही एवढी सुरी घेऊन आपणच मला भोंसका कसे ?

सिंह०—हायहाय ! हिनें तर माझ्या शब्दांतच मला पकडलें यांत संशय नाहीं ! अथवा पकडलें कशाचें ? आह्मां उभयतां-वरही काळच विपरीत गुदरला आहे !— प्राणप्रिये ! हो तयार! हा भोंसकतों!— अरेरे ! पण काय हा दुष्टपणा ? प्रिये ! पतीचें स्वभार्येविषयींचें प्रेम प्रेम ह्मणाव-याचें तें हेंच काय ?—हरहर ! या प्रियेच्या ज्या वक्षःस्थलाशीं टेंकून बसलों असतां माझ्या अत्यंत असह्य दुःखाचाही उपशम होई, त्याच वक्षःस्थलावर मी कृतघ्नपणानें सुरी भों-सकावी काय? धिक्कार—धिक्कार असो मला!

सुलो०—प्राणनाथ ! पूर्वींचीं तीं सुखें गेलीं, ते दिवस गेले, त्यांचें कसलें आपण स्मरण करीत बसतां ! त्या वेळचे ते प्रसंग या वेळीं मनांत आणून काय होणार ? ते जे दिवस गेले ते आतां परत का येणार आ-हेत ? प्राणनाथ ! प्राणनाथ ! आपण या वेळीं गत गोष्टी बिलकूल मनांत आणूं न-येत ! आपल्या हस्तें माझा अंत झाला तरी त्यांत मला उलटें भूषणच आहे ! प्राणनाथ ! भोंसकाच ही सुरी आपण ! मी घायाळ झालें असतां आपण मला

आलिंगन द्याल, व तशा स्थितींत मी मेलें असतां मी खचित सांगतें सद्गतीलाच जाईन ! हरिश्चंद्र राजा आपल्या स्वतःच्या पत्नीचाही वध नव्हता का करण्यास सिद्ध झाला ? झालें, तें जसें, तसेंच हें ! आहे काय त्यांत ?

सिंह०—प्रिये ! खरें बोललीस ! सत्वसंरक्षणाकरितां असेंच केलें पाहिजे ! ( सुरी हातांत घेतो. ) हरहर ! कोण हा दुःखप्रसंग ! मी इतका यत्न करितों, परंतु आपला हातच कसा तो पुढें चालत नाहीं ! मी आपणाला इतका धारिष्टवान् समजतों, पण काय करावें ? माझे बाहुच शिथिल पडतात ! ( सुरी खालीं पडते. ) प्राणप्रिये ! तूं कांहीं ह्मण, परंतु मीं आपल्या हातानें का होईना, पण तुझा वध करणें हें मला कसेंसेंच वाटतें ! तूं हरिश्चंद्रराजाचें नांव घेतलेंस, परंतु तो आज्ञेचा दास पडला ह्मणून त्याला तसें करावेंच लागलें ! परंतु तसा मी कोणाचा दास आहें? नाहीं, व याकरितां त्याचें अनुकरण माझ्यानें करवत नाहीं ! हाय हाय ! प्रिये ! फार तर काय सांगूं ? तुझा वध केला असतां संपूर्ण त्रिभुवनाचेंही राज्य मला कोणी देऊं लागला, तथापि ही गोष्ट माझ्या मनानेंही कबूल व्हायची नाहीं ! मग हातानें करणें तर दूरच राहिलें !

सुलो०—(पाहून) हाय हाय ! प्राणनाथ ! आपण इतका वेळ बोलत बसलों, इतक्यामध्यें केव्हांच कार्यभाग होऊनही गेला असता ! आतां काय, हेच पहा त्या दुष्टाचे लोक समीप आले देखील ! चिंता नाहीं ! कांहीं झालें, तरी या दुष्टांच्या हातून फार वेळ अपमान सोसायचा नाहीं हा निश्चयच ! याकरितां निश्चित मृत्यूचें हें साधन मी आपल्या जवळ ठेवितेंच ! ( सुरी अंगावर लपवून ठेविते. )

( कासिम, कुसीद व रक्षक येतात. )

कासि०—मूर्खा सिंहवर्म्या ! हे मूर्खे अबले ! तुह्मां उभयतांचाही मृत्युकाळ समीप आला आहे ! आतां विनाकारण विलंब लावण्यांत कांहीं फायदा नाहीं !—रक्षकहो ! अगोदर या थेरड्याला पकडून घेऊन जा ! याला असह्य वेदना द्या, परंतु याचे प्राण एकदम न जाऊं देण्याविषयीं खबरदारी घ्या, ह्मणजे हा सर्व मजकूर कबूल केल्याशिवाय रहायचा नाहीं ! याला वेदना होऊं लागल्या असतां हा कदाचित् ह्मणेल, थांबा, अंमळ वेदना कमी करा ह्मणजे सांगतों ! तर तुह्मीं याचें बिलकुल नऐकतां वेदना देतच रहा ! तें कुठपर्यंत, तर याच्या तोंडून एकूण एक गुह्य गोष्ट बाहेर पडून माझ्या मनास वाटत असलेल्या एकूण एक शंकांचें व संशयांचें निराकरण होऊन जाईपर्यंत !

सिंह०—चांडालांनो ! वाट कशाची पहातां ? पाहिजे तशा वेदना या देहास देऊन चला त्याचा करून टाका अंत ! या सिंहवर्म्याला प्राणांची बिलकुल परवा कशी ती वाटत नाहीं ! त्यांचा जितका लौकर निकाल होईल, तितका त्याला संतोषच आहे !

( रक्षक त्यास पकडतात. )

सुलो०—थांबा ! थांबा ! आपण चाललांत कुठें? अधमांनो ! चांडाळांनो ! तुह्मीं माझ्या प्राणनाथांना ओढून नकारे नेऊं !—( सिंहवर्म्यास रक्षक धक्के देत घेऊन जातात. ) हाय हाय !

चांडाळांनो ! तुह्मांला कांहींच दया येत नाहीं काय ?—कासिमा ! अरे, मी एकदा सोडून दहादा तुझ्या पायां पडतें! मला तुजपाशीं कांहीं मागणें नाहीं ! मला मृत्यु यावा एवढेंच काय तें मला पाहिजे ! तो तूं मला दिलास तर त्याबद्दल मी तुला क्रूरकर्मा कदापि ह्मणणार नाहीं ! अरबा! अरे ! मला माझ्या प्राणनाथांच्या बाहूंनीं वेष्टित अशी मरूं देरे ! कासिमा ! कासिमा ! तूं इतरथा कसाही क्रूर असलास, तथापि एवढी तरी एक पुण्याई घेच पदरीं! नाहीं ह्मणूं नको !

**कासि०**—मूर्खे ! तुझे प्रलाप व्यर्थ आहेत ! तुझ्या थेरड्या पतीची दुरवस्था कशी होते, तो कसा विवळतो, कसा गुरासारखा हंबरडा फोडतो, तें सर्व अगोदर नीट डोळ्यांनीं पहा ! त्याचें सर्वांग रक्तानें भरून जाऊन तो गडबडां लोळूं लागला, व श्वासोच्छ्वास गुदमरून जाऊन शेवटली उचकी देण्याची त्याची वेळ आली, ह्मणजे मग मागून लागलीच तुझी पाळी येईल ! तूं काय समजली आहेस ? दुष्टे ! राजद्रोह करितांना गोड वाटलें, नाहीं ? त्याचेंच घ्या आतां सुख ! दुष्टे! तो कारटा वीरोत्तंस अद्यापि तुमच्या मुळेंच जिवंत आहे, ठाऊक नाहीं वाटतें ?

**सुलो०**—नाहीं ठाऊक कोण ह्मणतें ?—अरबा! परमेश्वर करो आणि तो प्रियकर राजबाळ असाच शतायुषी होवो !—दुष्टा ! मोठ्या गमजा लावतो आहेस, खुशाल लाव ! परमेश्वराच्या इच्छेनें तोही बाळक योग्य समय पाहून आपोआप प्रकट होऊन तुझ्या काळजाचा थरकांप करून सोडील, समजलास ? दुष्टा ! माझ्यामुळेंच तो वीरोत्तंस बाळ अद्यापि जिवंत आहे हें जर खरें असेल, तर मी सांगतें एवढें ऐकच ! परमेश्वरेच्छेनें तो प्रकट होईल, व त्यावेळीं मात्र तूं आपलें कर्तव्य स्मरच ! अधमा ! जें राजपद त्वां दुष्टानें विश्वासघातानें हत्या करून मिळविलें आहे, त्याचा खरा मालक तो आहे, याकरितां तो आल्याबरोबर तूं मुकाट्यानें सिंहासनाखालीं उतरून त्याला शरण जा !

**कासि०**—किडे पडोत तुझ्या तोंडाला दुष्टे ! (इतक्यांत मणिपाळ येतो त्यास) कां मणिपाळा ! तूं कशाकरितां आलास ?

**मणि०**—सरकार ! दिल्लीदरवाजाकडून एक रक्षक आंत येऊन त्यानें कांहीं भयंकर वर्तमान कळविलें आहे ! तें असें कीं, तो त्या ठिकाणीं पहाऱ्यावर उभा असतां बाहेर उत्तरेच्या अंगाला लांब अंधारांत उपसलेल्या तरवारींचीं चमक दिसावी अशा प्रकारची कांहीं अंधुक चमक दृष्टीस पडल्याचा त्याला भास झाला, व लागलीच दहा पांच अंक मोजतां येतील न येतील इतक्यांत बराच मोठा लोकसमुदाय रस्त्यांतून एकसारखा चालत येत असल्याचा त्याला आवाज ऐकूं आला !

**कासि०**—काय काय ? अद्यापि विश्वासघाताचें बियाणें नाहींसें झालें नाहीं काय ? अरे, कोण आहेरे तिकडे ? आणा माझीं हत्यारें व माझें चिलखत ! मी स्वतः पुढें जाऊन या दुष्टांचा समाचार घेतों !

**मणि०**—सरकार ! दासाची एक विज्ञप्ति आहे !—आतांच्या वेळीं जे लोक येत असतील, त्यांचा जमाव कोठून कसा तरी

गोळा करून आणिला असावा असें वाटतें, व याकरितां यांच्यावर स्वतः आपल्यासारख्यांनीं शस्त्र हुगारण्याचें कांहींच कारण नाहीं! सरकार! मी आतां सांगितली ही खबर मला कळल्याबरोबर, मीं दरवाज्यावरील सर्व सैनिक गोळा करून बंदोबस्तानें तयार उभे ठेविले आहेत! सरकार! हे लोक घेऊन शत्रूवर हल्ला करून जाण्याविषयीं कुसीदास आज्ञा होईल, तर तो खचित जय मिळविल्याशिवाय परत यायचा नाहीं अशी माझी खातरी आहे! याकरितां आपण आपल्या देहाला वृथा श्रमविण्याचें कांहीं कारण नाहीं!

**कासि०**—चिंता नाहीं! तेंही कांहीं वावगें नाहीं!—कुसीदा! हे सर्व लोक तुझ्याच कवाइतींतले आहेत, याकरितां तूंच जा, आणि सर्वांची कत्तल करून टाक! एकही कोणी जिवंत ठेवूं नको! (कुसीद जातो.)

**सुलो०**—(आपणाशीं) हा काय चमत्कार झाला? एकूण मणिपाळही अखेर शत्रूसच सामिल आहे काय? काय? हा अधम अखेर राजद्रोहही पत्करण्यास कबूल झाला? हायहाय! झालें, आतां सत्य, इमान तें कोठें राहिलें? देवा देवा! इतःपर मज अभागिणीला काय ह्मणून जगवितोस?

**मणि०**—सरकार! दुसरी एक गोष्ट मला कळली आहे ती मी सरकारचरणीं विदित करतों! आजपर्यंत आपण सर्वच जण भ्रांतींत निमग्न होतों, पण आतां संशयाचा अगदीं अखेर उलगडा झाला! तो असा कीं, हे जे लोक यावेळीं राजवाड्यावर चालून येत आहेत, त्यांचा राजा ज्याला आपण धनपाळ ह्मणून समजत होतों तोच! सरकारचा द्रोह करणारा तो सिंहवर्मा, त्याला दोन पुत्र नसून एकच पुत्र होता, व त्यालाच त्यानें पंचगांग प्रदेशीं पाठवून दिलें होतें! ही गोष्ट या सुलोचनेलाही माहित आहे!

**कासि०**—दुष्टे! एकूण अखेर तुझी दुष्ट करणी उघडकीस आली अं? ठीक आहे! आतां अर्धघटकेच्या आंत वीरोत्तंसाचें कंठनाल च्छेदन करतों पहा!

**मणि०**—सरकार! सिंहवर्म्यानें हा कट केला त्यांत शांतिवर्मा ह्मणून कोणी आहे तो त्याचा मदतगार होता! त्या दोघांनीं मिळून ही शूरसेनाला पळवून न्यायची मसलत काढली, व शांतिवर्मा त्याला घेऊन गेला! मागें खऱ्या वीरोत्तंसाला सिंहवर्म्यानें व या स्त्रीनें मिळून आपल्या पुत्राच्या बहाण्यानें जवळ बाळगून त्याचें रक्षण केलें, व आजपर्यंत कोणालाही त्याबद्दल संशय येऊं दिला नाहीं!

**सुलो०**—(मणिपाळाकडे पाहून आपणाशीं) हाय हाय! असलाले अधमाधम पुरुष या जगांत आहेत, तोंपर्यंत या जगांत रहाणेंही व्यर्थ आहे!

**कासि०**—मणिपाळा! जा जाऊन शांतिवर्म्याला पुढें घालून घेऊन ये!

**मणि०**—सरकार! आज्ञा!—माझी राजनिष्ठा व सत्यप्रीति यांच्या परीक्षेचा हाच समय आहे! (जातो.)

**कासि०**—आतां बरीक मी खचित धन्य झालों ह्मटलें पाहिजे! आतां हा पोरगा माझ्या हातांत सांपडला ह्मणजे विश्वासघाताचा

पुरा बीमोड़च होईल!—समजलीस कायगे दुष्टे! तुझ्या समक्ष त्या कारऱ्याचें डोकें उडवितों! सकाळ उजाडूं दे कशी ती, कीं या संपूर्ण सिंधुदेशभर त्याचें मस्तक फिरवून त्याला गृध्रादि पक्षी टोंचीत रहातील असें करितों!

(मणिपाळ येतो.)

कासि०—कायरे मणिपाळा! तो विश्वासघातकी चोर गुलाम कुठें आहे? त्याला घेऊन नाहीं आलास?

मणि०—सरकारची आज्ञा ऐकल्याबरोबर तो तावडतोब इकडे येण्यासच निघाला! हा आलाच पहा!

(वीरोत्तंस नागव्या तरवारीनिशीं आंत येतो.)

वीरो०—हे दुष्टा अरबा! तुला वीरोत्तंस पाहिजे होता नाहीं? हा घे वीरोत्तंस!

कासि०—अरेरे! या दुष्टानें विश्वासघात केला खचित!—अरे, हा दुष्ट हत्यारबंद होऊन मजपुढें कसा येऊं शकला?—अरेरेरे! काय करूं रे?—या दुष्टाला या वेळीं पहातांच देहाचा कसा संताप होऊन जावा, व याचे तिळातिळा एवढाले केव्हां तुकडे करून टाकीन असेंही वाटावें! पण तें सर्व एकीकडे जाऊन माझ्या अंगच्या वीरश्रीचाही हा एकदम पात कशानें झाला? हाय हाय! या दुष्टाचें हें अकल्पित दर्शन घडलें असतां माझें रक्त अधिकच भडकावें तें एकदम गोठूं लागलें याचा अर्थ काय?

सुलो०—दुष्टा! याचा अर्थ मी तुला सांगतें! हा आला आहे हाच तुझा राजा! याकरितां याचें अन्यायानें तूं राज्य हरण केलें आहेत तें त्याचें त्याला परत देऊन त्याला शरण ये!

कासि०—मूर्खे अबले! तूंही यावेळीं प्रबला होऊं लागलीस काय?

वीरो०—हे मनुष्यघाती अधमा! तूं आश्चर्यानें थक्क होऊन कशानें गेला आहेस? मूर्खा! अधमा! रहा मजपुढें उभा नू थरथर कांपूं लाग! आजपर्यंत तूं लक्षशः अन्याय केलेस, त्यांची संख्या भरली! आतां त्यांबद्दल तुला शासन करण्याकरितां हा पहा प्रत्यक्ष कृतांतकाळ तुजपुढें येऊन उभा राहिला आहे!

कासि०—चल जा मूर्खा! मध्यरात्रींच्या वेळीं एकांतीं मी शस्त्ररहित बसलों असतां त्या ठिकाणीं विश्वासघातानें हत्यारबंद प्रवेश केलास, एवढ्यानेंच तूं माझा कृतांतकाळ बनलास काय? मूर्खा! तूं एवढा मोठा वीर ह्मणवितोस, तर तुझ्याच शास्त्राप्रमाणें अशस्त्र्याशीं शस्त्री लढायला आला असतां त्याला काय ह्मणतात तें सांग पाहूं अगोदर?

वीरो०—अधमा! ज्या वेळीं तूं माझ्या निःशस्त्र मातापितरांचा वध केलास, त्यावेळीं तुझ्या मनांत हा विचार आला नाहीं नू तो आतां येतो काय? चिंता नाहीं! या वेळीं तुझा अंतकाळच समीप प्राप्त झाला आहे, याकरितां यावेळीं माझ्या हातांत एक तरवार आहे, व ही दुसरी मणिपाळाजवळ आहे, या दोहींतून तुला पाहिजे ती मागून घे, नू कर मजशीं छाती असेल तर युद्ध!

कासि०—जा जा, यावेळीं तुला मी आपल्या दृष्टीपुढून जाऊं देतों! तुझी योग्यता माझ्यापुढें लढण्याची बिलकुल नाहीं, याक-

रितां उगीच लहाना तोंडीं मोठा घांस घेऊं नको !

वीरो०—काय ह्मणतोस अधमा ! माझी योग्यता तुजशीं लढण्याची नाहीं ? अधमा ! ह्या फुकाच्या वल्गाना पुरे कर, आणि पाहिजे असेल तें शस्त्र घेऊन मजशीं युद्ध कर ! दुरात्म्या ! तूं मजवर व माझ्या मातापितरांवर अन्यायानें इतके दुःखांचे पर्वतचे पर्वत लोटले आहेस कीं त्यांचें स्मरण झालें असतां तूं अशस्त्र सांपडलास तरी देखील तुझें हननच करावें, परंतु तूं बोललास त्यापेक्षां तुजवर तेवढी मेहेरबानीच करतों ! अधमा ! तुजशीं यावेळीं युद्धेच्छा धरून तुजसमोर दंड ठोकून उभा राहिलेला वीर यद्यपि वीरोत्तंसच आहे, तथापि तूं त्याला तसें न समजतां, जी वीर राजमूर्ति तूं दुष्टा ! वीस वर्षांपूर्वी अधमपणानें यमसदनास पोंचविलीस, तीच या वेळीं प्रत्यक्ष तुजपुढें येऊन उभी राहून तुला स्वहस्तें दंड करण्यास उभी राहिली आहे असें समज ! दुष्टा ! बोल ! तुझी या वेळीं मशीं लढण्याचीं आहे कीं नाहीं छाती !

कासि०—दुष्टा ! छाती आहे कीं नाहीं ह्मणून काय विचारतोस ? ( मणिपाळास ) दुष्टा ! विश्वासघातक्या ! ही तरवार तूं काय ह्मणून हातीं ठेवली आहेस ? चल सोड ! सोडतोस कीं नाहीं ? ( तरवार हिसकावून घेतो. )

सुलो०—( घाबरून ) अहो धांवाहो धांवा ! या दोघांचें एकाकीं युद्ध होतें आहे, त्याच्या एकाच्याच निकालाच्या ताजव्यांत सिंधु देशचें संपूर्ण राजवैभव पडूं पहात आहे हे चांगलें नाहीं ! अहो धांवा ! धांवा !

वीरो०—अधमा अरबा ! या मणिपाळाच्या भगिनीचा छळ कोणीं तूंच केलास, न व्हे ?— अरेरे ! दुष्टा ! यावेळीं तूं आपल्या कर्मानेंच नष्ट झालास ! ( उभयतां लढूं लागतात. )

सुलो०—हे पांडवपक्षपाती नारायणा ! यावेळीं या कोमल राजबालकाच्या बाहूंस तूंच प्रेरणा देऊन या अधमाधमाचा नाश करीव !

वीरो०—अरेरे ! दुष्टा ! हा पहा मेलास ! ( त्याला खालीं पाडतो. ) दुष्टा ! मुसंड्या ! आतां कुठें आहेस ? बोल !

( तरवार भोंसकतो. कासिम मरून पडतो. )

सुलो०—धन्य ! धन्य ! वत्सा ! हे राजमूर्ते ! धन्य आहेस !

वीरो०—मातुश्री ! इतःपर मी इतरांचा राजा झालों, तथापि आपला आणि सिंहवर्म महाराजांचा मी पुत्रकल्पच आहें ! याकरितां मला निरंतर 'वत्सा !' अगर 'बाळा' ह्मणवून घेणें हेंच अधिक प्रिय आहे ! (तिच्या पायां पडतो.)

सुलो०—बाळा ! निरंतर शतायुषी हो बरें !

( शूरसेन घाईघाईनें प्रवेश करितो. )

शूर०—कुठें आहेत ? कुठें आहेत ? वीरोत्तंस महाराज कुठें आहेत ?

सुलो०—कोण ? माझा बाळ शूरसेन ? बाळा ! पुनरपि मला मिळालास एकदांचा ? बाळा ! तो दुष्ट अरब पहा या कर्मभूमीचा त्याग करून गेला !—बाळा ! हे तुझे महाराज, यांना वंदन कर ! मी जातें तिकडे प्राणनाथांना हें आनंदवृत्त कळवायला—चल मणिपाळा ! चल मजबरोबर !

मणि०—आज्ञा मातुश्री ! ( दोघे जातात. )

शूर०—वीरोत्तंस महाराज ! हा नम्र दास चरणीं प्रणिपात करीत आहे !

वीरो०—शूरसेना ! प्रत्यक्ष पिंडाची उत्पत्ति या नात्यानें तूं आणि मी निराळे, तथापि तूं मला या वेळीं प्रत्यक्ष भावाप्रमाणेंच आहेस, याकरितां मला कडकडून भेट !

( दोघे एकमेकांस आलिंगन देतात. )

( इतक्यांत आनंद पावलेला शांतिवर्मा येतो.)

शूर०—यावे शांतिवर्म महाराज ! हा वत्स शूरसेन आपणास वंदन करतो आहे !

शांति०—कल्याण वत्सा !—राजन् ! विजयोस्तु!

वीरो०—शांतिवर्म महाराज ! बाहेर युद्धाची कशी काय हकीकत आहे ?

शांति०—महाराज ! माझ्या आनंदयुक्त मुद्रेवरून आपणाला सर्व हकीकत समजणारच आहे, याकरितां थोडक्यांत सांगतों ! आजचे प्रसंगीं आमच्या संपूर्ण वीरांनीं शौर्याची पण कमाल करून सोडिली ! कासिमाचा तो सरदार कुसींद—तो आह्मीं दिल्लीदरवाज्यासमोर येऊन भिडतों आहों नाहीं इतक्यांत आमच्या अंगावर येऊन तुटून पडला, व नंतर जो युद्धप्रकार झाला, त्यांत त्या दुष्टाचा अंतही झाला !

वीरो०—वाहवा! हा इकडे पहा, हा दुष्ट कासिम आपल्या अनंतगुणित पातकांचें प्रायश्चित्त भोगून पडला आहे !—बरें तें असो; पण आपले दुसरे मित्रवर्ग कोठें आहेत ?

शांति०—महाराज ! वाड्याबाहेर अद्यापि पळापळी आणि धराधरी सुरू आहेच, तथापि नगरांतील एकूणएक रस्ते व वाटा आपल्या सैन्याच्या ताब्यांत आहेत, याकरितां हा दंगा अल्पकाळांतच संपेल !

वीरो०—फार उत्तम ! आपण वक्रदंष्ट्र किंवा सुधन्वा यांपैकीं कोणाला तरी नगरांत हिंडावयास पाठवून सर्वांना माझ्या नांवाची द्वाही देववा! व इत:पर स्वातंत्र्य त्यांस परत मिळालें याकरितां सर्वांनीं शांततेचा सुखानुभव घेत राहून खुशाल स्वधर्मानुचरण करावें ह्मणूनही जाहिर करा !

शांति०—आज्ञा !( जातो.)

वीरो०—बरें, हा इतका प्रकार सर्व झाला, परंतु मजला पित्याहूनही अधिक अशा त्या सिंहवर्म महाराजांचें कसें काय वर्तमान ? सुलोचना मातुश्री मला आशीर्वाद देऊन गेल्या, त्या अद्यापि त्यांना घेऊन परत आल्या नाहींत हें कसें ? चला चला ! मला तिकडेच घेऊन चला !

( इतक्यांत मणिपाळ येतो. )

मणि०—हायहाय घात झाला ! घात झाला !

सर्व—( घाबरून ) काय ? काय झालें ?

मणि०—घात झाला न् काय? तरी असें होईल ह्मणून मला केव्हांपासून भय वाटतच होतें, अखेर दुर्दैवानें तेंच खरें केलें ! हाय हाय ! महाराज ! या दुष्ट कासिमानें मी इकडे येण्यापूर्वींच सिंहवर्म महाराजांना वेदनायंत्रांत घालण्याकरितां चांडाळांकडे हुकूम पाठविले होते!त्याप्रमाणें चांडाळच ते, त्यांच्या हृदयांत दया कोठून येणार ? त्या दुष्टांना वयोवृद्ध, तपोवृद्ध इत्यादि परीक्षाच बोलून चालून नाहीं, तेव्हां त्यांनीं हुकूम मिळतांच आपल्या घातक कर्मास आरंभ केला ! अहाहा ! इतका प्रकार झाला तथापि त्या थोरबुद्धीच्या सद्गृहस्थांस यत्किंचितूही वाईट न वाटतां त्यांचें मुख सहास्यच होतें ! वेदनायंत्रांतल्या चक्रावर

त्यांना बांधलें असून प्रतिक्षणीं त्यांचा देह जखडून आवळला जात होता ! हरहर ! किती भयंकर तो देखावा ! आह्मीं जातों तों आधींच अशक्त झालेल्या त्या देहांतून रक्ताच्या चिळकांड्या निघत होत्या, व त्यांच्या पाठीच्या अंगानें मांसाचे दोन तीन तुकडेही उडून पडलेले आह्मीं पाहिले ! हरहर ! महाराज ! ही पतीची स्थिति प्रत्यक्ष अवलोकन करून त्या साध्वीची मात्र भयंकर स्थिति झाली ! मातुश्रीनीं घाबऱ्यां घाबऱ्यां त्यांच्याकडे पाहून एक किंकाळी ठोकली, व लागलीच वस्त्राच्या आड लपविलेली एक सुरी बाहेर काढून एकदम आपल्या हृदयांत खुपसून घेतली, व 'प्राणनाथांच्या समागमें आजपर्यंत जगलें, आतां हेंच माझें सहगमन' एवढेच शब्द त्या बोलल्या!

**शूर०**—हायहाय ! परमेश्वरा ! काय दुर्धर प्रसंग तूं आणलास हा !हाय हायगे जननी! हायहाय ! अहो धांवा धांवा कोणी तरी, आणखी तिला जगविण्याचा कांहीं उपाय असला तर तो करा हो करा !

**मणि०**—महाराज ! ही आशा मला तर व्यर्थच वाटते ! आईसाहेबांना त्या दुष्ट मृत्यूनें घेरलें हेंच खचित !

**वीरो०**—हायहाय ! मातुश्री ! काय साहसकर्म आपण केलेंत हें ! मणिपाळा! बाबा सिंहवर्म महाराजांची तरी काय अवस्था या वेळीं झाली आहे?

**मणि०**—जी मातुश्रींची तीच त्यांची ! उभयतांही अद्यापि जिवंत आहेत, तथापि त्यांच्या जीविताची आशा बाळगणें कठिणच ! सरकार ! आईसाहेबांची ही स्थिति पहातांच सिंहवर्म महाराजांनीं " धन्य धन्य! सुटलों काळजींतून" ह्मटलें, इतक्यांत आमच्या गडबडीमुळें चांडाळ भिऊन त्यांना टाकून पळून गेले, व मी जवळ जाऊन त्यांना वेदनायंत्रांतून बाहेर काढिलें ! बाहेर काढितों, तों कसचें काय न् कसचें काय ? अंगांत शक्तिच नाहीं, तथापि तशा स्थितींतच आमच्या मदतीनें आईसाहेबांच्या जवळ गेले; व सांप्रत त्यांना मिठी मारून त्यांच्या स्थितीबद्दल ते धाय धाय रडत आहेत ! हरहर ! महाराज! त्यांची ती दुःखस्थिति प्रत्यक्ष पाषाणाचाही हृदयभेद करील ! महाराज ! चला चला ! सर्वजण तिकडेच जाऊं या !

**सर्व**—हायहाय ! चला ! ( जातात. )

पडदा पडतो.

---

### प्र० २. राजवाड्यांतील दुसरा भाग.

( भुईवर सिंहवर्मा व सुलोचना एकमेकांस मिठ्या मारून पडलीं आहेत.)

( वीरोत्तंस, शूरसेन आदिकरून सर्व येतात.)

**सिंह०**—प्राणप्रिये ! काय ही तुझी अवस्था ! अशी घाबरूं नको! तूं अजूनही जगशील! प्राणसखे ! तुझी योग्यता अशा प्रकारें अंत होण्याची खचित नाहीं !

**सुलो०**—प्राणनाथ ! तें कांहीं ह्मणा, परंतु या वेळीं माझें सर्वांग जड होऊं लागलें आहे! काळानें मला खचित घेरलें !

**वीरो०**—हाय हायरे कर्मा ! हीच काय आमची जयप्राप्ति? आणि आमच्या राज्यांत प्रजांना सुखानुभव घडणार तो हाच काय? हाय हाय !

**सिंह०**—काय ? हा मधुर शब्द मीं ओळखि-

ला! हा शब्द मला मेलेल्यांतूनही परत सजीव करून आणील! ( उठून वीरोत्तंसाला आलिंगन देण्याची खटपट करितो, परंतु शक्ति नसल्यामुळें त्याच्या पायांशीं खालीं पडतो.) वीरोत्तंसराज! आपला सर्वदा विजय असो!

**वीरो०**—अरे यांना नीट संभाळून धरून बसवा! ( तसें करितात. )

**सुलो०**—अहो! माझा बाळ—माझा शूरसेन—कुठें आहे हो? तो तरी जिवंत आहेना?

**शूर०**—आई! तो हतभाग्य अद्यापि जिवंत आहे! परंतु आईग! काय तुझी अवस्था झाली आहे ही!

**सुलो०**—ये रे बाळा! मला मारूं दे तुला मिठी! ( आवेशानें उठून बसून त्याला आलिंगिते ) अहाहा! परमेश्वरा! हा आनंदातिशयच माझा अंत करील! परमेश्वरा! यावेळीं तूं मला किती ह्मणून धन्य केलें आहेस! आतां खुशाल मी मरून तुझ्या चरणाची दासी होण्यासाठीं येईन! धन्य! धन्य!—अहो! माझ्यानें मुळींच बसवत नाहीं! मला खालीं ठेवा! हळू!—हळू!—

**वीरो०**—( सिंहवर्म्यास संभाळून उठवून ) हे पवित्राधिक महात्मन्! आपणाला यावेळीं बरें वाटतें आहे?

**सिंह०**—अहाहा! राजमूर्ते! यावेळीं मजसारखा दुसरा धन्य आहे कोण? आपण महाराज, आणि हा माझा पुत्र, उभयतां मला भेटाल ह्मणून कांहीं वेळापूर्वी माझी आशा सुटलीच होती! हरहर! यावेळीं हा आनंदातिशय व प्रियेच्या या अवस्थेमुळें होणारा दुःखातिशय, या दोहोंच्या संमिश्रणामुळें माझीं आयुर्बंधनें तटकन तुटूनच जातील असें मला वाटत आहे! प्रियतमे! प्रिये सुलोचने! एकवार तरी तूं डोळे उघडून मजकडे पहागे!

**सुलो०**—( डोळे मिटल्या मिटल्याच ) आतां कशाचे डोळे उघडतात! झाले—जड—जड! बाळा! शूर—!तु—तुझेंही मुख मला दि—दिसत ना—नाहीं ना? हाय हाय! झाला! सर्वस्वीं मी तुला आं—आं—आंचवलें अं!

**सिंह०**—महाराज! कृपा करून मला माझ्या प्रियतमेच्या अंगाला अगदीं चिकटून चिकटून पडूं द्या!—हा—हाय हाय! डोळ्या—पु—पुढें अंधेरी—आ—( मूर्छित होतो. )

**शूर०**—आईग! आईग! आणखी एक शब्द तरी बोलग! आई!—बाबा! सावध व्हा! सावध व्हा!

**सुलो०**—( सावध होऊन अडखळत ) बाळा! शूरसेना! तुझा हात दे पाहूं माझ्या हातांत? बाळा! मी अविचारानें वागलें क्षमा कर! प्राणनाथांची ती अवस्था माझ्यानें पहावेना!—पण—पण बाळा! कायरे तो दुष्ट खचित मेला?

**शूर०**—खचित मेला आई!

**सुलो०**—( पूर्ववत् ) आतां मलाही आठवतें खरें! आतां प्राणनाथांसमागमें जाण्यास चिंता नाहीं! आतां आह्मीं उभयतां त्या परमेश्वराच्या दयासनाजवळ राहून या राजमूर्तीचें व तुझें खुशाल कल्याण भाकीत बसूं! बाळा! आतां आह्मीं तर गेलोंच, पण आमच्या पश्चात् तूं प्राणनाथांच्या गुणांचें अनुकरण कर, व सद्धर्मानें वाग. ह्मणजे आह्मीं स्वर्गलोकीं खुशाल नांदूं!—बाळा! तुला सोडून जाणें वाईट वाटतें रे, पण काय करूं? ती वैधव्याची स्थि—

हायहाय बाळा ! बाळा ! माझे प्राणनाथ कोठें आहेत रे ?

**सिंह०**–( सावध होऊन ) प्रिये ! हा मी येथेंच आहें !–अहो, माझ्या प्रियेजवळ मला बसतें करा ! ( सर्व तसें करितात. ) प्रिये! हें शेवटलें चुंबन !–( चुंबन घेतो )

**सुलो०**–( मिठी मारून ) अहाहा ! प्राणनाथ! काय हें सुख ! अहा–हा राम ! राम ! राम ! ( मरून पडते. )

**सिंह०**–हाय हाय ! गेली गेली ! माझी प्राणप्रिया मला सोडून गेली ! आतां ती कशानें परत येणार ? प्रिये ! इतक्यांत बोलत होतीस, आणि इतक्यांत कीं गे थंडगार झालीस ! हाय हाय ! प्रिये ! एकूण सद्गुणविकासी तुझी मूर्ति यावेळीं निस्तेज होऊन पडली अं !–अं !–महाराज !–मी जातों, आतां माझें सर्वांपाशीं एवढेंच मागणें आहे कीं, आह्मां उभयतांचेंही दहन एकाच सरणांत करावें!

**वीरो०**–हर हर ! हे विश्वंभरा ! कोण घातक हा प्रसंग मजवर आणिलास ! हा प्रसंग येऊं द्यावयाचा होता, तर मला राज्याधिकारी तरी कशाला केलेंस? मला राज्य तरी कशाला पाहिजे ? परमेश्वरा ! ते तूं खुशाल परत घे ! या दुर्धर प्रसंगीं माझ्यानें तर या मातापितरस्थानीय दंपत्याच्या मागून नाहींच रहाणार ! परमेश्वरा !—

**सिंह०**–राजमूर्ते ! आपण हा शोकातिशय टाकून द्यावा ! आपण राजे, संपूर्ण प्रजा बालकें हीं आपलीं, याकरितां त्यांच्याच कल्याणाचा आपण सदैव विचार मनांत बाळगावा! तो न बाळगिला तर राजधर्माचें उल्लंघन होईल !–राजमूर्ते ! धीर धरा!–आजपर्यंत मी पोटच्या लेंकराप्रमाणें आपलें पालन केलें, याकरितां ही शेवटली वेळ आपणास 'बाळा !' ह्मणून हांक मारितों ! एक वेळ मला घट्ट आलिंगन द्या ! ह्मणजे या स्थविराच्या आत्म्यास संतोष होईल ! (वीरोत्तंस त्यास मिठी मारतो )

**वीरो०**–हर हर ! परमेश्वरा ! एकूण तूं या दोन्ही प्रियमूर्तींस घेऊन जाणारच अं ? हाय हाय ! हाय हाय !—

**सिंह०**–महाराज ! एकाद्या गरीब संसारी मनुष्याप्रमाणें आपण काय बोलतां हें ? गृहमेधी मनुष्याचे धर्म आपणास पाळिले पाहिजेतच;तथापि राजत्वाचा अधिकारही आपणाकडेच आहे,याकरितां तिकडे प्रथम लक्ष पुरविणें हें आपलें कर्तव्य आहे ! आपण कोणत्याही स्थितींत असा, सौख्याचें खरें साधन ह्मटलें सद्गुणच होय ! राजाच्या हातून जर कांहीं वाईट कृत्यें झालीं, तर त्यांचा संबंध त्याचेच आयुष्याबरोबर संपतो असें न होतां, त्यांचे परिणाम अनंत कालपर्यंत मागें उर्वरितच असतात ! हे परिणाम त्याच्या एकट्याच्या संततीस भोंवतात एवढेंच नव्हे, तर ते संपूर्ण राष्ट्रांचीं राष्ट्रेंही गडप करून टाकितात ! याकरितां हे राजमूर्ते ! माझें आपणास एवढेंच शेवटचें सांगणें आहे कीं, आपण सदा सर्वदा न्याय आपल्या दृष्टी समोर वागवावा!ज्यांच्या हातून चुकून अपराध होतो, त्यांस सौम्यतेनेंच उपदेश करावा, परंतु खऱ्या अपराध्याला मात्र दया दाखवूं नये ! तसेंच जे निरपराधी

असतील त्यांचें अवश्यमेव पालन करावें ! सत्प्रीति हेंच मुख्य राज्यतत्व लक्षांत ठेवून,हांजी हांजी करणाऱ्या नीच लोकांस आपल्या वाऱ्यालाही उभें राहूं न देतां आपल्या पदरीं असलेल्या सेवकजनांस विनाकारण त्रास न होईं असेंच सदोदित वर्तन ठेवावें !—महाराज ! आपणाला याहून अधिक तें काय सांगावें ? चाललों—चाललों मी ! माझी हींच देहयात्रा !—

**शूर०**—हरहर! बाबांचा आला अंतकाळ समीप! महाराज ! पहा ! पहा !—हायहाय !

**सिंह०**—बाळांनो ! विनाकारण शोक नका करूं! आजपर्यंत कष्टखाल्लेल्या या प्राण्याची हीच गति! महाराज! आपल्या वैभवाचा आरंभमात्र पाहिला! पुढचें पहाणें नाहीं नशीबीं! हायहाय !—बाळा **शूरसेना!** येतों आतां—होय होय! प्राणप्रिये! तूं करते आहेस खूण, ती समजलों!—मित्रहो! ती माझी प्रिया ! विमान मजकरितां वाट पहातें आहे ! येतों ! येतों—! आलों ! आलों !—**राम!**—**राम ! राम !** (मरण येतें.)

**वीरो०**—हाय हायरे महात्म्या ! आतां मी तुला कोठें पाहूं ?—हे सत्पुरुषा ! तुझा प्राणांत झाला हेंच दुःख इतःपर या हतभाग्य वीरोत्तंसाला जन्मभर पुरून रहाणारना ? हर हर ! किती मी अभागी ! हे महात्म्या ! काय ते तुझे सदुपदेश ! नीतीविषयीं काय ती तुझी आसक्ति ? आणि मी अभागी त्या सर्वांनाही अंतरलों ?—

**शूर०**—महाराज ! आपण असा शोक करीत बसूं नये ! आपणामागें राज्य आहे, त्याकरितां आपण हा शोक टाकलाच पाहिजे ! हा शोक आपणापेक्षां खरोखरी माझ्याच वांट्याचा आहे ! हाय हाय ! हे पूज्य पित्या ! हाय हायगे पूज्य जननी !

**वीरो०**—असो; मर्जी या जगन्नियंत्याची! बांधवा **शूरसेना** ! ऊठ ऊठ ! तुजवर हा अत्यंत कठिण दुःखाचा प्रसंग गुदरला आहे यत संशय नाहीं ! याकरितां मी जिवंत राहून त्या तुझ्या दुःखांचेंच परिमार्जन करण्याकरितां झटेन ! हायहाय ! **सिंहवर्म** महाराज व माता **सुलोचना** यां सारखीं दिव्य रत्नें हरपल्यावर संपूर्ण राष्ट्राला अत्यंत शोक वाटेल, याकरितां त्याचेंही समाधान करण्यास झटलें पाहिजे! बांधवा **शूरसेना** ! या वेळीं तूंच माझ्या हृदयाचा सखा आहेस! इतःपर **सिंहवर्म** महाराजांच्याच ठिकाणीं तूं मला हो !—मित्रहो ! चला ! राज्यांत शांततेची द्वाही फिरत आहे, याकरितां आतां वेळ घालवून परिणाम नाहीं ! आतां अंत्य व्यवस्थेसच लागलें पाहिजे ! चला ! चला ! हायहाय !

**सर्व**—हायहाय ! चला ! चला !

(पडदा पडतो.)

**समाप्त.**

तुकाराम निळकंठ पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
ग. स. पटवर्धन
९-१०-१२.